ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४६ अंक ३ पाने ५६ ऑक्टोबर २०१८ मूल्य २२ रु.

## महिला सक्षमीकरण

सातत्यपूर्ण प्रयत्नातून महिलांचे सक्षमीकरण
-प्रीती सुदान

स्त्रिया आणि अर्थविषयक नागरी हक्क
-ब्रिंदा विश्वनाथन/ संजना शर्मा

महिला नेतृत्वाखालील विकासाद्वारे राष्ट्राचे सक्षमीकरण
-मनेका संजय गांधी

सक्षम महिला समर्थ समाज
- पंकजा मुंडे

विशेष लेख
मुस्लिम स्त्रिया आणि सक्षमीकरण
-सईदा हमीद

फोकस
स्वयंउद्यमशीलतेच्या विकासाद्वारे महिलांचे सक्षमीकरण
- एन व्ही माधुरी







पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ११ सप्टेंबर २०१८ रोजी अंगणवाडी आणि मान्यताप्राप्त सामाजिक आरोग्य कार्यकर्त्या (आशा) यांच्या मानधनात वाढ करण्याची घोषणा केली. नरेंद्र मोदी यांनी नमो ऍप द्वारे अंगणवाडी सेविकांशी संवाद साधला. त्यावेळी मोदींनी ही घोषणा केली.

याशिवाय, सर्व आशा कामगार आणि त्यांच्या सहाय्यकांना प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत आणि पंतप्रधान सुरक्षा विमा योजना अंतर्गत मोफत विमा संरक्षण दिले जाईल,त्याखेरीज, पंतप्रधान मोदींनी अंगणवाडी सेविकांना दिल्या जाणाऱ्या मानधनात लक्षणीय वाढ करण्याची घोषणा केली. आतापर्यंत ज्या सेविकांना दरमहा ३००० रुपये मिळत होते त्यांना आता, दरमहा ४५०० रुपये मिळणार आहेत. त्याचप्रमाणे, दरमहा २२५० रुपये प्राप्त करणाऱ्यांना आता दरमहा ३५०० रुपये मिळतील. अंगणवाडी मदतनिसांसाठी मानधनही १५०० वरून २२०० रुपये दरमहा वाढवण्यात आले आहे.कुपोषण निर्मूलनात अंगणवाडी सेविका,आशा कार्यकर्त्यांचा सहभाग महत्वाचा असल्याचे मोदी यांनी यावेळी सांगितले. अंगणवाडी सेविका आणि आशा कार्यकर्त्यांनी यावेळी आपले अनुभव पंतप्रधानांना सांगितले.

## अंगणवाडी सेविकांच्या मानधनात लक्षणीय वाढ

**पंतप्रधानांच्या संवादाची वैशिष्ट्ये**

१. राजस्थान राज्यातील झुंझुनूमध्ये राष्ट्रीय पोषण आहार मिशनची सुरुवात झाली. या मिशनमुळे कुपोषण,जन्मताच अर्भकाचे वजन कमी असणे,अशक्तपणा या समस्यांवर मात करता येणार आहे. या मिशनमध्ये जास्तीत जास्त महिला आणि मुलांनी सहभाग घेणे गरजेचे आहे.

२. पोषण आणि चांगल्या आरोग्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. लसीकरणामुळे गर्भवती महिला आणि बालकांना फायदा होत आहे.

३. लहान मुलांसाठींच्या न्यू बॉर्न केअरमुळे देशभरात दरवर्षी एक कोटी २५ लाख मुलांना फायदा

४. पंतप्रधानांनी या संवादात आरोग्य आणि विकास यांचे संबंध सांगितले. देशातील मुलं अशक्त असतील तर देशाचा विकास कसा होईल असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

५. आयुष्यमान भारत योजनेच्या पहिल्या लाभार्थ्यांचा उल्लेख केला. बेबी करिष्मा ही आयुष्यमान बेबी म्हणून ओळखली जात आहे. बेबी करिष्मा ही देशभरातील १० कोटी कुटुंबासाठी आशेचं चिन्ह बनली आहे.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४६ ❖ ❖ अंक ३ ❖ ❖ ऑक्टोबर २०१८ ❖ ❖ मूल्य २२ रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**
संपादक
**उमेश उजगरे**
मुखपृष्ठ
**गजानन धोपे**

## सूचना

**'योजना'** हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाश विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. योजना मासिकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मते-विचार त्या-त्या लेखकांची असतात. सरकार किंवा लेखक कार्यरत असलेल्या संस्था त्या मतांशी/विचारांशी सहमत असतीलच असे नव्हे. लेखांमध्ये वापरण्यात आलेले नकाशे/ध्वज हे केवळ प्रातिनिधिक आहेत. राजकीय नकाशा तसेच भारताचा अथवा अन्य देशाचा राष्ट्रध्वज म्हणून ते न्यायालयीन बाबींसाठी ग्राह्य नसतील. स्पर्धा परीक्षा पुस्तक प्रकाशक तसेच मार्गदर्शक संस्थाच्या योजना मासिकातील जाहिरातीमध्ये केलेल्या दाव्यांची वाचकांनी स्वत: खात्री करून घ्यावी. अशा जाहिरातींमधील मजकुराबाबत 'योजना' कुठल्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. योजना मासिकातील मजकुराचे लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत:पुन:प्रकाशन किंवा पुन: प्रसारण तसेच 'योजना' मासिकाच्या नावाचा वापर व्यावसायिक कारणांसाठी करण्यास मनाई आहे.

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ■ सातत्यपूर्ण प्रयत्नातून महिलांचे सक्षमीकरण | -प्रीती सुदान | ५ |
| ■ स्त्रिया आणि अर्थविषयक नागरी हक्क | -ब्रिंदा विश्वनाथन/ संजना शर्मा | ८ |
| ■ महिला नेतृत्वाखालील विकासाद्वारे राष्ट्राचे सक्षमीकरण | -मनेका संजय गांधी | १३ |
| ■ सक्षम महिला समर्थ समाज | -पंकजा मुंडे | १८ |
| ■ महिला सशक्तीकरणाचे आव्हान पेलताना | -निलीमा श्रीवास्तव, लिंडा लेन, सुनिता ढाल | २१ |
| ■ स्वयंउद्यमशीलतेच्या विकासाद्वारे महिलांचे सक्षमीकरण (फोकस) | -एन व्ही माधुरी | २५ |
| ■ महिला सबलीकरण कायद्यातील तरतुदी | -गीता लुथ्रा | २९ |
| ■ स्त्री शिक्षण: धोरणात्मक तरतुदी व सामाजिक वास्तव | -डॉ. विजय गायकवाड | ३२ |
| ■ आदिवासी महिलांचे सक्षमीकरण-प्रश्न व पुढील वाटचाल | -दीपक खांडेकर | ३६ |
| ■ मुस्लिम स्त्रिया आणि सक्षमीकरण (विशेष लेख) | -सईदा हमीद | ३८ |
| ■ आर्थिक समावेश: महिलांना सशक्त करण्याचे साधन | -लेखा चक्रवर्ती, पियुष गांधी | ४३ |
| ■ महिला सक्षमीकरण आणि भारतातील आरोग्य क्षेत्र | - चंद्रकांत लाहरिया | ४८ |
| ■ प्रदूषण नियंत्रण - सुरूवात स्वत:पासून | - रेश्मा घाणेकर | ५३ |


योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -०२२-२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

संपादकीय

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

# महिलांच्या पुढाकारातून विकास

भारतीय संस्कृतीमध्ये नारीशक्तीची संकल्पना पुरातन काळापासून अस्तित्वात आहे. भारतात अनादीकाळापासून देवीच्या विविध रुपांची उपासना करण्याची पद्धत आहे. पूर्व भारतात काली, म्हैसासूर मर्दिनी आणि केरळमध्ये भागवती या सारख्या विविध रुपात देशभरात देवीची उपासना करण्यात येते. शक्तीचं रुप म्हणून देवीची उपासना आणि आराधना करण्यात येते.

परंतु ही नाण्याची एक बाजू आहे. दुसऱ्या बाजूला महिलांना त्यांच्या जीवनात आणि कुटुंबात मत व्यक्त करण्याचं स्वातंत्र्यपण दिले जात नाही. त्यांचं जीवन हे पुरुषांच्या अधीन असते. त्यांच्या आशा- आकांशा, इच्छांना महत्व दिले जात नाही. मुलगी,पत्नी आणि मातृत्वाची जबाबदारी निभावण्यातच महिलांचे आयुष्य संपते

मात्र, गेल्या काही वर्षांपासून महिलांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला आहे. आधुनिक महिला आता चार भितींमध्ये राहत नाही. महिलांना त्यांचे अस्तित्व गवसले आहे. घर असो की ऑफिस महिला स्त्री -पुरुष समानता आणि न्यायाची मागणी करत आहेत. स्त्रियांनी प्रत्येक क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केली आहे. तंत्रज्ञान,अंतराळ विज्ञान,खेळ, सैन्य या सर्वच क्षेत्रात महिलांनी भरारी घेतलीय. एवढेच नाही तर ग्रामीण आणि शहरी भागागतील प्रत्येक पाच महिलामध्ये एक महिला उद्योजक आहे.

गेल्या काही वर्षापासून महिलांच्या विकासात सरकारी धोरणाचाही मोलाचा वाटा आहे.

स्त्री भ्रूण हत्या रोखण्यापासून कार्यालयाच्या ठिकाणी त्यांच्या करिअरला उभारणी देण्यापासून सरकारकडून पुढाकार घेण्यात आला आहे. महिलांना त्यांच्या जीवनाच्या प्रवासात सक्षम करणे तसेच त्यांच्या मात्रृत्वापर्यंत सरकारने अनेक कठोर कायदे आणि योजनांची अमंलबजावणी केली आहे. पंतप्रधान मात्रृ वंदन योजनेमुळे महिलांना गरोदरपणाच्या काळात आणि बाळतंपणानंतर आर्थिक सुरक्षितता लाभली आहे. तसेच महिला कर्मचाऱ्यांसाठी २६ आठवडयाची पगारी मात्रृत्व रजा देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मुलगी वाचवा, मुलगी शिकवा आणि सुकन्या समृद्धी योजनेमुळे शिक्षण आणि आर्थिक सुरक्षितता प्राप्त झाली आहे. निरोगी आणि स्वस्थ महिलाच सक्षम होऊ शकते त्यामुळेच केंद्र सरकारने आयुष्यमान भारत,राष्ट्रीय पोषण आहार,उज्ज्वला योजना सुरु केल्या आहेत. या योजनांमुळे महिलाच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला आहे.

उद्योजकता विकास अभियानामुळे महिला त्यांच्या पायावर उभ्या राहिल्या आहेत. पंतप्रधान मुद्रा योजना, स्टँड अप इंडिया,स्टार्ट अप इंडिया आणि राष्ट्रीय जीवन्नोती अभियानाअंतर्गत तयार झालेल्या महिला बचत गटामुळे महिला सक्षम आणि स्वावलंबी झाल्या आहेत. पंतप्रधान जनधन योजनेमुळे महिलांचे आर्थिक समावेशन झाले आहे.

महिलांना सक्षम करण्यासाठी प्रत्येक ठिकाणी त्यांची सरक्षितता महत्वाची आहे. कामाच्या ठिकाणी लैगिंग छळ कायदा, ऑनलाईन तक्रारीसाठी सुविधा, १८१ महिलांसाठी हेल्पलाईनमुळे महिला सक्षम होणार आहेत. तिहेरी तलाक बंदीला लोकसभेने मंजूरी दिल्यानंतर केंद्र सरकारने अध्यादेश काढला आहे. या अध्यादेशामुळे मुस्लिम महिलांच्या विकासातील अडसर दूर होणार आहे.

भारतात एकूण लोकसंख्येच्या ५० टक्के महिला आहेत. महिलांच्या विकासाशिवाय देशाचा विकास अशक्य आहे. महिलांना सक्षम करण्यासाठी बहुपदरी योजनाची आवशक्यता आहे. केंद्र सरकारच्या योजनांमुळे महिलांच्या विकासासोबतच देशही विकासाच्या वाटेवर घोडदौड करेल.

■■■

दृष्टीक्षेप

# सातत्यपूर्ण प्रयत्नातून महिलांचे सक्षमीकरण

-प्रीती सुदान



**बेटी बचाव, बेटी पढाव योजनेतून मुलीचे खरे महत्व समाजात पोहोचवले जात आहे. जर देशाला महिला सबल, कृतीशील असलेला समाज धारण करणारी संस्कृती तयार करायची असेल तर महिलांना पुरूषाइंतकीच चांगली व समान आरोग्यसेवाही मिळाली पाहिजे. हे सगळे गृहित धरूनच आरोग्य मंत्रालयाने अनेक कार्यक्रम राबवले आहेत त्यात महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठई कंटिनम ऑफ केअर म्हणजे काळजीतील सातत्य हा दृष्टिकोन ठेवला आहे. यात गर्भवती महिला, नवजात बालके, तरूण मुली, प्रौढ मुली यांच्यासाठी कार्यक्रम आहेत**

महिला सक्षमीकरण मुलगी गर्भाशयात असल्यापासून सुरू होते असे आम्ही आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयात काम करणारे लोक मानतो. लिंग निवड व त्यावर आधारिक गर्भपात टाळणे हे महिला सक्षमीकरणातील पहिले पाऊल आहे. सरकारने त्यासाठी गर्भधारणा पूर्व व गर्भधारणेनंतर लिंग निदान बंदी कायदा १९९४ लागू केला आहे त्यामुळे गर्भधारणेपूर्वी किंवा नंतर लिंग निश्चिती करता येत नाही, किंबहुना तसे केल्यास शिक्षेची तरतूद आहे. याशिवाय आम्ही सामाजिक आर्थिक अंगानेही काम करीत आहोत त्यातून बेटी बचाव बेटी पढाव योजनेतून मुलीचे खरे महत्व समाजात पोहोचवले जात आहे. जर देशाला महिला सबल, कृतीशील असलेला समाज धारण करणारी संस्कृती तयार करायची असेल तर महिलांना पुरूषाइंतकीच चांगली व समान आरोग्यसेवाही मिळाली पाहिजे. हे सगळे गृहित धरूनच आरोग्य मंत्रालयाने अनेक कार्यक्रम राबवले आहेत त्यात महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठई कंटिनम ऑफ केअर म्हणजे काळजीतील सातत्य हा दृष्टिकोन ठेवला आहे. यात गर्भवती महिला, नवजात बालके, तरूण मुली, प्रौढ मुली यांच्यासाठी कार्यक्रम आहेत शिवाय प्रजननक्षम स्त्रियांसाठी कुटुंब नियोजन कार्यक्रम राबवले जात आहेत. सार्वजनिक आरोग्य केंद्रांनी महिलांची स्थिती सुधारली आहे. आशा कर्मचाऱ्यांपासून, आरोग्य प्रशासक व धोरण नियोजनात त्यांचा सहभाग आहे. परिचारिकांची कामेही त्या करीत आहेत. एकूण १०,३१,८०५ आशा कर्मतारी व २,२०,२०७ परिचारिका मार्च २०१८ अखेर काम करीत आहेत. या महिलाच देशाच्या आरोग्यव्यवस्थेचा कणा आहेत.

प्रत्येक गर्भवती महिलेची काळजी घेतली पाहिजे. बाळाच्या जन्मापूर्वी व नंतर त्यांची ही काळजी घेतली तरच ते आपल्या आरोग्यसेवेचे यश आहे त्यात बरेच यश येत आहे. पंतप्रधानांचा याबाबतचा विचार पुढे नेताना प्रधान मंत्री सुरक्षित मातृत्व योजना गर्भवती महिलांसाठी राबवली जात आहे. दर महिन्याच्या नऊ तारखेला यात गर्भवती महिलांची तपासणी केली जाते. त्यांना औषधे व वैद्यकीय सल्ला दिला जातो. जरी नऊ तारखेला ही तपासणी केली जात असली तरी इतरवेळीही सार्वजनिक आरोग्य केंद्रे या महिलांच्या सेवेसाठी सज्ज असतात. स्त्रीरोगतज्ज्ञ, रेडिओलॉजिस्ट, डॉक्टर यांच्यासेवा पीएमएसएमए अतंर्गत उपलब्ध आहेत. एप्रिल २०१८ अखेर १.४२ कोटी महिलांची तपासणी करण्यात आली असून सात लाख गर्भवती महिला जोखमीच्या अवस्थेत आढळून आल्या त्यांना योग्य तो आरोग्य सल्ला देण्यात आला. ग्रामीण पातळीवर ग्रामीण आरोग्य व पोषण दिन पाळण्यात येतो. त्यात महिलांच्या किमान चारवेळा तपासण्या केल्या जातात. लोह,फॉलिक असिड, कॅल्शियम यांची गर्भवती महिलांना खूप गरज असते. त्यांना

त्याच्या गोळ्या तपासणीच्यावेळी दिल्या जातात. गर्भारपणातील गुंतागुंत असेल तर सुरक्षित बाळंतपणाची जबाबदारी घेतली जाते. माता व बालक संरक्षण पत्रिका तयार करण्यात आल्या असून सुरक्षित मातृत्वाविषयी मार्गदर्शन करणाऱ्या पुस्तिकाही उपलब्ध करण्यात आल्या आहेत. गर्भारपणात नेमकी काय काळजी घ्याची याची सर्व माहिती त्यात दिली आहे. एवढेत नव्हे तर माहिती तंत्रज्ञानाता वापरकरून माता व बालक व्यवस्था तसेच पुनरूत्पादन बाल आरोग्य पोर्टल व किलकारी मोबाईल सेवा यांची व्यवस्था कऱ्ण्यात आली आहे त्यामुळे गरजू महिलांना आशा सेविका लगेच मदत करतात. गर्भवती महिलांना त्यांचे वय व अडचणी यावरून संदेश पाठवले जातात प्रत्यक्ष त्यांच्याशी संवादही साधला जातो.

जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमात गर्भवती महिलांना सार्वजनिक आरोग्य केंद्रात मोफत प्रसूती करून दिली जाते. शिवाय सिझरीयन शस्त्रक्रियेसाठीही कुठले पैसे आकारले जात नाहीत. यात मोफत निदान, औषधे, रक्त, आहार, वाहतूक सुविधा दिली जाते. घर ते संबंधित संस्था हा वाहतुकीचा खर्च सरकार करते. बाळंतपण झाल्यानंतर त्यांना सुरक्षित घरी नेऊन सोडले जाते. एकूण १.३३ कोटी गर्भवती महिलांना १०२ व १०८ क्रमांकावर कॉल करण्याच्यासेवेचा फायदा झाला आहे त्यांना मोफत वाहतूक सेवा मिळाली आहे. या क्रमांकावर त्या जवळच्या आशा सेविकांशी (मान्यता प्राप्त सामाजिक आरोग्य कर्मचारी म्हणजे अक्रीडेटेड सोशल हेल्थ अक्टीव्हिस्टशी) संपर्क साधता येतो. ऑक्सिलरी नर्स मिडवाइफ व पब्लिक हेल्थ फॅसिलीटी म्हणजे आया व सार्वजनिक आरोग्य सुविधेशी संपर्क करता येतो. अलिकडेच आम्ही लक्ष्य नावाचा कार्यक्रम राबवला असून त्यात प्रसूतीगृहे व तेथील प्रक्रिया सुधारण्यावर भर दिला आहे. जननी सुरक्षा योजनेत संस्थात्मक पातळीवर प्रसूतीसाठी थेट रोख हस्तांतर योजना आहे. प्रथम संदर्भ केंद्रे, माता व बाल आरोग्य केंद्रे, अतिदक्षता केंद्रे, आपत्कालीन उपचार केंद्रे यांना आता विशेष महत्व दिले असून घरातच बाळंतपणे करण्याची पद्धत कमी होत आहे. २०१५-१६ मध्ये ७८.९ टक्के प्रसूती संस्थात्मक पातळीवर झाल्या २००७-०८ मध्ये हे प्रमाण केवळ ४७ टक्के होते. कुठलेही बाळ जन्माला आल्यानंतर त्याचे पहिले हजार दिवस फार महत्वाचे असतात त्यातच त्याची जीवनक्षमता विकसित होत असते. वयाच्या दुसऱ्या वर्षापर्यंत माणसाचा मेंदू ८५ टक्के प्रमाणात विकसित झालेला असतो. ती त्याची घडणीची वर्षे असतात. त्यावेळी पुरेशी आरोग्य काळजी, चांगले पोषण व शिक्षण, सुरक्षित पर्यावरण मिळणे आवश्यक असते. याबाबत पालकांमध्ये जनजागृती होणे आवश्यक असते. बालकांचे पालनपोषण चांगले झाले पाहिजे त्यासाठी जर्नी ऑफ फर्स्ट १००० डेज ही पुस्तिका आरोग्य मंत्रालयाकडून प्रकाशित करण्यात आली आहे. प्रौढ महिला या सुदृढ असणे गरजेचे आहे. त्यामुळे आरोग्य समस्या व जोखमीचे मुद्दे त्यात लक्षात घ्यावे लागतात. माता व बाल आरोग्य यासाठी अनेक योजना मंत्रालयाने हाती घेतल्या असून त्यात राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रमाचा समावेश आहे. पौंगडावस्थेतील आरोग्य व जागृती, समुपदेशन, आरोग्य सेवा, सॅनटरी नॅपकिन या गोष्टी यात महत्वाच्या आहेत. फॉलिक असिडच्या गोळ्या यात दिल्या जातात. दर आठवड्याला फॉलिक असिडच्या गोळ्या हा फार महत्वाचा घटक आहे त्यातून शाळकरी मुले व मुली यांच्यात लोहाचे प्रमाण वाढते. अनिमिया टाळण्यासाठी अलबेडेझॉलच्या गोळ्या दिल्या जातात. एप्रिल २०१८ अखेर ३.७ कोटी मुला मुलींना लोहाच्या गोळ्या देण्यात आल्या दर आठवड्याला त्या दिल्या जातात यात २ लाख प्रशिक्षकांची निवड करण्यात आली होती त्यांनी यावर जनजागृतीचे काम केले. आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय यात मासिक पाळी आरोग्य योजनाही राबवत आहे. यात ग्रामीण भागातील १० -१९वयाच्या मुलींना आरोग्याचे धडे दिले जातात. त्यासाठी ७५१६ उपचार व सल्ला केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. शहरी भागातही अशी केंद्रे आहेत. प्रत्येक महिलेस तिच्या संतती निर्मितीचे नियोजन करण्याचा अधिकार आहे. दोन मुलांमध्ये अंतर ठेवण्यासाठी अनेक पर्याय यात मांडले जातात. मेड्रॉक्सी प्रोजेस्टेरॉन असिटेट (अंतरा) या संततीप्रतिबंधकाचे इंजेक्शनही यात दिले जाते. आठवड्याला सेंक्रोमन गोळी(छाया) यात दिली जाते. यात गर्भपातानंतरही मदत केली जाते. नसबंदी, दोन मुलांमध्ये अंतर या सगळ्या सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. संततिनियमन औषधे आशा कर्मचारी घरपोच देतात. विवाहानंतर पाळणा कसा लांबवायचा याचे उपाय व त्याची अंमलबजावणी याचे प्रशिक्षण

**जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमात गर्भवती महिलांना सार्वजनिक आरोग्य केंद्रात मोफत प्रसूती करून दिली जाते. शिवाय सिझरीयन शस्त्रक्रियेसाठीही कुठले पैसे आकारले जात नाहीत. यात मोफत निदान, औषधे, रक्त, आहार, वाहतूक सुविधा दिली जाते. घर ते संबंधित संस्था हा वाहतुकीचा खर्च सरकार करते. बाळंतपण झाल्यानंतर त्यांना सुरक्षित घरी नेऊन सोडले जाते.**

आशा कर्मचाऱ्यांना असते त्यामळे ते ही माहिती महिलांना देतात. पहिल्या मुलानंतर तीन वर्षे पुढचे मूल होण्याचे टाळले जाते.मुलींना आरोग्यदायी बालपण मिळावे यासाठी अनेक सेवा उपलब्ध आहेत.जिल्हा पातळीवर नवजात बालकांसाठी विशेष काळजी घेणारी केंद्रे स्थापन करण्यात आली आहे. उप जिल्हा पातळीवरही अशी केंद्रे आहेत. आशा कर्मचारी घरी जाऊनही योग्य तो सल्ला देण्याचे काम करीत आहेत. जगात रोग प्रतिबंधक लसीकरणाचा सर्वात मोठा कार्यक्रम भारतात राबवण्यात आला असून ती अभिमानाची बाब आहेत. दोन वर्षाच्या मुलांपर्यंत लसीकरण केले जाते व महिलांनाही लसी दिल्या जातात. सर्व मुले व गर्भवती महिला यांच्या लसीकरणासाठी २०१४ मध्ये इंद्रधनुष योजना सुरू करण्यात आली. आतापर्यंत ३.१५ कोटी बालकांचे लसीकरण झाले असून त्यातील ८०.५८लाख बालकांची लसीकरणाची सगळी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. ८०.६३ लाख गर्भवतींचे लसीकरण करण्यात आले असून ९१.९४ लाख महिलांना अ जीवनसत्वाची मात्रा देण्यात आली आहे. पोषण पुनर्वसन केंद्रांचा विचार करता अशी ११५० केंद्रे सुरू केली असून त्यात कुपोषित बालकांवर उपचार केले जातात. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमात बालकांच्या जीवनाचाच दर्जा उंचावला जातो. जन्मदोष, रोग, कमतरता यात लक्ष दिल जाते. या कार्यक्रमात सप्टेंबर २०१७ अखेर ७०.९ कोटी बालकांची तपासण केली असून १.५५ कोटी बालकांवर उपचार करण्यात आले आहेत. मोफत औषधे व तपासणी योजनेत आवश्यक औषधे आरोग्य केंद्रात दिली जातात. फिरती वैद्यकीय केंद्रे सुरू असून महिलांना मोफत आरोग्य सुविधा दिल्या जात आहेत. त्यासाठी राज्यांना १६००० कोटी रूपये तीन वर्षात दिले असून आयुष्मान भारत योजनेत महिला आरोग्य व कल्याण केंद्रातूनअनेक सुविधा दिल्या जाणार आहेत. सर्वंकष प्राथमिक आरोग्य काळजीला यात महत्व असून माता व बालके यांच्यासाठी दीड लाख केंद्रे सुरू केली जाणार आहेत. मध्यम टप्प्यात आरोग्याच्या काळजीसाठी प्रशिक्षण दिले जाणार असून संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोगांवर उपचार व सेवा उपलब्ध होतील. यातून आरोग्य कर्मचारी महिलांना रोजगारही मिळणार आहेत. महिलांच्या सर्वंकष आरोग्यासाठी सरकार प्रयत्नशील असून त्यातून पाच वर्षाखालील मुलांच्या मृत्यूचे प्रमाण भारतात कमी झाले आहे. माता मृत्यूंचे प्रमाणही काळजी घेतल्याने घटत आहे. एप्रिल २०१५ मध्ये भारतात माता व बालकांमधील धनुर्वाताचे उच्चाटन करण्यात मोठे लक्ष्य गाठले आहे. जागतिक लक्ष्य पातळीच्या आपण खूपच पुढे आहोत. सहस्रक विकास उद्दिष्टे साध्य करण्यात आपला देश आघाडीवर असून त्यात माता मृत्यूचेप्रमाण कमी करणे हा महत्वाचा टप्पा गाठछला आहे. माता मृत्यूचे प्रमाण २०११-१३ मध्ये लाखात १६७ होते ते आता १३०पर्यंत खाली आले आहे. अनेक दशकातील ही चांगली कामगिरी आहे. याचा अर्थ २०११-१३ दरम्यान आपण १२००० गर्भवती महिलांचे प्राण वाचवण्यात यश आले आहे. यात राज्यांचाही पाठिंबा मिळत असून आमच्या आघाडीवरील आशा कर्मचाऱ्यांचा यात मोठा वाटा आहे. शाश्वत विकास उद्दिष्टांची पूर्तता २०३० च्या आधी करता येईल असा आम्हाला विश्वास आहे.त्यातून भारतातील महिलांचे सक्षमीकरण होणार असून त्यांचे भवितव्य उज्ज्वल होईल यात शंका नाही

**२०१४ मध्ये इंद्रधनुष योजना सुरू करण्यात आली. आतापर्यंत ३.१५ कोटी बालकांचे लसीकरण झाले असून त्यातील ८०.५८लाख बालकांची लसीकरणाची सगळी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. ८०.६३ लाख गर्भवतींचे लसीकरण करण्यात आले असून ९१.९४ लाख महिलांना अ जीवनसत्वाची मात्रा देण्यात आली आहे.**

■■■


*लेखिका केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयात सचिव पदीकार्यरत आहेत.*

*ई मेल: sechfw@nic.in*


विकास समर्पित मासिक
**योजना**
नियमित वाचा,
वर्गणीदार व्हा.

# स्त्रिया आणि अर्थविषयक नागरी हक्क

-ब्रिंदा विश्वनाथन/ संजना शर्मा




**स्त्रियांनी करावयाची कामे वेगळी ठरविल्यामुळे किंवा ठराविक कामे स्त्रियांनीच करायची अशी भूमिका घेणे, स्त्री आणि पुरुष यांना एकाच कामासाठी देण्यात येणाऱ्या मजुरीतील तफावत आणि उत्पादनक्षम स्त्रोतांची अनुपलब्धता या सगळ्या कारणांमुळे आर्थिक विषमता वाढीस लागते आणि स्त्रियांना अर्थविषयक संपूर्ण नागरी हक्क मिळवण्यात अडथळे येतात. मानवी क्षमता आणि बुद्धिमत्तेच्या अयोग्य वितरणाचा परिणाम स्थूल राष्ट्रीय उत्पादनावर होत असतो.**

भारतात, सज्ञान स्त्रियांची प्रमुख भूमिका गृहिणीचीच आहे. भरघोस उत्पन्न किंवा पगार मिळवणाऱ्या स्त्रियांची संख्या तुलनेने कमी आहे. उच्च आर्थिक वाढीच्या काळात तर ती अजूनच कमी झालेली दिसते. स्त्रियांनी करावयाची कामे वेगळी ठरविल्यामुळे किंवा ठराविक कामे स्त्रियांनीच करायची अशी भूमिका घेणे, स्त्री आणि पुरुष यांना एकाच कामासाठी देण्यात येणाऱ्या मजुरीतील तफावत आणि उत्पादनक्षम स्त्रोतांची अनुपलब्धता या सगळ्या कारणांमुळे आर्थिक विषमता वाढीस लागते आणि स्त्रियांना अर्थविषयक संपूर्ण नागरी हक्क मिळवण्यात अडथळे येतात. मानवी क्षमता आणि बुद्धिमत्तेच्या अयोग्य वितरणाचा परिणाम स्थूल राष्ट्रीय उत्पादनावर होत असतो. रोजगार किंवा नोकऱ्यांमध्ये स्त्रियांचा सहभाग १० टक्क्यांनी वाढला तरी २०२५ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये ७०० अब्ज अमेरिकी डॉलर्सची भर पडेल.

स्त्रियांना नोकरीधंद्याच्या संधी उपलब्ध करून देणे, त्या देखील भेदभावरहित वातावरणात, यावर लक्ष केंद्रित करण्याच्या दृष्टीने या लेखात भारतातील स्त्रियांच्या रोजगाराविषयीची काही विशिष्ट तथ्ये आणि त्यावर परिणाम करणारे घटक मांडले आहेत. सरकारने आणि इतर संबंधित व्यक्तींनी सुरु केलेल्या काही नव्या योजनांचा देखील यात सहभाग आहे.

### भारतासाठीची विशिष्ट तथ्ये

भारतातील कामगार शक्तीमध्ये आधीच कमी असलेले स्त्रियांच्या सहभागाचे प्रमाण जगातील इतर कोणत्याही भागाशी तुलना केली तर अधिकच घसरलेले दिसेल.(आकृती क्रमांक १), कामाच्या क्षेत्रात सहभागी होणाऱ्या स्त्री पुरुषांच्या प्रमाणातील तफावत (आकृती क्रमांक २अ), शहरी भागातील कमी आणि न वाढणारे आणि ग्रामीण भागात सतत कमीच होत जाणारे सहभागाचे प्रमाण,सर्व प्रदेशातील आणि सर्व क्षेत्रातील कामगार वर्गातून स्त्रियांचा कमी होत जाणारा सहभाग हे या विषयातील विचार करण्यासारखे प्रमुख मुद्दे आहेत. दिल्लीत नोकरी किंवा इतर उद्योगात काम करणाऱ्या



स्त्रियांचे प्रमाण १७% आहे तर इतर महानगरांमध्ये ते २४% आहे. लुधियानात कामकरी पुरुषांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ८३% आहे मात्र स्त्रियांचे प्रमाण फक्त १२% आहे.


आकृती क्र.१: जगाच्या आणि भारताच्या सर्व प्रदेशांमध्ये स्त्रियांचा कामातील सहभागाचा दर स्त्रोत: जागतिक विकास निर्देशक अहवाल


जास्तीच्या कामासाठी अधिकाधिक स्त्रिया उपलब्ध असून त्यांचे वाढते उत्पन्न हे देखील यासाठी एक महत्त्वाचे कारण आहे. स्त्रियांमध्ये काम करून उत्पन्न वाढविण्याची गरज आणि तीव्र इच्छा आहे. त्यांचा बेरोजगारीचा दर देखील पुरुषांपेक्षा जास्त आहे (आकृती क्र. २ ब). पुरुषांचा बेरोजगारी दर प्रामुख्याने ग्रामीण क्षेत्रात २-३% आणि शहरी भागात ३-४% इतका राहिला आहे. तर स्त्रियांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण ग्रामीण भागात ३-४% आणि शहरी भागात ७ ते ९% च्या दरम्यान राहिले आहे.

आकृती क्र.२ अ : कामातील आकृती क्र.२ ब : बेरोजगारीचा दर

**सहभागाचा दर.**

सूचना : स्त्रोत : राष्ट्रीय सर्वेक्षण कार्यालय अहवाल ५५४. प्रमाण दरहजारी.





सन २०११-१२ मध्ये झालेला भारतीय मानव विकास सर्वेक्षण अहवाल असे दर्शवितो की कोणत्याही क्षेत्रात काम करताना स्त्रियांना व्यक्तिगत आणि कौटुंबिक पातळीवर अडचणींना तोंड द्यावे लागते. (आकृती क्र.३)

आकृती क्र.३(अ): जर योग्य नोकरी आकृती क्र.३(ब):जर तुमच्यायोग्य मिळाली तर काम करायची तुमची नोकरी तुम्ही शोधलीत तर ती इच्छा आहे का? करायची परवानगी तुम्हाला घरून मिळेल का?

स्त्रियांचे कामातील सहभागाचे प्रमाण वाढत्या शिक्षणासोबत कमी होताना दिसते, मात्र, आणखी उच्च शिक्षणासोबत ते किंचित वाढलेले दिसते. तसेच ते २००५ मधल्यापेक्षा (आकृती क्र.४, तक्ता १) २०११ मध्ये (आकृती क्र. ४, तक्ता२) जास्त आहे आणि महानगरे नसलेल्या शहरांपेक्षा महानगरांमध्ये हे प्रमाण जास्त आहे. २०११-१२ या वर्षीच्या कोणत्याही शैक्षणिक विभागाचा विचार केला तरी स्त्रियांमधील बेरोजगारीचे प्रमाण २ ते ५ टक्क्यानी जास्तच आहे. ग्रामीण विभागातील उच्च माध्यमिक आणि पदविका पातळीपर्यंत शिक्षण घेतलेल्या स्त्रियांमध्ये तर बेरोजगारीचे प्रमाण आणखी जास्त, सुमारे १७-१८% आहे. याच शैक्षणिक पात्रतेच्या पुरुषांमध्ये फक्त ४ ते ५ टक्के पुरुष बेरोजगार असल्याचे दिसून आले आहे.

आकृती क्र. ४: विविध शैक्षणिक पात्रता असलेल्या स्त्री-पुरुषांच्या सन २००५ (तक्ता१) आणि २०११(तक्ता२) मधील नोकरीधंद्यातील सहभागाचे प्रमाण

नोकरी अथवा रोजगाराचे स्वरूप प्रदेश, उद्योगाचा प्रकार आणि विभागानुसार बदलत असते. दक्षिणेकडील राज्यांपेक्षा उत्तरेकडच्या राज्यांमध्ये स्त्रियांचा कामे करण्यातील सहभाग कमी आहे; शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही विभागांमध्ये अनुदानावर





आधारित छोट्या उद्योगांमध्ये काम करणाऱ्या बायकांचे प्रमाण जास्त आहे आणि त्यातील बहुसंख्य बायका कृषी विभागाशी संबंधित कामे करताना दिसतात. त्याखालोखाल, सार्वजनिक सेवा क्षेत्रात, जिथे राज्य सरकार सर्व नियुक्त्यांसाठी प्राथमिक नियोक्ता म्हणून काम पाहते, तिथेही काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. त्यानंतर क्रमांक लागतो वस्त्रोद्योगासारख्या उत्पादन क्षेत्रांचा. यातही काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण कमीच आहे.


**स्त्रियांनी नोकरी किंवा उद्योगधंद्यात सहभागी होण्याच्या प्रमाणावर परिणाम करणारे घटक**

स्त्रियांनी घराबाहेर जाऊन जे काम करायचे आहे ते करण्यासाठी आवश्यक असलेल्या संरचनात्मक घटकांची पूर्तता करण्याची गरज आणि कुटुंबाची भूमिका तसेच इतर सामाजिक रूढी-परंपरा यासारख्या सांस्कृतिक घटकांचा परिणाम स्त्रियांच्या नोकरी करण्यावर किंवा उद्योग उभारण्यावर होत असतो.

संपूर्ण कुटुंबाची काळजी घ्यायची जबाबदारी आणि घरातील कामांसाठी घरचे पुरुष देत असलेला मर्यादित वेळ ही महिलांना नोकरी किंवा उद्योगात सहभागी होण्यापासून रोखणारी प्रमुख कारणे आहेत. आणि अभ्यासातून असे लक्षात आले आहे की घरगुती मदतीसाठी कुणालातरी नोकरीवर ठेवण्यामुळे किंवा कुटुंबातील सदस्यांनी दिलेल्या अनौपचारिक पाठिंब्यामुळे स्त्रियांना नोकरी, उद्योगासाठी वेळ काढणे सहज शक्य होते आणि त्यांचे कामात सहभागी होण्याचे प्रमाणही सुधारते.

स्त्रियांना कामाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी चांगली वाहतूक व्यवस्था सहजतेने उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांचा वेळ वाचेल आणि त्यामुळे,घराची काळजी घेण्यासोबतच अर्थार्जनासाठी त्या स्वत:ला सक्षम बनवू शकतील. ग्रामीण भागात जिथे जिथे राज्य सरकारने वाहतुकीच्या सोयीचा विस्तार करून दिला आहे तिथे तिथे बिगर कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले. घरगुती तसेच सामाजिक पातळीवर लिंगसापेक्ष






परंपरा बदलणे देखील शक्य व्हायला हवे. देशाच्या काही राज्यांमध्ये (आसाम, गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र आणि तामिळनाडू) स्त्रियांना सरकारी नोकऱ्यांमध्ये ३०% आरक्षण ठेवण्यात आले आले आणि याचा सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार संधींवर कोणताही दुष्परिणाम झालेला नाही. जगभरच्या व्यापार चालविण्यासाठीच्या धोरणांचा एक भाग म्हणून भारत सरकारने २०१३ पासून कार्यकारी मंडळांमध्ये स्त्रियांसाठी आरक्षित जागा ठेवायला सुरुवात केली. महिलांच्या वाढत्या उपस्थितीमुळे कंपनीची मूल्ये आणि कामगिरी सुधारायला मदत होते मात्र, कुटुंबाच्या मालकीच्या कंपन्यांमध्ये निर्णय घेण्याचे अधिकार कुणाच्या हातात आहेत त्याच्या मर्जीमुळे हे शक्य होतेच असे नाही.

राज्यात घडणाऱ्या लैंगिक छळवणुकीच्या आणि इतर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारांनी दाखवलेली सतर्कता, रात्रपाळी करणाऱ्या महिलांसाठी योग्य कायद्याचे संरक्षण आणि महिला उद्योजकांना दिला जाणारा प्रोत्साहनपर लाभांश यामुळे विविध राज्यांमध्ये महिलांच्या कामातील सहभाग दरावर परिणाम होत असतो. जिथे पोलीस आणि न्यायव्यवस्थेवर लोकांचा जास्त विश्वास आहे आणि गुन्हेगारीचे प्रमाण कमी आहे अशा ठिकाणी स्त्रियांनी अर्थार्जनासाठी काम करण्याचे प्रमाण वाढलेले दिसते.

त्याचबरोबर शेवटी आणखी एक महत्वाचा घटक म्हणजे स्त्रियांचे राजकारणातील प्रतिनिधित्व. स्त्रियांना राजकीय प्रतिनिधित्व मिळाल्यामुळे त्यांना पक्के रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि बँकांसारख्या सोयी-सुविधा सुलभतेने मिळवता येतात आणि त्यांच्या योगे स्त्रियांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे सोपे जाते. महिला नेत्यांनी राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या पदांवर असण्यामुळे, त्यांच्या मतदारसंघातील महिला मतदारांना त्यांचे काम करण्यासाठी प्रोत्साहक वातावरण मिळते.

**समारोपाची टिप्पणी**

स्त्रियांच्या अर्थविषयक नागरी हक्कांच्या सशक्तीकरणासाठी, घराच्या उत्पन्नाला हातभार लावणारी आणि घराची काळजी घेणारी या भूमिकांसोबतच तिने स्वीकारलेल्या कामातून तिच्या व्यक्तिगत आकांक्षा पूर्ण होणेदेखील महत्त्वाचे आहे. घराच्या आणि समाजाच्या वर्तुळात स्त्रियांवरची सामाजिक-सांस्कृतिक बंधने शिथिल होण्यासोबतच त्यांना उत्तम सार्वजनिक सेवा-सुविधा पुरविण्यात राज्य सरकारांनी प्रशासकाची भूमिका निभावली तर स्त्रियांना स्वत:च्या सर्वसमावेशक व्यक्तित्व विकासाचा पाठपुरावा शक्य आहे.

करकपातीसारख्या आर्थिक धोरणांमुळे महिलांमध्ये रोजगार वाढायला काहीच मदत होत नाही कारण, त्यातून मिळणाऱ्या फायद्यातून त्यातील गुंतवणुकीची भरपाई होऊ शकत नाही. औपचारिक क्षेत्रातील रोजगार क्षेत्राचा एकूण रोजगारातील कमी वाटा आणि या क्षेत्राच्या वाढीची कमी शक्यता यामुळे, २०१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या, नवनियुक्त महिला कामगारांचे भविष्य निर्वाह निधीतील योगदान १२% वरून ८% पर्यंत कमी करुन त्यांचे प्रत्यक्ष हातात मिळणारे वेतन वाढविण्याची योजना स्त्रियांना जास्तीत जास्त प्रमाणात नोकरी-उद्योग करण्यासाठी प्रोत्साहक ठरेल किंवा सध्या रोजगार हातात असलेल्या स्त्रिया भविष्यात त्यांचे काम सुरूच ठेवतील याची खात्री देता येत नाही.

सरकारी धोरणांमुळे समानता आणि वाढ यांच्यातील तफावत दूर झाली.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे जास्तीत जास्त स्त्रियांना रोजगार उपलब्ध झाला, इतर क्षेत्रातील कामकरी स्त्री पुरुषांच्या मजुरीच्या दरातील तफावत कमी झाली. या सगळ्याचा सकारात्मक परिणाम म्हणून गरिबी कमी झाली, स्त्रियांचा आणि त्यांच्या मुलांचा पोषणाचा दर्जा उंचावला तसेच महिला सक्षमीकरण वाढू लागले. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या विस्तारामुळे आशा कर्मचाऱ्यांची संख्या वाढली आहे. याचादेखील सहभाग दरावर चांगला परिणाम झाला आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेसोबतच, पाळणाघर सुविधेलासुद्धा प्रोत्साहन द्यायला हवे कारण या दोन्ही योजनांमध्ये काम करणाऱ्या किंवा या सेवा पुरविणाऱ्या स्त्रियाच असतात. त्यामुळे भारतात ग्रामीण पातळीवर या दोन्ही योजना मोठ्या प्रमाणावर चालविल्या तर त्या भागातील स्त्रिया मोठ्या प्रमाणावर ही कामे करू शकतील आणि अधिकाधिक महिलाशक्ती कार्यप्रवाहात सामील होईल. पाळणाघर योजनेमुळे छोट्या मुलांची दिवसभर काळजी घेणारा उत्तम पर्याय मिळाल्यामुळे स्त्रिया त्यांची मुले पाळणाघरात ठेवून निर्धास्तपणे त्यांचे काम करू शकतील आणि त्यांच्या कामात अधिकाधिक एकाग्र होऊ शकल्यामुळे कामाचा दर्जाही उंचावेल.

सन २०१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात महिला आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी केलेली १७३ कोटींची अतिरिक्त तरतूद आणि तमिळनाडूत काम करणाऱ्या स्त्रियांसाठी अनुदान तत्वावर स्कूटर खरेदीची योजना या दोन्ही महत्वाच्या योजना आहेत. पण त्याचे फायदे कळण्यासाठी थोडी वाट पहावी लागेल.

सुरक्षित वातावरणात काम करता येणे आणि आपल्या शहरापासून दूर राहून काम करणाऱ्या स्त्रियांसाठी त्यांना परवडणाऱ्या दरात राहायची सोय उपलब्ध करून देणे या हेतूने, अशा स्त्रियांसाठी वसतिगृहाची योजना आणली गेली.

प्रसूतीविषयक लाभ कायदा १९६१मध्ये सुधारणा करून २०१७ मध्ये प्रसूतीविषयक लाभ सुधारित कायदा २०१७ आणला गेला. या सुधारित कायद्यात, प्राधान्याने, पगारी प्रसूती रजेचा कालावधी १२ आठवड्यांवरुन वाढवून २६ आठवडे करणे, या २६ आठवड्यांनंतर स्त्रियांना 'घरातून काम करण्याचा' पर्याय उपलब्ध करून देणे, त्याचसोबत त्यांना पाळणाघराची सोय करून देणे तसेच मूल दत्तक घेणाऱ्या स्त्रियांना मुलांची काळजी घेता यावी म्हणून रजा मंजूर करणे, यासारख्या तरतुदींचा अंतर्भाव आहे. मात्र या तरतुदींचा फायदा संघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांना मिळणार आहे, असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांना याचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे, या तरतुदींच्या परिणामांचा अभ्यास करावा लागेल.

'मेक इन इंडिया' आणि 'डिजिटल इंडिया' या मोहिमांचा एक भाग म्हणून भारतीय महिला उद्योजकांसाठी ऑनलाईन बाजाराचा पर्याय सरकारने उपलब्ध करून दिला आहे. 'महिला-ई-हाट' नावाचा हा ई-व्यापार मंच महिला उद्योजकांना मोठ्या पातळीवरचे बाजार मिळवून देईल. प्रधानमंत्री मुद्रा योजनेतून छोटे उद्योग करणाऱ्यांना आर्थिक मदत दिली जाते आणि महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेतून कर्ज घेताना त्यांना पाव टक्क्याची सूट मिळते. स्त्रियांसाठी अशा अनेक योजना राबवून आणि स्त्रियांच्या कामाविषयी जाणीवपूर्वक जनजागृती करून स्त्रियांना आपलीशी वाटेल अशी अर्थव्यवस्था उभारायला मदत होईल. उदाहरणार्थ, सेवा बॅंकेने आर्थिक मदत पुरवतानाच सुरुवातीला कार्यशाळा आयोजित करून स्थानिक समाजात सेवांचे जाळे वाढवायला सुरुवात केली. या प्रयत्नांचा चांगला परिणाम या परिसरातील स्वयंरोजगारावर दिसून आला.

यात भर म्हणून, स्वच्छ भारत अभियानाच्या संदर्भात वागणुकीचे काही मुद्दे लक्षात घ्यायला हवे, कारण सामाजिक रूढी-परंपरा बदलायला वेळ लागतो. त्यातही पूर्ण समाजाच्या सहभागामुळे काही गोष्टी बदलायला हातभार लागतो हे सत्य आहे. वेळोवेळी जमा केलेल्या माहितीतून आपल्याला, स्त्रिया त्यांचा वेळ समाजासाठी काही उत्पादन करायला कसा वापरतात हे तर कळेलच, त्याचबरोबर, अनेक कुटुंबांमध्ये घरगुती कामे करण्यात घरचे पुरुष कसा भाग घेतात हेही लक्षात येईल. कुटुंबातल्या सदस्यांची काळजी घेणे आणि कुटुंबासाठी पैसे मिळविणे या दोन्ही गोष्टी कोणत्याही देशातील व्यक्तीच्या अधिकाधिक चांगल्या जीवनासाठी सारख्याच महत्त्वाच्या आहेत.

शेवटी तात्पर्य काय, तर जेव्हा विकासाला अनुकूल धोरणे आणि संस्था यांच्यात सकारात्मक सुधारणा होते तेव्हा स्त्रियांसहीत सर्व सामाजिक दृष्ट्या वंचित घटकांना आर्थिक नागरी हक्क मिळतात.

■■■

*ब्रिंदा विश्वनाथन चैन्नई येथील मद्रास स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या प्राध्यापिका आहेत.*

*ई मेल: brinda@mse.ac.in*

*संजना शर्मा नवी दिल्ली येथील रॉयल बॅंक ऑफ स्कॉटलॅंड मध्ये कार्यरत आहेत.*

*ई मेल: sanjanasharma339@gmail.com*

धोरण

# महिला नेतृत्वाखालील विकासाद्वारे राष्ट्राचे सक्षमीकरण

**-मनेका संजय गांधी**



**शालेय शिक्षणात मुलगा आणि मुलगी असा भेदभाव न ठेवता त्यात समानता आणण्यात भारताला यश मिळाले आहे. वैद्यकीय,विधी,माहिती तंत्रज्ञान, अभियांत्रिकी,व्यवस्थापन यासारख्या तंत्र-शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणातही महिला प्रतिनिधित्वात लक्षणीय वाढ दिसत आहे. महिला साक्षरतेतही वाढ झाली असून १९५१ मधल्या केवळ ९% महिला साक्षरतेवरून २०११ मध्ये हे प्रमाण ६५% झाले आहे. परिस्थितीत बदल घडवून आणणारा हा मोठा घटक आहे.**

भारताच्या लोकसंख्येत साधारणत: निम्मी संख्या महिलांची आहे.गेल्या काही वर्षापासून सार्वजनिक जीवनात,कार्यालयात, आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात,सरकारी कार्यालयात,राजकारणात,आंतरराष्ट्रीय संस्थात आणि अशा अनेक ठिकाणी महिलांचा वावर वाढला आहे.हा बदल सकारात्मक असून आधीपेक्षा हा बदल आता झपाट्याने घडत आहे.

महिला सबलीकरणाच्या क्षेत्रात सध्या घडणाऱ्या घडामोडी मोठ्या प्रमाणात प्रोत्साहनदायी आहेत असे मला वाटते. भारतीय हवाई दलात, लढाऊ विमानाची वैमानिक म्हणून पहिल्या महिला वैमानिकाची नुकतीच नियुक्ती झाली.लष्करात लढाऊ फळीत महिलांच्या सहभागाबाबत विचार सुरु आहे. ऑलिम्पिक,राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आणि क्रिकेटसह अनेक आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धात भारतीय महिलांची चमकदार कामगिरी पाहायला मिळत आहे. भारताचे यशस्वी मंगळयान आणि १०४ छोटे उपग्रह कक्षेत सोडण्याचा विक्रम यामागे महिला वैज्ञानिकांचा चमू होता.या महिला देशासाठी आदर्श आहेत आणि 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या घोष वाक्यातून याची प्रचीती येत आहे.

शालेय शिक्षणात मुलगा आणि मुलगी असा भेदभाव न ठेवता त्यात समानता आणण्यात भारताला यश मिळाले आहे. वैद्यकीय, विधी, माहिती तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, व्यवस्थापन यासारख्या तंत्र-शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणातही महिला प्रतिनिधित्वात लक्षणीय वाढ दिसत आहे. महिला साक्षरतेतही वाढ झालीअसून १९५१ मधल्या केवळ ९% महिला साक्षरतेवरून २०११ मध्ये हे प्रमाण ६५ % झाले आहे. परिस्थितीत बदल घडवून आणणारा हा मोठा घटक आहे.

भारतात, कामाच्या ठिकाणी प्रत्येक चौथा कामगार एक महिला असते. अधिक तंत्रविषयक आणि गुंतागुंतीचे काम असेल तर तिथे आपल्याला महिलांची संख्या नक्कीच जास्त आढळेल.अभियंत्यांपैकी एक तृतीयांश महिला आहेत तर प्राथमिक स्तरावर काम करणाऱ्या आरोग्य सेवकांपैकी तीन चतुर्थांश महिला आहेत. वैद्यकीय संशोधक, बँक कर्मचारी,माहिती तंत्रज्ञान कर्मचारी,सनदी लेखापालांपैकी सुमारे एक तृतीयांश महिला राहतील असा अंदाज आहे. देशात उद्योजकतेला मोठा वाव मिळत असून सध्या प्रत्येक पाचवी महिला ही उद्योजक आहे.

राजकारणातही महिलांची आकडेवारी आधीपेक्षा,नक्कीच उत्साहवर्धक आहे. पंचायत सदस्यांपैकी सुमारे ४६ % सदस्य लोकनियुक्त महिला प्रतिनिधी आहेत. याबरोबरच गाव पातळीवर, १.३ दशलक्षपेक्षा जास्त महिला सत्ता स्थानी आहेत, गाव-खेड्या पासून आपल्या देशाचे चित्र बदलत आहे. उदाहरणार्थ, १९५७ मध्ये, केवळ ४५ महिलांनी निवडणूक लढवली होती तर २०१४ च्या निवडणुकीत,

६६८ महिला निवडणुकीच्या रिंगणात होत्या.

आरोग्याच्या आघाडीवरही सुधारणा दिसून येत आहे. १९५० – ५१ मधे महिलांचे साधारणत: आयुष्यमान ३१.७ वर्षे असे, २०१६ मधे हे प्रमाण सुमारे ७० वर्षे झाले आहे. प्रसूतीसाठी घरी राहण्यापेक्षा रुग्णालयात दाखल होण्याकडे कल मोठ्या प्रमाणात वाढला असून २०१४ – १५ मधे दवाखान्यात प्रसूतीसाठी दाखल होणाऱ्या महिलांचे प्रमाण ७९ % असे आतापर्यंतचे सर्वोच्च होते. बालक आणि मातेच्या आरोग्याच्या दृष्टीने हे चांगले आहे. २००१-०३ ते २०११-१३ या काळात प्रसूती दरम्यान माता मृत्यूचे प्रमाण निम्म्याने कमी झाले. गेल्या काही वर्षात महिलांच्या वित्तीय समावेशकतेत लक्षणीय वाढ झाली आहे. स्वत:च्या बँक खात्याच्या व्यवहार स्वत:च करणाऱ्या बँक किंवा बचत खातेधारी महिलांच्या संख्येत वाढ झाली असून २००५-०६ मधे १५% असणारी ही संख्या २०१५-१६ मधे ५३% वर पोहोचली होती.

ही सकारात्मक आकडेवारी असूनही आपल्या देशात दुर्दैवाने महिलांना जीविताला धोका असणाऱ्या परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. महिलांप्रती हिंसाचाराच्या अनेक भयावह घटना आपण ऐकतो,त्याच वेळी अनेक मुली भावंडांचा सांभाळ करण्यासाठी शाळा सोडत आहेत अथवा लग्नामुळे शाळा सोडत आहेत.घरातआणि शेतात अशा दोनही ठिकाणी, मोबदला मिळत नाही अशा कामामध्ये महिलांचे अद्यापही मोठे प्रमाण आहे. आपल्या आर्थिक बाबींवर अधिक नियंत्रण असूनही घरात अथवा कार्यालयीन निर्णयात, त्यांना बरोबरीची संधी अनेकदा दिली जात नाही. अगदी आताच्या काळातही हे जीवनाचे प्रखर वास्तव आहे. भारतीय महिलांचे खरेखुरे सबलीकरण हवे असेल तर महिलांप्रती सुरु असलेला हा भेदभाव आणि हिंसाचाराची दखल घेऊन त्यासंदर्भात कृतीही हवी.

भारतीय महिलांना ग्रासणाऱ्या या समस्या म्हणजे आपल्या संपूर्ण समाजाला ग्रासणाऱ्या समस्या आहेत असा सरकारचा दृष्टीकोन आहे. स्त्री-पुरुष समानता राखण्यासाठी सर्वतोपरी कार्य करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे.महिला सबलीकरणावाचून केलेली कोणतीही प्रगती देशात टिकून राहणार नाही.

---

**शिक्षण आणि कामाच्या ठिकाणी महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य राखण्यासाठी,सार्वजनिक आणि राजकीय सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी,त्यांना कुटुंबात आणि इतरत्र समान वागणूक मिळावी यासाठी अनेक कायदे संमत करण्यात आले असून अनेक योजनांची अंमलबजावणी करण्यात आली आहे.**

---

महिलांच्या विकासासाठी सुरक्षित आणि प्रोत्साहनदायी वातावरणाबरोबरच त्यांना समान संधी मिळावी यासाठी सरकारणे अनेक उपाययोजना केल्या आहेत. शिक्षण आणि कामाच्या ठिकाणी महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य राखण्यासाठी,सार्वजनिक आणि राजकीय सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी,त्यांना कुटुंबात आणि इतरत्र समान वागणूक मिळावी यासाठी अनेक कायदे संमत करण्यात आले असून अनेक योजनांची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

समस्येच्या मुळावरच घाव घालण्यासाठी,मानसिकतेशी निगडीत गुंतागुंतीच्या समस्येशी निगडीत आम्ही 'बेटी बचाओ,बेटी पढाओ' अभियान, सर्व जिल्ह्यात हाती घेतले आहे. महिला आणि मुलीप्रती,समाजाने आपली मानसिकता बदलली नाही तर महिला सबलीकरणाच्या इतर उपक्रमात शाश्वत यश पाहायला मिळणार नाही.

या अभियानाबरोबरच २०१५ मधे सुकन्या समृद्धी योजना सुरु करण्यात आली. या योजनेअंतर्गत मुलींच्या बँक खात्यात अल्प रक्कम जमा करता येते,त्यावर उच्च व्याज दराचा लाभ मिळतो.मुलीला १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर ही रक्कम काढता येते, मुलीच्या उच्च शिक्षणासाठी किंवा इतर गुंतवणुकीसाठी याचा वापर करता येतो. १.३९ कोटी खाती आतापर्यत उघडण्यात आली असून त्यात एकूण २५,९७९ कोटी रुपये रक्कम जमा आहे.

महिलांच्या सबलीकरणामधे आर्थिक सबलीकरण केंद्र स्थानी आहे आणि वित्तीय समावेशकता हा त्याचा महत्वाचा भाग आहे.काही वर्षापूर्वी बँक खाते उघडणे हे निरस काम होते. बँकिंग व्यवहाराशी आतापर्यंत जे लोक जोडले गेले नव्हते त्यांना सुकन्या समृद्धी योजना आणि पंतप्रधान जन धन योजनेमार्फत बँकिंग सेवा कक्षेत आणण्यात आले.जन धन अंतर्गत १६.४२ कोटी महिलांची खाती उघडण्यात आली.सर्वोच्च ४० बँकाकडून आणि प्रादेशिक ग्रामीण बँकाकडून प्राप्त आकडेवारीनुसार एकूण बचत खात्यातला महिलांचा वाटा वाढला असून २०१४ मध्ये हा वाटा २८% होता त्यात वाढ होऊन २०१७ मधे तो ४०% झाला आहे.महिलांच्या वित्तीय समावेशकतेची ही वाढ आहे.

प्रधान मंत्री मुद्रा योजने अंतर्गत आमच्या सरकारने लहान उद्योजकांना तारण अथवा हमीदारावाचून पत पुरवठा केला.यापैकी ७५ % कर्ज महिलांना

दिले गेले आहे. या योजनेंतर्गत ९.८१ कोटी महिलांना आतापर्यंत लाभ मिळाला आहे. राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियाना अंतर्गत ४७ लाखापेक्षा जास्त महिला स्वयं सहाय्यता गटांना २००० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीचे वाटप करण्यात आले आहे.खरे तर आमच्या सरकारने, महिला स्वयं सहाय्यता गटांना करण्यात आलेल्या कर्ज वाटपात गेल्या वित्तीय वर्षात ३७ % वाढ पहिली आहे.

महिला मनुष्य बळाच्या क्षमता वृद्धिगत करण्यासाठी कौशल्य विकास हा आणखी एक महत्वाचा घटक आहे. प्रधान मंत्री कौशल्य विकास योजने अंतर्गत उद्योग जगताशी संबंधित कौशल्य विकास प्रशिक्षण भारतीय युवकांनी मोठ्या प्रमाणात घेतले. आतापर्यंत देण्यात आलेल्या प्रमाण पत्रात निम्मी संख्या महिला प्रमाणपत्र



धारकांची होती.

महिला कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन काम सुरु ठेवावे यासाठी या महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती पगारी रजा २६ आठवड्यांपर्यंत करण्यासाठी प्रसूती लाभ कायद्यात सुधारणा करण्यात आली. प्रसूती काळामुळे नोकरी अथवा पगार गमवण्याची महिला

## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ____________ date ____________

Name (in block letters) : ____________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ____________

Phone No. / email : ____________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

कर्मचाऱ्यांची भीती नाहीशी होऊन बालकाला स्तनपान देण्यासाठी त्यांना वेळ मिळू लागला आहे.

असंघटीत क्षेत्रातल्या गरोदर आणि स्तनदा मातांसाठीही, प्रधान मंत्री मातृ वंदना योजनेअंतर्गत रक्कम देण्यात येते.पगाराची अंशत: नुकसानभरपाई म्हणून या महिलांना ६००० रुपये देण्यात येतात यामुळे त्यांना प्रसुतीनंतर पुरेसा आराम मिळण्याबरोबरच बालकाला स्तनपान देता येते. या योजनेअंतर्गत ३८ लाख लाभार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

संस्था,महिलांसाठी अनुकूल राहाव्यात या दृष्टीने पात्र महिलांची उच्च स्थानी नेमणूक करणे हे सकारात्मक पाऊल आहे.सर्व सार्वजनिक आणि खाजगी कंपन्यात संचालक मंडळात आणि उच्च स्थानी महिला प्रतिनिधीत्वाला प्रोत्साहन देण्यात येत आहे.कंपन्यांमध्ये ५ लाखाहून

**महिलांसाठी सुरक्षित वातावरण राहिल्यास त्या अर्थव्यवस्थेशी संबंधित कार्यात आणि सार्वजनिक जीवनात संपूर्णत: सहभागी होऊ शकतात.हे लक्षात घेऊन सरकारने ३१ राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशात १८१ महिला हेल्प लाईनना मंजुरी दिली असून २०६ वन स्टॉप सेंटर कार्यान्वित करण्यात आली.**

अधिक महिला संचालकांची नियुक्ती करण्यात आली असून भारतातली ही आतापर्यंतची सर्वोच्च संख्या आहे.

ग्राम स्तरावर पंचायत महिला सदस्य आपल्या गावाच्या सक्षमतेमधे आघाडीची भूमिका बजावत आहेत. त्यांना पंचायत संबंधी आपली जबाबदारी आणि कर्तव्ये चोख बजावता यावीत या दृष्टीने आणि प्रक्रियेला मदत यासाठी महिला आणि बाल विकास मंत्रालयाने गेल्या वर्षी १८,००० महिला सदस्यांसाठी प्रशिक्षण आयोजित केले होते.महिलांचे नेतृत्व गुण आणि व्यवस्थापकीय कौशल्य विकसित व्हावे या हेतूने या वर्षी आणखी १३,००० महिलांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

महिलांनी कार्यालयीन कामकाजात सक्रीय राहावे यासाठी कार्यालयीन ठिकाणे, महिला कर्मचाऱ्यांसाठी पोषक असण्याची गरज आहे. यासाठी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ(प्रतिबंधक,मनाई आणि निवारण) कायदा २०१३ या कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यात येत आहे.यामुळे,पूर्ण वेळ-अर्ध वेळ,खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्र तसेच संघटीत आणि असंघटीत क्षेत्रातल्या आणि घरकामासाठीच्या महिला,विद्यार्थी,प्रशिक्षणार्थी आणि कार्यालयाला भेट देणाऱ्या अशा सर्व महिलांना सुरक्षित वातावरण मिळते.

कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

छळाच्या तक्रारी दाखल करण्यासाठी माझ्या मंत्रालयाने नुकतीच ऑनलाईन तक्रार यंत्रणा स्थापन केली आहे. यामुळे संबंधित महिलेला सुलभपणे तक्रार दाखल करता येते आणि त्या तक्रारीबाबतच्या कार्यवाहीचा मागोवाही घेता येतो.

घरातही महिला खूप काम करतात आणि हे काम विना मोबदला तर असतेच त्याच बरोबर त्याची दखलही अनेकदा घेतली जात नाही.महिला सबलीकरणासाठी आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी उज्जवला योजना आणण्यात आली असून या योजनेद्वारे, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरची मोफत जोडणी पुरवण्यात येते. जुलै २०१८ पर्यंत ५.०८ कोटीपेक्षा जास्त गॅस जोडण्या मंजूर करण्यात आल्या आहेत.यामुळे या महिलांना लाकडावरच्या स्वयंपाकाच्या किचकट आणि आरोग्याला अपायकारी ठरणाऱ्या कामापासून मुक्ती मिळत असून गॅस सिलेंडरवरच्या स्वयंपाकामुळे वाचलेल्या वेळेचा इतर भरीव कामासाठी त्या उपयोग करू शकतात.

महिला सबलीकरणातला महत्वाचा आणखी एक घटक म्हणजे सुरक्षितता. महिलांसाठी सुरक्षित वातावरण राहिल्यास त्या अर्थव्यवस्थेशी संबंधित कार्यात आणि सार्वजनिक जीवनात संपूर्णत: सहभागी होऊ शकतात. हे लक्षात घेऊन सरकारने ३१ राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशात १८१ महिला हेल्प लाईनना मंजुरी दिली असून २०६ वन स्टॉप सेंटर कार्योन्वित करण्यात आली असून याच्या मदतीने,अत्याचारग्रस्त महिलेला जलद आणि सुलभ मदत मिळू शकते. पोलीस दलात महिलांना ३३ % आरक्षणाची अंमलबजावणीही करण्यात येत आहे.अडचणीत सापडलेल्या महिलांना तातडीने मदत पुरवण्याच्या दृष्टीने सर्व मोबाईल फोन मधे पॅनिक बटण लवकरच पुरवण्यात येणार आहे.देशातली ८ महत्वाची शहरे महिलांसाठी सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने आणि लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात न्यायवैद्यक परीक्षण क्षमता वृद्धिगत करण्यासाठी सर्वंकष आराखडा अंमलात आणण्यासाठी निर्भया निधीचा उपयोग केला जात आहे.या सर्व उपाय योजनांसह, महिला सबलीकरणासाठी आणखीही इतर पावले उचलण्यात आली आहेत. महिला सबलीकरणासाठी सरकार अनेक योजनाही राबवत आहे. मात्र दुर्गम आणि मागास भागातल्या लाभार्थींपर्यंत या योजना नेहमीच पोहोचतात असे नाही. या समस्येवर मात करण्यासाठी आणि अशा महिलांपर्यंत पोहोचण्यासाठी माझ्या मंत्रालयाने नुकतीच महिला शक्ती केंद्र योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत ३ लाख विद्यार्थी स्वयंसेवक, महिला सबलीकरणासाठीच्या सरकारच्या योजना आणि सेवा घेऊन देशभरातल्या ग्राम स्तरातल्या या महिलांपर्यंत थेट पोहोचणार आहेत.

सबलीकरणाच्या या प्रवासात कोणतीही महिला मागे राहू नये यासाठी माझे मंत्रालय दक्ष आहे.सध्याच्या योजना पूर्ण क्षमतेने राबवताना,अतिशय मागास भागातल्या आणि त्यामुळे या पिरॅमिड मधे तळाशी असलेल्या महिलेला वरच्या स्थानाकडे झेप घेता यावी या दृष्टीने लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

केवळ महिलांचा विकास आपल्याला साध्य करायचा नाही तर महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाच्या मार्गाकडे आपल्याला मार्गक्रमण करायचे आहे. महिलांच्या नेतृत्वाखालील विकास साध्य करणे हे सरकारचे धेय्य असून सरकारच्या धोरणाचा हा पाया आहे. याद्वारे भारतीय महिलांचे अधिक उज्जवला भविष्य आम्हाला दिसत आहे. सबलीकरणासाठी, प्रोत्साहनदायी आणि सुरक्षित वातावरणाची महिलांना आवश्यकता असते. त्यांना जीवनात भय मुक्त वातावरण मिळायला हवे तर त्यांना त्यांच्या क्षमता आजमावता येतात,त्यांना जखडून ठेवणारे बंध नसावेत. याबरोबरच महिलांना बाकी सर्वांबरोबर एका स्तरावर आणणाऱ्या सकारात्मक धोरणाला चालना देण्याची आवश्यकता आहे. योग्य संधी मिळाल्यास भारतीय स्त्रियांची अपार क्षमता दिसून येते.

डेमोग्राफिक डिव्हीडंडचा भारत, लाभ घेऊ इच्छित आहे अशा वेळी सक्षम महिलांची भूमिका अधिकच महत्वाची ठरते. शिक्षण आणि उत्पादक रोजगाराद्वारे, महिलांनी सार्वजनिक जीवनात अधिक सक्रीय व्हावे आणि राष्ट्र उभारणीच्या कार्यात अधिक योगदान द्यावे अशीच आमची अपेक्षा आहे.

■■■

*लेखिका महिला आणि बालविकास खात्याच्या केंद्रीय मंत्री आहेत.*

*ई मेल: min-wcd@nic.in*

# सक्षम महिला समर्थ समाज

**- पंकजा मुंडे**



**महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत महिला सक्षमीकरणाचे काम सुरु आहे. बचतगटांना विविध उद्योग व्यवसायासाठी बँकेमार्फत पतपुरवठा केला जातो. महाराष्ट्र शासनाने बचत गटांना बिनव्याजी बँक कर्ज उपलब्ध करुन देण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. यासाठी सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना महाराष्ट्र शासनाने सुरु केली आहे. राज्यातील अडीच लाख बचतगट या योजनेचे लाभार्थी असून एकूण २५ लाख कुटुंबे या योजनेचा लाभ घेत आहेत.**

महिलांच्या सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासनामार्फत अनेक योजना राबविण्यात येत आहेत यात विशेष करुन महिला आणि बालविकास विभाग तसेच ग्रामविकास विभागाने विशेष पुढाकार घेतला आहे शासनाच्या या योजनांचा लाभ थेट महिलांपर्यंत पोहोचत असून त्यांचे शैक्षणिक सामाजिक आर्थिक उन्नतीकरण होत आहे देशाच्या विकासात महिलांचा सहभाग लाभल्यास देश प्रगतीपथावर अधिक गतीने वाटचाल करु शकतो हे सूत्र लक्षात घेऊन महिला सक्षमीकरणावर अधिक भर देण्यात येत आहे.

### बचतगटांना शून्य टक्के व्याजदराने कर्ज

उमेद अभियान (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) आणि महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत महिला सक्षमीकरणाचे काम सुरु आहे. बचतगटांना विविध उद्योग व्यवसायासाठी बँकेमार्फत पतपुरवठा केला जातो. महाराष्ट्र शासनाने बचत गटांना बिनव्याजी बँक कर्ज उपलब्ध करुन देण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. यासाठी सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना महाराष्ट्र शासनाने सुरु केली आहे. राज्यातील अडीच लाख बचतगट या योजनेचे लाभार्थी असून एकूण २५ लाख कुटुंबे या योजनेचा लाभ घेत आहेत. सन २०१६-१७ साठी राज्य शासनाने व्याज अनुदानासाठी १० कोटी रुपये तरतूद उपलब्ध करुन दिली होती. राज्यात सन २०१९ पर्यंत ५ लाख बचतगटांना म्हणजेच साधारण ५० लाख कुटुंबांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

### माझी कन्या भाग्यश्री

मुलींचा जन्मदर वाढविणे, मुलींचे शिक्षण, आरोग्य यामध्ये सुधारणा करणे, त्यांच्या उज्ज्वल भविष्याकरिता आर्थिक तरतूद करणे, बालिका भ्रृणहत्या रोखणे, मुलींच्या जन्माबाबत समाजामध्ये सकारात्मक विचार आणणे, बालविवाह रोखणे याकरिता महिला आणि बालविकास विभागामार्फत 'माझी कन्या भाग्यश्री योजना' सुरु करण्यात आली आहे. एका मुलीवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास या योजनेतून मुलीच्या नावे ५० हजार रुपये फीक्स डिपॉझीटद्वारे बँकेत गुंतविले जातात मुलीच्या वयाच्या सहाव्या व बाराव्या वर्षी तिचे शिक्षण आणि पोषणासाठी व्याजाची रक्कम काढून घेण्यास व अठराव्या वर्षी मुलीच्या उच्च शिक्षणासाठी व्याजाची रक्कम मुळ गुंतवणूक रक्कमेसह काढून घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. दोन मुलीच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास प्रत्येकी २५ हजार रुपये इतकी रक्कम मुलींच्या नावे बँकेत गुंतवणूक केली जाते. २०१७-१८ या वर्षात ४ हजार ३७७ मुलींना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

### अंगणवाडी सेविकांचे मानधन थेट बँक खात्यात

अंगणवाडी सेविका, मिनी

अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचे मानधन पूर्वी प्रकल्प व जिल्हास्तरावर देण्यात येत असल्यामुळे मानधन मिळण्यास २ ते ३ महिन्यांचा विलंब होत होता. तो विलंब दूर करण्यासाठी मानधन थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी राज्यस्तरावर डीबीटी प्रणाली सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे सेविकांचे मानधन वेळेत अदा होत आहे. अंगणवाडी सेविकांच्या मानधनात भरीव वाढ करण्यात आली आहे पुर्वी ५ हजार रुपये असलेले मानधन आता वाढवून ६ हजार ५०० रुपये करण्यात आले आहे.

### मनोधैर्य योजना

बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला आणि बालकांना अर्थसहाय्य करणे व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी मनोधैर्य योजना सुरु करण्यात आली आहे. पिडीत महिला व बालकांना शारिरीक आणि मानसिक आघातातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करणे, वित्तीय सहाय्य देणे तसेच समुपदेशन, निवारा, वैद्यकीय व कायदेशीर मदत करण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पिडीतांना पुनर्वसनासाठी जुन्या निकषानुसार २ ते ३ लाख रुपयांपर्यंत अर्थसहाय्य व पिडीतांचे पुनर्वसन करण्यात येत होते. तथापि, नवीन निकषानुसार गंभीर व तीव्र स्वरुपाच्या प्रकरणामध्ये पिडीतास १० लाख रुपयांपर्यंत अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मनाधैर्य योजनेंतर्गत पिडीतांना सन २०१३-१४ मध्ये ५ कोटी ९ लाख, २०१४-१५ मध्ये ३० कोटी ६३ लाख, २०१५-१६ मध्ये ३६ कोटी ८८ लाख तर २०१६-१७ मध्ये ४३ कोटी २३ लाख रुपये इतके अर्थसहाय्य देण्यात आले आहे.

### अस्मिता योजना

किशोरवयीन मुलींना फक्त ५ रुपयांत तर इतर महिलांना स्वस्त दरांत सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करुन देणे तसेच त्याच्या विक्री व्यवसायातून बचतगटांच्या महिलांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दुहेरी उद्देशाने ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनी अस्मिता योजनेचा शुभारंभ करण्यात आला आहे महिलांमध्ये मासिक पाळीच्या काळात सॅनिटरी नॅपकीन वापराचे प्रमाण सध्या फक्त १७ टक्के इतके आहे अस्मिता योजनेच्या माध्यमातून पहिल्या वर्षात ग्रामीण भागात हे प्रमाण ७० टक्के इतके करण्याचे उद्दीष्ट आहे.

**अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचे मानधन पूर्वी प्रकल्प व जिल्हास्तरावर देण्यात येत असल्यामुळे मानधन मिळण्यास २ ते ३ महिन्यांचा विलंब होत होता. तो विलंब दूर करण्यासाठी मानधन थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी राज्यस्तरावर डीबीटी प्रणाली सुरु करण्यात आली आहे.**

तसेच दुसऱ्या वर्षी ग्रामीण भागातील १०० टक्के किशोरवयीन मुली आणि महिलांपर्यंत सॅनिटरी नॅपकीन स्वस्त दरात पोहोचविण्याचे उद्दीष्ट आहे.

### मुलींना फक्त ५ रुपयांत ८ सॅनिटरी नॅपकीन

अस्मिता योजनेतून जिल्हा परिषद शाळांमधील ११ ते १९ वयोगटातील किशोरवयीन मुलींना २४० मीमीच्या ८ पॅडचे एक पाकीट ५ रुपयांमध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहे पहिल्या टप्प्यात राज्यातील साधारण ७ लाख मुलींना अस्मिता कार्ड देण्यात येणार आहेत अस्मिता कार्डधारक किशोरवयीन मुलींना ५ रुपयांप्रमाणे विक्री केलेल्या पॅकेटच्या संख्येच्या प्रमाणात प्रती पॅकेट १५ व २० रुपये इतके अनुदान शासन बचतगटांना देणार आहे किशोरवयीन मुलींना वर्षभरात १३ पाकीटे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत योजनेतून ग्रामीण भागातील महिलांनाही माफक दरात सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करुन देण्यात येत आहेत महिलांना २४० मीमीच्या ८ पॅडचे एक पाकीट २४ रुपयांना तर २८० मीमीच्या ८ पॅडचे एक पाकीट २९ रुपयांना उपलब्ध होत आहे बचतगट हे वितरकांकडून सॅनिटरी नॅपकीनचे पाकीट खरेदी करुन परस्पर विक्री करीत आहेत.

### शाश्वत उपजीविकेची संधी देणारे 'उमेद'

राज्यात बचतगटांच्या चळवळीला चालना देण्यासाठी ग्रामविकास विभागामार्फत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात उमेद अभियान राबविण्यात येत आहे. उमेद या शब्दातच योजनेचा सगळा सार सामावला आहे. उमेद ही कार्यकर्तृत्वाला चालना देणारी, मनाला उभारी देणारी गोष्ट. उमेद असेल तर माणूस पुन्हा उभे राहू शकतो. याच उमेदने लाखो स्त्रियांना स्वरोजगाराची वाट दाखवली. त्यांच्यातील कौशल्याला नवे पंख दिले. यामध्ये गरिबी निर्मूलनाचा समग्र विचार करण्यात आला असून समुदाय विकासापासून शाश्वत उपजीविका निर्माण करण्यापर्यंतच्या सर्व बाबींचा यात समावेश आहे. या योजनेतून बचतगटाद्वारे स्त्रियांचे संघटन करून त्यांच्यातील उद्योग व्यवसायाला चालना देण्यात येते.

### गावात 'उमेद'

राज्यात अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी समुदाय संसाधन व्यक्तींची एक भक्कम फळी गावपातळीपर्यंत उभी केली गेली

आहे. समुदाय संसाधन व्यक्तीमार्फत गरीब कुटुंबांची नेमकी ओळख करून त्यांना स्वयंसहाय्यता गटात समाविष्ट करण्याचे मोलाचे काम या अभियानांतर्गत केले जाते. समुदाय संसाधन व्यक्ती या स्थानिक स्त्रिया असून त्या समुदाय संस्थाचा एक भाग म्हणून काम करतात.

उमेद अर्थात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची राज्यात १५ जिल्ह्यात आणि १३४ तालुक्यात इन्टेन्सिव्ह पद्धतीने तर उर्वरित तालुक्यात सेमी व नॉन इन्टेन्सिव्ह पद्धतीने अंमलबजावणी होत आहे. सेमी आणि नॉन इन्टेंसिव्ह तालुक्यांचे रुपांतर टप्प्या टप्प्याने इन्टेन्सिव्ह तालुक्यात केले जाईल.

**'उमेद'अंतर्गत कर्ज पुरवठा**

राज्यात उमेद अंतर्गत एकूण १ लाख ८१ हजार बचतगट स्थापन झाले आहेत. अभियानाची बांधणी करतांना स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. त्यामुळे अभियानात समाविष्ट असणारे सर्वच उपक्रम हे स्त्रियांसाठीच आहेत. स्त्रियांचे स्वयंसहाय्यता गट तयार झाल्यानंतर आणि त्यास तीन महिने पूर्ण झाल्यानंतर १० हजार ते १५ हजार रुपये एवढा फिरता निधी दिला जातो. याचा उपयोग गटातील स्त्रिया त्यांच्या मुलभूत गरजा भागवण्यासाठी तसेच व्यवसायासाठी करू शकतात. गट सहा महिन्यांचा झाल्यानंतर त्या गटातील प्रत्येक सदस्यांचा सूक्ष्म गुंतवणूक आराखडा तयार करून त्या गटास ६० हजार रुपये एवढा समुदाय गुंतवणूक निधी दिला जातो. अतिगरीब व जोखीमप्रवण कुटुंबासाठी प्रती ग्रामसंघ ७५ हजार तर बँकांमार्फत प्रत्येक गटास १ लाख रुपये एवढ्या रकमेचे पहिले कर्ज दिले जाते. या उपलब्ध होणाऱ्या निधीतून स्त्रिया त्यांच्याकडे असणारे कौशल्य, संसाधने व त्यांची इच्छा या सगळ्या गोष्टींचा साकल्याने विचार करून व्यवसायाची निवड करतात. स्त्रियांना त्यांच्या कौशल्यवृद्धीसाठी तसेच क्षमताबांधणीसाठी उमेद अंतर्गत प्रशिक्षण दिले जाते. या अभियानाचा लाभ गावातील सर्व गरीब स्त्रिया घेऊ शकतात. त्यासाठी त्यांनी स्वंयसहाय्यता गट वा बचतगटात सहभागी होणे आवश्यक आहे.

**उमेदमधील लाभ घेण्यासाठी कुठे संपर्क साधावा ?**

या अभियानात सहभागी होण्यासाठी गावाच्या जवळ युनिट म्हणून इन्टेन्सिव्ह तालुका अभियान व्यवस्थापक, तालुक्यात तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष तर सेमी आणि नॉन इन्टेन्सिव्ह क्षेत्रात गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे संपर्क साधावयाचा असतो.

उमेदमुळे स्त्रियांना गरीबीतून बाहेर पडण्यास मदत होत आहे तसेच त्यांच्या उपजीविकेचे स्त्रोत बळकट होत जातांना त्यांची आत्मसन्मानाची वाट अधिक सक्षम होत आहे. http://www.umed.in या संकेतस्थळावर जाऊन या अभियानाची माहिती आपण घेऊ शकाल.

■■■

*लेखिका महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास खात्याच्या मंत्री आहेत.*

*ई मेल: min.rdd@maharashtra.gov.in*




**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

**एका पुस्तकाची किरकोळ विक्री**
**किंमत ३० रुपये प्रत्येकी**

**चार पुस्तकांचा संच**
**१०० रु.**

विश्लेषण

# महिला सशक्तीकरणाचे आव्हान पेलताना

-निलीमा श्रीवास्तव, लिंडा लेन, सुनिता ढाल



**१९९० च्या दशकापासून महिला समानता आणि सबलीकरण हे मुद्दे शासनाच्या कार्यात अग्रभागी राहिले आहेत. शाश्वत विकास साधणे आणि त्याचबरोबरीने शहरी आणि ग्रामीण महिलांना अनुभवावा लागणारा मागासपणा, दारिद्र्य आणि सामाजिक बहिष्कार यांचे निर्मूलन करणे याबाबत शासन अग्रक्रमाने पुढाकार घेत आहे. या विकासाच्या प्रक्रियेत सहभागी झालेल्या स्त्रीहक्कवादी लोकांनी लैंगिक समानता आणि न्याय्य विकास यांचा पुरस्कार करण्यासाठी सबलीकरणाची संकल्पना जागतिक पातळीवर नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे**

महिला सबलीकरणासाठी आणि महिलांना समान हक्क मिळावेत म्हणून सरकार आणि संयुक्त राष्ट्रे कार्यक्रम योजत आहेत, धोरणे आखत आहेत. महिलांवर दडपशाही गाजविणे आणि त्यांना समाजात गौण स्थान देणे अशा जैविक धारणांवर आधारीत समाजरचनेविरूद्ध लढा देण्यात येत आहे. या विकास प्रक्रियेच्या परिणामस्वरूप समृद्धी दिसून येत असली तरीही, त्याबरोबरीनेच असमान विभागणी आणि वाढता लिंगभेदही दिसून येत आहे. भारतीय महिलांनी त्यांचे दैनंदिन अनुभव त्यांच्यासारख्याच परिस्थितीत असलेल्या महिलांपुढे मांडले आहेत. यामुळे नवीन वस्तुस्थिती निर्माण करून भारतीय महिलांनी स्वत:चे स्थान तयार केले आहे. या लेखात भारतातील अशा परिस्थितीचा आढावा घेतला आहे. पाश्चात्य पद्धतीपेक्षा वेगळे असलेले हे सर्व महिलांचे सबलीकरण आहे आणि असे सबलीकरण समजून घेण्यासाठी पर्यायी सिद्धांत इथे मांडला आहे.

## पूर्वपिठिका

१९९० च्या दशकापासून महिला समानता आणि सबलीकरण हे मुद्दे शासनाच्या कार्यात अग्रभागी राहिले आहेत. शाश्वत विकास साधणे आणि त्याचबरोबरीने शहरी आणि ग्रामीण महिलांना अनुभवावा लागणारा मागासपणा, दारिद्र्य आणि सामाजिक बहिष्कार यांचे निर्मूलन करणे याबाबत शासन अग्रक्रमाने पुढाकार घेत आहे. या विकासाच्या प्रक्रियेत सहभागी झालेल्या स्त्रीहक्कवादी लोकांनी लैंगिक समानता आणि न्याय्य विकास यांचा पुरस्कार करण्यासाठी सबलीकरणाची संकल्पना जागतिक पातळीवर नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे असे शर्मा (२००८) यांचे म्हणणे आहे. त्यांच्या कार्याने प्रभावित होऊन जागतिक बॅंकेने असे सुचविले आहे (जागतिक बॅंक २००२) की महिला सबलीकरण हा सर्व प्रकारच्या सामाजिक विकासाचा मुख्य घटक असला पाहिजे. भारतातील महिला सबलीकरणासाठी असलेल्या शासकीय कार्यक्रमांना अपेक्षित उद्दीष्ट गाठता आलेले नाही. देशाच्या लोकसंख्येपैकी महिलांची संख्या ४८ टक्के आहे (जनगणना २०११) तरीही, महिला सबलीकरण धोरणातील असंतुलनामुळे महिलांचा सामाजिक आणि आर्थिक मागासपणा तसाच राहिला आहे आणि महिलांच्या गरजा आणि त्यांचे हित बाजूलाच पडत गेले आहे. अनेक महिलांच्या आणि त्यांच्या संस्थांच्या बहुतेक फसव्या असलेल्या तथाकथित प्रकल्पांसाठी निधी पदरात पाडून घेता यावा म्हणून महिला सबलीकरण हे एक चलनी नाणे झाले आहे. महिला सबलीकरण ही एक प्रक्रिया आहे. याप्रक्रियेत महिलांच्या आयुष्यावर प्रभाव पाडणाऱ्या संस्थांचे उत्तरदायित्व निश्चित करणे, त्यामध्ये सहभागी होणे, यासारख्या कामात महिला आपली निवड विस्तृत करत आहेत आणि अधिक स्वतंत्र होत आहेत हे मान्य केले पाहिजे. तरीही, महिला सबलीकरणाचे ध्येय सार्थ

आहे आणि त्यासाठी झटले पाहिजे असा दृष्टीकोन महिला स्वत: जेव्हा ठेवतील तेव्हाच महिला सबलीकरण साध्य होईल. यासाठी महिलांची शक्ती वापरणे गरजेचे आहे, त्यांची क्षमता उपयोगात आणली गेली पाहिजे आणि त्यांनी स्वत: निश्चित केलेले ध्येय साध्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. ही उद्दीष्टे साध्य होण्याची शक्यता निर्माण करायची असेल तर महिला सबलीकरणाबाबतची धोरणे आणि कार्यक्रम यामध्ये महिलांच्या मताला आणि कर्तृत्वाला स्थान दिले गेले पाहिजे (जागतिक बॅंक २०१४).

**सबलीकरणाची व्याख्या ठरविताना**

पहिले म्हणजे, महिलांच्या सबलीकरणाची पूर्व तयारी करण्यासाठी महिला सबलीकरणाची योग्य व्याख्या ठरविणे क्रमप्राप्त आहे. हे काही सोपे काम नाही. महिला सबलीकरणाचे कायदे फार पूर्वीच आंतरराष्ट्रीय पातळीवर अस्तित्वात आले आहेत, तरीही प्रत्यक्षात सबलीकरणात कशाचा अंतर्भाव होतो आणि त्याची मोजदाद कशी केली जाते याबाबत अनेक विकास साहित्यात उहापोह (मलहोत्रा इ. २००२) झाला आहे. लोकांच्या निवड करण्याच्या संधींमध्ये वाढ करणे आणि लोकांच्या आयुष्यावर प्रभाव पाडणाऱ्या संस्थांचे उत्तरदायित्व निश्चित करणे, त्यामध्ये सहभागी होणे, त्यावर प्रभाव पाडणे, नियंत्रण ठेवणे म्हणजे सबलीकरण आहे असे जागतिक बॅंकेने (२००२) म्हटले आहे. सबलीकरणाच्या संकल्पनेबाबत उहापोह चालूच असला तरीही या लेखात आम्ही कबीर (२००१) यांच्या संकल्पनेवर भर दिला आहे. ती अशी आहे – सबलीकरण म्हणजे जीवनातल्या महत्वाच्या बाबींमध्ये निवड करण्यासाठी लोकांच्या क्षमतेचा विस्तार करणे. जिथे पूर्वी लोकांची ही निवड क्षमता त्यांना नाकारली गेली होती अशा ठिकाणी ही संकल्पना लागू होईल. कबीर यांची संकल्पना वापरून सबलीकरणाचा अभ्यास केला तर सिद्धांत आणि अनुभवजन्य संशोधन यामध्ये दुवा जोडण्याची संधी मिळेल. सबलीकरणाच्या प्रक्रियेतला गुंता सोडवणे सुलभ होईल. सांस्कृतिक, सामाजिक - आर्थिक आणि राजकीय परिघात महिलांना मत व्यक्त करण्यासाठी मोकळीक देण्यात आली पाहिजे, कारण या सर्व परिस्थितीत त्या खोलवर रूतल्या आहेत. अशातऱ्हेने महिलांच्या जगण्यावर लक्ष केंद्रीत केले गेले तर, सबलीकरणाच्या आत्मनिष्ठ

**महिला त्यांच्या सबलीकरणामध्ये स्वत:च योगदान देऊ शकतात, म्हणजेच महिला सबलीकरणाच्या कार्यात महिलांचाच स्रोत म्हणून वापर होऊ शकतो. महिलांच्या गुणांकडे दुर्लक्ष केल्याचा परिणाम असा होतो की सर्व महिलांना 'एकाच मापाने' मोजणाऱ्या योजना तयार होतात आणि त्यामुळे महिलांच्या समस्यांवर उपाय शोधायला बहुतेक योजना अपयशी ठरतात.**

पैलूबाबत सखोल ज्ञान मिळण्याची शक्यता निर्माण होऊ शकेल.

**संकल्पनेबाबत समीक्षा करणे.**

सबलीकरणाचे थेट निरीक्षण करता येण्यासारखे नाही तसेच त्याबाबत निरनिराळ्या तऱ्हेने मूल्यमापन करता येऊ शकेल हे लक्षात ठेवले पाहिजे. प्रत्येकाच्या वैयक्तिक दृष्टीकोनावर आणि ज्या सांस्कृतिक वातावरणात व्यक्ती जगत आहे त्यावर हे मूल्यमापन अवलंबून राहील. महिलांच्या गरजांनुसार, प्राधान्यानुसार आणि महिलांच्या समजानुसार त्यांच्यामध्ये सबलीकरणाची ही संकल्पना कितपत स्वीकारली गेली आहे असा प्रश्न विचारला जातो. शासनाच्या आणि इतर सबलीकरणाच्या धोरणांमध्ये हल्ली लैंगिक समानतेवर लक्ष केंद्रीत करतात परंतु महिलांमध्येही भिन्नता आहे हे ओळखण्यात या योजना अपयशी ठरतात. क्रियाशील, उत्साही आणि अंगी भरपूर गुण असलेल्या व्यक्ती म्हणून महिलांकडे विशेषत्वाने पाहिले जात नाही, परंतु त्यांच्या अंगी असलेल्या याच गुणांमुळे महिला त्यांच्या सबलीकरणामध्ये स्वत:च योगदान देऊ शकतात, म्हणजेच महिला सबलीकरणाच्या कार्यात महिलांचाच स्रोत म्हणून वापर होऊ शकतो. महिलांच्या गुणांकडे दुर्लक्ष केल्याचा परिणाम असा होतो की सर्व महिलांना 'एकाच मापाने' मोजणाऱ्या योजना तयार होतात आणि त्यामुळे महिलांच्या समस्यांवर उपाय शोधायला बहुतेक योजना अपयशी ठरतात. कारण महिलांच्या आकांक्षा आणि गरजा या गुंतागुंतीच्या असतात, काहीवेळा विरोधी असतात हे लक्षात घेतले जात नाही. सध्याच्या त्यांच्या परिस्थितीला आव्हान देणे किंवा न देणे या भूमिकेमागे महिलांचे विविध उद्देश असू शकतात (नाईटींगेल २०११) हे देखील लक्षात घेतले जात नाही. अशा कार्यक्रमांमध्ये महिलांच्या गरजा मांडण्यासाठी मोकळीक ठेवलेली नसते आणि म्हणून दीर्घ काळ असलेली बंधने तोडण्याच्या कामी असे कार्यक्रम अपयशी ठरतात. जात, धर्म, वंश आणि इतर स्तर तसेच मुलगी, सून, आई, सासू, बायको आणि विधवा अशा कुटुंबातल्या भिन्न स्थानामुळे महिला मुख्य प्रवाहातून आणखीनच बाजूला ढकलल्या जातात. यामुळे मूलभूत मानवी हक्क, संधी आणि स्रोतांच्या बाबतीत त्यांची अवस्था जास्तच नाजूक होऊन त्यांना आणखी भेदभावाला सामोरे जावे लागते (उदाहरणार्थ क्रेनशॉ १९९१,

मॅकॉल २००५ पहा). पितृसत्ताक पद्धती, आणि राजकीय सत्तेबाबत समाज धारणेला आव्हान देण्यापूर्वी सबलीकरणाच्या योजनांनी अगोदर हे समजून घेतले पाहिजे की अशी विविध व्यक्तिमत्वे एकत्र झाल्यामुळे महिला सबलीकरणामधे आणखी अडथळे येतात. ज्या योजनांमध्ये महिलांच्या मताला समाविष्ट केले जाते अशा तळागाळाला प्राधान्य देणाऱ्या योजना कबीर यांच्या संकल्पनेबाबत सातत्य राखतात. अशा योजना मोजमापाच्या सूचकांकावर अवलंबून रहाण्यापेक्षा सबलीकरणाच्या प्रक्रियेवर विशेष भर देतात. कारण मोजमापाच्या सूचकांकाच्या आधारे महिलांच्या परिस्थितीबाबत वस्तुस्थितीची माहिती मिळणे दुरापास्त असते.

नागरिक असणे म्हणजे मत असणे (ड्रीझ आणि सेन २००२), परंतु मत असूनही त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे नागरिकत्वच नाकारण्यासारखे आहे. आपण महिलांचे मत ऐकले पाहिजे आणि त्यांचे म्हणणे गंभीरपणे घेतले पाहिजे अशी महिला सबलीकरणाची अपेक्षा आहे. कुटुंबापासून ते राष्ट्रीय पातळीवरच्या संसदेतही निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांची मते घेतली तरच सबलीकरणाचे ध्येय साध्य होईल. महिलांना त्यांच्या गरजा मांडण्यासाठी अवकाश दिला पाहिजे आणि त्यांना त्यांच्या समाजातल्या लिंगभेदाला आव्हान देता आले पाहिजे - हे आव्हान वैयक्तिक आणि सामुदायिकरित्या निर्भयपणे देता आले पाहिजे (मारखाम २०१३). वर म्हटल्याप्रमाणे महिलांमध्ये विविध व्यक्तिमत्वे एकत्र झाल्यामुळे त्यांची अवस्था जास्त नाजूक होऊन त्यांना आणखी भेदभावाला सामोरे जावे लागते, यामुळे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय कार्यात महिलांच्या सहभागावर बंधने येऊ शकतात. म्हणून, जे कार्यक्रम विशेषकरून महिला आणि मुलींसाठी तयार केलेले असतात त्यात सामाजिक शिक्षण आणि पद्धती असलेल्या घटकांचा अंतर्भाव केला जावा (एलिस इ. २०१७). जबाबदारीचे विकेंद्रीकरण करणे, महिलांचे सबलीकरण करणे तसेच स्वयं सहायता गट, सहकारी गट अशा त्यांच्या सामान्य पातळीवरच्या संस्थांना बळकट करणे असे उपाय करून हे काही प्रमाणात साध्य करता येईल. गरीब आणि तळागाळातल्या महिलांच्या गाठीला मौल्यवान अनुभवरूपी संपत्ती असते, ज्याचा उपयोग परिवर्तन घडवरण्यासाठी होऊ शकतो, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

महिलांच्या दैनंदिन आयुष्यातले अनुभव लक्षात घेण्याचे ठरवले तर त्याचे अनेक परिणाम होऊ शकतात. जेव्हा महिला त्यांच्या अनुभवांबद्दल दुसऱ्या महिलांशी संवाद साधतात, तेव्हा त्या अनुभवांना मान्यता मिळते आणि त्यातून नवीन परिस्थिती निर्माण होते. जेव्हा महिला त्यांच्या स्वत:च्या अनुभवांचे वर्णन करतात, तेव्हा त्यांच्या स्वत:च्या विश्वात त्या एक प्रतिनिधी बनतात आणि त्यांच्या वस्तुस्थितीशी इतरांचा संबंध जोडायला सुरवात करतात. प्रतिनिधी बनणे आणि मत मांडणे हे महत्वाचे आहे – महिलांचे मत आणि प्रतिनिधीत्व वाढवणे या गोष्टी अत्यंत मौलीक आहेत. या गोष्टींना साधन म्हणून आणि प्रत्यक्षात देखील मूल्य आहे. महिलांचे मत आणि प्रतिनिधीत्व वाढविल्याने त्यांच्या विकासाचा त्यांना स्वत:ला आणि त्यांच्या कुटुंबियांना, जातीला आणि समाजालाही लाभ मिळू शकतो (जागतिक बॅंक-२०१४ - २).

**स्वयं सहायता गट - सूक्ष्म वित्त आणि सूक्ष्म सबलीकरण (अर्ध सबलीकरण)**

सिद्धांत आणि प्रत्यक्ष अनुभव यांचा मेळ घालण्यासाठी स्वयं सहायता गटाची भूमिका तपासून बघायची आम्हाला इच्छा आहे. जिथे सामाजिक आणि सांस्कृतिक दबावाखाली महिलांना मूलभूत हक्कदेखील मिळू शकत नाहीत अशा मुख्य प्रवाहातून दूर ढकलल्या गेलेल्या ग्रामीण महिलांना त्यांचे अनुभव मांडण्यासाठी स्वयं सहायता गटाचा लाभ होतो. या महिला जेव्हा विविध स्वयं सहायता गटांशी जोडल्या जातात तेव्हा त्या प्रक्रियेत या महिला सामुदायिक जाणीव प्राप्त करून घेतात, यालाच सबलीकरण म्हणतात. यामुळे त्यांना कौटुंबिक घटनांमध्ये निर्णय घेणे, आवाज उठवणे किंवा मत तयार करणे अशा गोष्टीत मर्यादित स्वरूपात कार्यरत प्रतिनिधी होता येते. गरिबी निर्मूलन करण्यासाठी आणि महिलांना तोंड द्याव्या लागणाऱ्या लैंगिक भेदभावाला नष्ट करण्यासाठी विकसनशील देशांमध्ये १९८० आणि ९० च्या दशकांमध्ये स्वयं सहायता गटाची कल्पना उदयाला येऊ लागली. महिलांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी स्वयं सहायता गटाची खूप मदत झाली. याबरोबरीनेच लोकशाही पद्धतीने गट बांधणी करणे, स्वयं सहायता करणे आणि जागृती करणे यासारखी कामेही स्वयं सहायता गटाच्या माध्यमातून होऊ लागली (कोल्लोजु २०१३, सुगना २००६). एकत्र येणे, एकमेकींना आधार देणे, कर्जाऊ रक्कम देणे, हे सर्व महिलांना हळूहळू जमू लागले. अशातऱ्हेने सामुदायिक रितीने पैसे साठवण्याच्या उपायाने त्यांना त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी मार्ग मिळाला (पार्थसारथी २०१२).

**कार्यक्षेत्रातले अनुभव**

तळागाळातल्या महिलांना त्यांचा आवाज उठवण्यासाठी आणि त्यांच्या घरात निर्णयक्षमता मिळवण्यासाठी

स्वयं सहायता गटाचा उपयोग झाला आहे. स्वयं सहायता गटाची भूमिका समजून घेण्यासाठी या कार्यक्षेत्रातल्या संशोधकांची काही निरीक्षणे एकत्र करण्यात आली. ओदिशातल्या मयूरभंज आणि कंधमल या जिल्ह्यात संशोधन सुरू असून त्यातली निरीक्षणे प्राथमिक माहिती म्हणून वापरण्यात आली. या क्षेत्रातल्या स्वयं सहायता गटातल्या महिलांच्या आपापसात बैठका आयोजित करून त्याआधारावर अनुमान काढण्यात आले आहे.

स्वयं सहायता गटातले प्रतिनिधी या बैठकांमध्ये त्यांच्या समस्या हिरीरीने मांडतात. या समस्यांमध्ये दारूचे व्यसन, दैनंदिन स्वयंपाकासाठी पर्यायी इंधनाचे लाभ, माता आणि बालकांचे आरोग्य, मुलांना सांभाळणे अशा गोष्टींचा समावेश असतो. काही घटनांमध्ये दारूड्या पतीमुळे होणारा घरगुती हिंसाचार रोखण्यात महिला यशस्वी झाल्या आहेत. अशाचप्रकारे, गावाला पिण्याचे पाणी पुरविण्याची सोय करणे, जळणासाठी जंगलातले साहित्य मिळवणे अशा गोष्टींसाठी प्रशासनाकडे स्वयं सहायता गटातल्या महिलांनी आवाज उठवला. पाणी आणणे, जळण गोळा करणे यासारख्या कामासाठी लागणारा वेळ यामुळे वाचला. महिलांना सामाजिक ओळख देणाऱ्या स्वयं सहायता गटाकडे 'महिलांचा समाज' या दृष्टीने पहाता येऊ शकेल. महिला त्यांच्या समाजात कार्यरत असतानाच, स्वयं सहायता गटाच्या रचनेमुळे, महिलांना निर्णय घेणे आणि वाटाघाटी करणे शक्य होते. बहुतेक वेळा महिला आपल्या घराचा उंबरठा ओलांडतात आणि एकजुटीने कार्य करतात. दारूबंदी करणे, देशी वाण साठवण्यासाठी प्रयत्न करणे, मातेचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि लसीकरणासाठी शिबिरे आयोजित करणे, लाकूड वगळता अन्य वन्य उत्पादने विकणे अशा कार्यात या महिला सहभागी होतात. या कार्यामुळे महिलांमध्ये वैयक्तिक किंवा एकत्रित असा आत्मविश्वास निर्माण होतो आणि सबलीकरणाची सुरवात होते.

अशातऱ्हेने, तळागाळातल्या महिलांना बळकट करून सामायिक ओळख निर्माण करण्यासाठी स्वयं सहायता गट हेच एक संघटीत कार्यक्षेत्र झाले. यामुळे महिलांना घराच्या दारातच अर्थसहाय्य मिळण्याची शक्यता निर्माण झाली. मात्र याउलट निरीक्षणही दिसून येते. गोळा केलेल्या माहितीवरून असेही दिसून आले की सूक्ष्म वित्त संस्थांकडून घेतलेले कर्ज फेडण्याचे महिलांवरचे ओझे दिवसेंदिवस वाढतच

**सांस्कृतिक दबावाखाली महिलांना मूलभूत हक्कदेखील मिळू शकत नाहीत अशा मुख्य प्रवाहातून दूर ढकलल्या गेलेल्या ग्रामीण महिलांना त्यांचे अनुभव मांडण्यासाठी स्वयं सहायता गटाचा लाभ होतो.**

चालले आहे. अशा अर्थाने आपण असे अनुमान काढू शकतो की महिलांना आर्थिक परिस्थितीत मिळालेला लाभ आणि त्यांना मिळालेले अधिकार हे मर्यादित स्वरूपाचे असू शकतात. घराघरात सध्या अस्तित्वात असलेली पितृसत्ताक पद्धती याला जबाबदार असू शकते.

### अनुमान

महिला सबलीकरणाच्या वातावरण निर्मितीसाठी सबलीकरणाच्या धोरणांत आणि कार्यक्रमांत महिलांचे मत आणि प्रतिनिधीत्व असणे ही महत्वाची अट आहे. वैयक्तिक, सामाजिक आणि राष्ट्रीय अशा सर्वच स्तरांतून महिलांचा आवाज ऐकला जावा यासाठी सबलीकरणाची योग्य व्याख्या केली पाहिजे. हे सबलीकरण कसे होते ते समजून घ्यायचे असेल तर सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक पातळीवर विश्लेषण करता येण्याजोग्या व्याख्या करण्याची गरज आहे. अशा तऱ्हेची प्रतिबद्धता बाळगताना हे देखिल लक्षात घेतले पाहिजे की महिलांचे गट भिन्न असतात, विविध भागात, काळात आणि विविध प्रकारे होणाऱ्या भेदभावाचा आणि पितृसत्ताक पद्धतीचा त्रास त्या सोसत असतात. जर विशाल दृष्टीने पाहिले तर हे लक्षात येईल की केवळ महिलांचा आवाज ऐकणे किंवा त्यांना प्रतिनिधित्व देणे हे सबलीकरणासाठी पुरेसे ठरणार नाही कारण महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी किंवा खोलवर रुजलेले भेदभाव नष्ट करण्यासाठी हे पुरेसे नाही. तरीही, महिलांच्या गरजांवर केवळ उपदेश करण्यापेक्षा त्याच्या पलीकडे टाकलेले हे एक पाऊल ठरेल. नवभारताच्या उभारणीत महिला सबलीकरण हे एक आव्हान आहे, परंतु भारतातल्या लोकसंख्येच्या ४८ टक्के असलेल्या महिलांची अंतर्गत शक्ती , ज्ञान आणि अनुभव जोपर्यंत पूर्णपणे सबलीकरणाच्या कार्यात उपयोगात येत नाही तोपर्यंत हे ध्येय साध्य होणार नाही.

■■■

*निलिमा श्रीवास्तव इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या एका विभागाच्या संचालिका आहेत.*
*ई मेल: nilimasrivastav@ignov.ac.in*

*लिंडा लेन या गोथेन बर्ग विद्यापीठात वरिष्ठ अधिव्याख्यात्या आहेत.*
*ई मेल: linda.lane@socwork.gv.se*

*सुनिता ढाल या इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापिका आहेत.*
*ई मेल: sunitadhall@ignov.ac.in*

फोकस

# स्वयंउद्यमशीलतेच्या विकासाद्वारे महिलांचे सक्षमीकरण

-एन व्ही माधुरी



**महिला स्वयंउद्योजिकांना प्रोत्साहन आणि वित्तीय समावेशनाच्या दृष्टीने लघुउद्योग कर्ज तसेच महिला बचत गट महत्वाची भूमिका बजावतात. हे गरिबीशी लढण्यासाठीचे एक महत्वाचे साधन तर आहेच, त्यासोबत, देशातील एकूण लोकसंख्येतील सर्वात वंचित, दुर्लक्षित घटक, त्यातही विशेषत्वाने महिलांना सक्षम करण्याच्या दिशेने होत असलेला यशस्वी प्रयत्न आहे. भारतातील काही राज्यातील ग्रामीण भागात तर महिला बचतगट चळवळ एक वरदानच ठरली आहे.**

गेल्या ५० वर्षात भारताच्या लोकसंख्येत तिपटीने वाढ झाल्याचे दिसून येते. मात्र, त्या तुलनेत रोजगाराच्या संधी, विशेषत: ग्रामीण भागात, म्हणाव्या तेवढ्या उपलब्ध झालेल्या नाहीत. या लोकसंख्येत महिलांची संख्या ५० टक्के आहे आणि त्या कुटुंबाच्या मुख्य आधार मानल्या जातात. अलिकडच्या काही वर्षांत बदलत्या परिस्थितीतून निर्माण झालेल्या आर्थिक गरजांमुळे, महिलांच्या पारंपरिक भूमिका बदलल्या आहेत आणि समाजाच्या एकूण विकास आणि प्रगतीसाठी महिलांचे योगदान दृश्य स्वरूपात समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले जात आहे. भारतासह, जगातील सर्व विकसनशील देशांत स्वयंउद्यमशीलतेच्या विकासाच्या माध्यमातून, महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी महिला बचत गट अत्यंत महत्वाचे साधन बनले आहेत. (अंजली,२०१७).

महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्वयंउद्यमशीलतेचा विकास आणि रोजगार निर्मितीची कामे हा अत्यंत चांगला आणि व्यवहारिक उपाय आहे.

महिला सक्षमीकरणाची संकल्पना नेमक्या शब्दांत सांगायची झाल्यास, ती एक अशी प्रक्रिया आहे, ज्यात महिलांना त्यांच्या मर्जीने, आवडीनुसार एखाद्या व्यवसायाची मालकी आणि अधिकार स्वत:कडे घेण्याचे स्वातंत्र्य असेल.

महिला सक्षमीकरणाचे महत्वाचे घटक म्हणजे यंत्रणा (एखाद्याचे ध्येय निश्चित ठरवून त्यानुसार कृती करण्याची क्षमता), स्त्री-पुरुषाच्या शक्तीस्थळांची जाणीव, स्वाभिमान आणि आत्मविश्वास असे सांगता येतील. (कबीर, २००१). हे सक्षमीकरण वेगवेगळ्या पातळ्यांवर केले जाऊ शकेल- त्यात वैयक्तिक,कौटुंबिक, सामुदायिक आणि सामाजिक अशा पातळ्यांवर आणि त्यासाठी महिलांना अशा सर्व पातळ्यांवर आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन प्रोत्साहन द्यावे लागेल.(उदाहरणार्थ, नवी कामे किंवा उपक्रमांसाठी प्रोत्साहन देणे,ज्यातून त्यांच्या क्षमता विकसित होऊ शकतील.) आणि कामातले अडथळे दूर करणे (म्हणजे ,संसाधने अथवा कौशल्याची कमतरता)

याच अनुषंगाने, महिला स्वयंउद्योजिकांना प्रोत्साहन आणि वित्तीय समावेशनाच्या दृष्टीने लघुउद्योग कर्ज तसेच महिला बचत गट महत्वाची भूमिका बजावतात. हे गरिबीशी लढण्यासाठीचे एक महत्वाचे साधन तर आहेच, त्यासोबत, देशातील एकूण लोकसंख्येतील सर्वात वंचित, दुर्लक्षित घटक, त्यातही विशेषत्वाने महिलांना सक्षम करण्याच्या दिशेने होत असलेला यशस्वी प्रयत्न आहे. भारतातील काही राज्यातील ग्रामीण भागात तर महिला बचतगट चळवळ एक वरदानच ठरली आहे. यामुळे ग्रामीण भागातील महिलांचे केवळ उत्पन्न वाढले नाही तर त्यांचा सामाजिक दर्जाही सुधारला आहे. आज महिला सक्षमीकरण आणि स्त्री-पुरुष समानता या दोन्ही गोष्टी समाजाच्या सर्व क्षेत्रात प्रगती करण्यासाठी एक महत्वाचा घटक मानल्या जातात. (संजय कांती दास, २०१२)

लघु उद्यमशीलतेमुळे महिला सक्षमीकरण अधिक बळकट होत असून स्त्री-पुरुष विषमता कमी होण्यासही मदत होते आहे. स्वयंसहायता गटांच्या लघुउद्योग पतपुरवठा योजनेमुळे महिला इतर सामुदायिक विकासाच्या उपक्रमांमध्ये देखील सहभागी होत आहेत. लघु उद्योग पतपुरवठ्यामुळे छोट्या-छोट्या उद्योगांना पाठबळ मिळते आहे. आणि याचा मुख्य उद्देश उत्पन्न वाढवणाऱ्या सुविधा निर्माण करुन समाजातील, विशेषत: ग्रामीण भागातील गरिबी दूर करणे हा आहे. काही अध्ययनांच्या निष्कर्षानुसार, देशातील अनेक स्वयंसहायता गट, जसे की, अभिनव फार्मर्स सहकारी संस्था, ग्रासरूट्स, ग्रामीण बँक, आसाम टी कोर्पोरेशन, कुटुंबश्री, इंदिरा क्रांती अशा संस्था महिलांना पतपुरवठा आणि स्वयंउद्यमशीलातेला मदत करुन महिला सक्षमीकरणाच्या कामात मोठे योगदान देत आहेत.

(सहयोगी प्राध्यापक आणि प्रमुख,स्त्री-पुरुष समानता अध्ययन आणि विकास केंद्र, एनआयआरडी आणि पीआर, हैदराबाद)

अभ्यासातून हे ही स्पष्ट झाले आहे की स्वयंसहायता गट हे आधी प्रामुख्याने महिलांसाठी तयार करण्यात आले आणि तामिळनाडू तसेच केरळसारख्या राज्यात, ते अत्यंत यशस्वी झाले आहेत. नाबार्डनेही व्यवसायिक बँका तसेच प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या मदतीने स्वयंसहायता गटातील महिलांसाठी प्रायोगिक तत्वावर काही प्रकल्प हाती घेतले आहेत.त्याशिवाय, अकृषक क्षेत्रांतल्या उद्योगांना कर्जपुरवठा करण्यासाठी, राष्ट्रीय बँकांच्या माध्यमातून कर्ज पुनर्गठीत करण्याची व्यवस्थाही उपलब्ध आहे. तीन राज्यातील अभ्यासानुसार, स्वयंसहायता गटांकडून कर्जाची परतफेड होण्याचे प्रमाण अतिशय चांगले असून, यामुळे बचत गटांच्या महिलांना काटकसर करण्याची सवय लागली तसेच, मिळालेल्या पतपुरवठ्याचा वापर केवळ उत्पन्न वाढवणाऱ्या गोष्टींसाठी करणे सुरु झाल्यामुळे महिलांमध्ये आपोआपच आर्थिक शिस्त निर्माण झाली, ज्याचा लाभ म्हणून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण होतांना दिसते.

केरळ आणि तामिळनाडू या दोन राज्यांमध्ये बचतगटांच्या भक्कम पाठींब्यामुळे अनेक यशस्वी महिला स्वयंउद्योजक आणि लघुउद्योजक तयार झाल्या आहेत.त्यांना लघु-पतपुरवठा केला जातो, महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांच्या क्षमता वाढवल्या जातात, त्याना योग्य आकार दिला

**लघु उद्यमशीलतेमुळे महिला सक्षमीकरण अधिक बळकट होत असून स्त्री-पुरुष विषमता कमी होण्यासही मदत होते आहे. स्वयंसहायता गटांच्या लघुउद्योग पतपुरवठा योजनेमुळे महिला इतर सामुदायिक विकासाच्या उपक्रमांमध्ये देखील सहभागी होत आहेत.**

जातो आणि उद्योग सुरु करण्यासाठी आर्थिक सहाय्यही केले जाते. आज रिझर्व्ह बँकेने सुद्धा लघु वित्तपुरवठा क्षेत्रात बचत गटांचे असलेले महत्व जाणले आहे. आणि नाबार्डच्या मदतीने महिला उद्योजकांना मध्यम स्वरूपाची कर्जे देऊ केली आहेत. महिला स्वयंउद्योजकांची ही भरारी, इतर महिलांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. त्यानाही बचतगटाच्या या मोहिमेत सहभागी होऊन आपला उद्योग सुरु करण्याची प्रेरणा मिळते आहे. जगभरात, अनेक स्टार्ट अप उद्योग, महिलांना भेडसावणाऱ्या वित्तीय समस्यांमुळे अपयशी ठरले आहेत.मात्र भारतात, महिला बचत गट चळवळीमुळे महिला उद्योजकांमध्ये त्यांची स्वप्ने प्रत्यक्षात उतरवण्यासाठीचा विश्वास निर्माण झाला आहे. त्यामुळेच, अशाप्रकाराची वाढ, ही भारतासाठी खरोखरच सर्वसमावेशक वाढ आहे, ज्यातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण साधले जात आहे.( सबिहा फजलभोय, २०१४)

**भारत सरकारने सुरु केलेले उपक्रम :**

महिला उद्योजकांचे महत्त्व आणि देशाच्या अर्थव्यवस्थेतील वृद्धी आणि समृद्धीतील त्यांचा सहभाग लक्षात घेऊन, भारत सरकारने सर्व धोरणे आखताना महिलांना समान संधी मिळेल,अशी काळजी घेतली आहे. भारताच्या उद्यमशीलतेच्या क्षेत्रात ,महिलांना आघाडीवर आणण्याचा सरकारचा प्रयत्न असून, त्यासाठी त्याना कर्ज, उद्योगांसाठी आवश्यक जाळे, बाजारपेठ आणि प्रशिक्षण अशा सर्व सुविधा मिळाव्यात अशी व्यवस्था सरकार निर्माण करत आहे.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास संस्था (एमएसएमई-डीओ), विविध राज्यातली लघु उद्योग विकास महामंडळे, राष्ट्रीयकृत बँका आणि स्वयंसेवी संस्थादेखील महिला उद्योजकांच्या क्षमतांना अधिक समृद्ध करण्यासाठी उद्यमशीलता विकास कार्यक्रमासारखे विविध कार्यक्रम, प्रशिक्षण शिबिरे आयोजित करत आहेत. अशा शिबिरांमधून, कमी शिक्षित किंवा विशेष कौशल्ये नसलेल्या महिलांना उद्योगांसाठी प्रशिक्षित केले जाते. एमएसएमई-डीओद्वारे, टीव्ही दुरुस्ती, प्रिंटींग सर्किट बोर्ड, चामड्याच्या वस्तू, स्क्रीन प्रिंटींग अशा छोट्या व्यवसायांसाठी उद्यमशीलता विकास कार्यक्रम आयोजित केले आहेत. त्याशिवाय महिला उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीची दाखल घेऊन, त्यांना दरवर्षी 'उत्कृष्ट महिला स्वयंउद्योजक' पुरस्काराने गौरविले जाते. एमएसएमई-डीसी कार्यालयात आता महिला उद्योजकांना सहाय्य करण्यासाठी, त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि समन्वय

साधण्यासाठी एक स्वतंत्र कक्षच उघडण्यात आला आहे.

केंद्र सरकारच्या उत्पनाची साधने निर्माण करणाऱ्या आणखीही काही योजना आहेत, ज्या महिला आणि बालविकास मंत्रालयातर्फे राबवल्या जातात. या योजनांच्या माध्यमातून महिलांना रोजगारविषयक प्रशिक्षण दिले जाते तसेच त्यांचे उत्पन्न वाढवणाऱ्या उपक्रमात सहभागी करुन घेतले जाऊन, त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाते.

सिडबी, म्हणजेच भारतीय लघु उद्योग विकास बँकेने महिलांसाठी दोन विशेष योजना सुरु केल्या आहेत. त्यातील एक म्हणजे महिला उद्यम निधी- महिला उद्योजकांना समभाग देणारी ही अशाप्रकारची एकमेव योजना आहे. आणि दुसरी योजना- महिला विकास निधी जी महिलांना उत्पन्न वाढवणाऱ्या उपक्रमात सहभागी होण्यासाठी आवश्यक ते विकासात्मक सहकार्य केले जाते. छोट्या उद्योजकांची, त्यातही महिलांची कर्जाची गरज लक्षात घेऊन सिडबीने महिलांना बिनव्याजी कर्ज मिळण्यासाठी एक अनौपचारिक यंत्रणाही सुरु केली आहे. एवढेच नव्हे तर, सिडबी कर्जाच्या रकमेचा योग्य विनियोग कसा करायचा याचेही प्रशिक्षण देते. केंद्रीय सामाजिक कल्याण मंडळातर्फे सामाजिक- आर्थिक कार्यक्रमाअंतर्गत एखादे उत्पादन केंद्र सुरु करण्यासाठी महिलांना अनुदानही दिले जाते.

स्वयंउद्यमशीलतेला आणि संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी भारतात सुरु करण्यात आलेले काही उप्रकम आणि योजना पुढीलप्रमाणे:

स्टार्टअप इंडिया : स्टार्ट अप इंडिया उपक्रमाअंतर्गत, भारत सरकार स्टार्ट अप कंपन्यांना राजाश्रय, मार्गदर्शन आणि सुविधा पुरवून देशातील स्वयंउद्योजकांना प्रोत्साहन देत आहे. विशेष म्हणजे या कंपन्यांना या सुविधा कायमस्वरूपी मिळणार आहेत. स्टार्ट अप इंडीया ही योजना २०१६ साली सुरु झाली, तेव्हापासून या योजनेअंतर्गत अनेक नव्या होतकरू उद्योजकांना आशेचे, आधाराचे पंख मिळाले आहेत. देशात अधिकाधिक स्टार्ट अप योजना सुरु व्हाव्यात, त्यांना बळ मिळावे यासाठी सरकारने आधीच्या धोरणात आमूलाग्र बदल केला आहे. या योजनेअंतर्गत आता स्वयंउद्योगांसाठी इच्छुक युवकांना चार आठवड्यांचे मोफत आणि सर्वसमावेशी ऑनलाईन प्रशिक्षण दिले जाते. त्याशिवाय, देशभरात विविध ठिकाणी संशोधन केंद्र, इन्क्युबेटर आणि स्टार्ट अप केंद्रे सुरू केली आहेत. त्याशिवाय, उद्योगक्षेत्रातील अभ्यासक्रम आणि उद्योगजगत यांची सांगड घालून व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देण्यावरही भर दिला जातो आहे.

**महिलांसाठीच्या प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रमांना पाठबळ (एसटीएपी):**

ज्या स्त्रियांना औपचारिक कौशल्य प्रशिक्षण सुविधा उलब्ध नाहीत अशा, विशेषत: ग्रामीण भारतातल्या महिलांना प्रशिक्षित करण्यासाठी भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने महिलांसाठीच्या प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रमांना पाठबळ देणारी, एसटीएपी ही योजना सुरू केली. उद्योगजगताच्या आजच्या काळातल्या गरजा लक्षात घेऊन कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय आणि नीती आयोग यांनी नुकतीच ३० वर्षांच्या जुन्या मार्गदर्शक तत्वांची आजच्या काळाशी सुसंगत ठरेल अशी पुनर्रचना केली आहे. या एसटीएपी योजनेंतर्गत महिलांसाठीचे उपक्रम आज देशभरातल्या १६ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या सर्व स्त्रियांपर्यंत पोहोचत आहेत. या उपक्रमाअंतर्गत, शेती, बागकाम, अन्न प्रक्रिया, हातमाग, पारंपरिक कल्याण, प्रवास आणि पर्यटन, आदरातिथ्य, संगणक आणि आयटी सेवा यासारख्या क्षेत्रातील कौशल्य शिकवले जाते.

स्टँड-अप इंडिया : २०१५ साली सरकारने सुरु केलेल्या या योजनेअंतर्गत, देशातील वंचित घटकांना संस्थात्मक पतपुरवठा उपलब्ध करून दिला जातो. भारताच्या अर्थव्यवस्थेत महिलांचा सहभाग वाढवणे आणि देशाच्या विकासाची फळे महिला उद्योजक, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यापर्यत समानतेणे पोहचवणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासठी, कमीत कमी एक महिला आणि अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या समुदायांपैकी एका व्यक्तीला उत्पादन, सेवा किंवा व्यापार क्षेत्रातील ग्रीनफील्ड उद्योग सुरु करण्यासाठी १० लाख ते १ कोटी रुपयांचे पर्यतचे कर्ज दिले जाते. स्टँड-अप इंडिया पोर्टल लहान उद्योजकांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म म्हणून देखील कार्य करते आणि वित्तीय आणि पतपुरवठा हमीबद्दल माहिती प्रदान करते.

व्यापाराशी संबंधित उद्योजकता सहाय्य आणि विकास (ट्रेड): भारताच्या वंचित समाजातील महिलांना कर्ज मिळवण्यात येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी, त्यांच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी, ट्रेड, म्हणजेच व्यापाराशी संबंधित उद्योजकता सहाय्य आणि विकास ही योजना सुरु करण्यात आली आहे. या अंतर्गत काही स्वयंसेवी संस्था (एनजीओ) द्वारे इच्छुक महिलांना पतपुरवठा उपलब्ध करुन दिला जातो. अशाप्रकारे, कर्ज-सुविधा मिळवण्यासाठी महिला कुठल्याही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थाशी संपर्क करू शकतात. या संस्थाकडून प्रस्तावित उपक्रम सुरू करण्यासाठी सल्ला व प्रशिक्षण संधी दिली जाते. तसेच, शेतीसंलग्न उपक्रमांसाठी महिलांना मार्गदर्शन केले जाते.

प्रधानमंत्री कौशल्या विकास योजना (पीएमकेव्हीवाय): ही कौशल्य विकास व उद्योजकता (एमएसडीई) मंत्रालयाची पथदर्शी योजना आहे. हा एक कौशल्य प्रशिक्षणावर आधारित उपक्रम आहे. रोजगारक्षमतेसाठी संधी वाढविण्यासाठी आणि जगण्यासाठीचे कौशल्य मिळवण्यासाठी उद्योग-संबंधित कौशल्यांमध्ये युवकांना प्रशिक्षित करण्याचे काम या अंतर्गत केले जाते. =पूर्व शिक्षण, अनुभव किंवा कौशल्ये असलेल्या व्यक्तींचेही याअंतर्गत पुनर्मूल्यांकन केले जाते आणि आधी घेतलेल्या प्रशिक्षणाचे प्रमाणपत्रही दिले जाते. या उपक्रमातील प्रशिक्षण आणि मूल्यांकननाचे पूर्ण शुल्क सरकार देते.

समभाग सशक्तीकरण आणि विकासासाठी विज्ञान (सीईईडी) : सीईईडीचा उद्देश महिलाना, विशेषत: ग्रामीण भागातल्या महिलांच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी विशिष्ट प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करण्याच्या उद्देशाने होतकरु शास्त्रज्ञ आणि लोकांमध्ये प्रत्यक्ष काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना कृती-प्रवण आणि स्थानिक परिसराशी सुसंगत अशा विविध योजना राबवण्यासाठी संधी उपलब्ध केल्या जातात. ग्रामीण भागात होणाऱ्या विविध संशोधनांना तज्ज्ञांकडून गुणवत्ता, पायाभूत सुविधांचे ज्ञान आणि मार्गदर्शन मिळावे, या दृष्टीने, देशातील राष्ट्रीय प्रयोगशाळा आणि इतर तज्ज्ञ तसेच संशोधन आणि प्रशिक्षण संस्थांना या ग्रामीण संशोधकांशी जोडण्याचे प्रयत्न केले जात आहेत. विकासाचे लाभ देशातील सर्व घटकांपर्यंत समानतेने पोचावेत, यावर सीईईडीचा भर आहे. जेणेकरून लोकसंख्येच्या व्यापक भागात, विशेषत: वंचित घटकांपर्यंत आधुनिक तंत्रज्ञानाचे लाभ पोचवता येतील.

नीती आयोगाने सुरु केलेला महिला उद्योजकता मंच : भारतातील महिलांच्या उद्योजक आकांक्षा जागृत करत, त्यांच्यातील संशोधनवृत्तीला प्रोत्साहन देत, त्यांच्या उद्योगांना शाश्वत, दीर्घकालीन आधार देण्यासाठी मार्ग तयार करण्याच्या दृष्टीने, नीती आयोगाने हा उपक्रम सुरु केला आहे. गतिमान नव भारत तयार आणि सशक्त करण्यात हातभार लावणाऱ्या महिला स्वयंउद्योजकांची संख्या लक्षणीयरीत्या वाढावी, या हेतूने नीती आयोगाने त्यांना एक व्यासपीठ प्रदान केले आहे. महिला स्वयंउद्योजगता मंच महिलांच्या आकांक्षाच्या तीन खांबांवर उभा राहिला आहे, ते आहेत :इच्छा शक्ति, (होतकरू उद्योजकांना त्यांचे नवे व्यापार-उद्योग सुरु करण्यास प्रोत्साहन देणे) ज्ञान शक्ती: स्वयंउद्योगजगतेला प्रोत्साहन देण्यासाठी महिला उद्योजकांना ज्ञान आणि पोषक परिस्थिति उपलब्ध करून देणेआणि कर्म शक्ती म्हणजे, व्यवसायाची स्थापना आणि व्यवसाय वाढविण्यास उद्योजकांना पाठबळ देणे.

महिलांसाठी मुद्रा योजना : ज्या महिलांना आपला स्वत:चा वैयक्तिक उद्योग सुरु करायचा आहे, त्यांच्यासाठी केंद्र सरकारने ही योजना सुरु केली आहे. ब्युटी पार्लर्स, शिवणकाम उद्योग, शिकवणी केंद्रे असे छोटे व्यवसाय सुरु करण्यासाठी या योजनेअंतर्गत कर्ज दिले जाते. त्याशिवाय काही महिलांनी एकत्र येऊन एखादा व्यवसाय सुरु करण्याचे ठरवल्यास, त्यासाठीही त्यांना कर्ज दिले जाते. या कर्जाला कोणत्याही तारण किंवा सुरक्षिततेची आवश्यकता नसते आणि तीन प्रकारच्या योजनांनुसार कर्जाचा लाभ घेता येतो.

१.शिशु कर्ज: या शिशु-कर्जाची रक्कम ₹ ५०,००० पर्यंत मर्यादित आहे. ज्यांचे व्यवसाय अगदी प्राथमिक पातळीवर आहेत, त्यांना या अंतर्गत कर्ज मिळू शकते.

२.किशोर: किशोर कर्जाची रक्कम ₹५०,००० आणि ₹५ लाख दरम्यान आहे. ज्या कंपन्या आता व्यवसायात स्थिरावल्या आहेत अशा कंपन्या हे कर्ज मिळवू शकतात.

३:तरुण कर्ज -या अंतर्गत कर्जाची रक्कम ₹१० लाख असून व्यवसायात उत्तम स्थान मिळवलेल्या कंपन्यांना हे कर्ज मिळू शकेल. कंपनीच्या विस्तारासाठी देखील मुद्रा योजनेअंतर्गत कर्ज मिळू शकेल.

**निष्कर्ष :**

महिलांमधील स्वयंरोजगार, ही बाब आज देशाच्या आर्थिक विकासाचा एक महत्वाचा स्त्रोत म्हणून ओळखली जाते. महिला उद्योजक स्वत:साठी आणि इतरांसाठी नवीन नोकऱ्या, रोजगार तयार करतात आणि व्यवस्थापन, संस्था आणि व्यवसायाच्या समस्यांसंदर्भात येणाऱ्या अडचणीवर मात करत समाजालाही विविध पातळ्यांवर सहकार्य करतात. मात्र, आजही अशा स्वयंउद्योजक महिलांची संख्या नगण्य आहे.

महिला उद्योजक एकाच वेळी अनेक उद्दिष्ट्ये साध्य करु शकतात. कुटुंब आणि समुदायांचे आर्थिक कल्याण, दारिद्र्य निर्मूलन आणि महिला सशक्तीकरण यांमध्ये त्या भरीव योगदान देतात, म्हणजे, एका तऱ्हेने त्या शाश्वत विकासात मोठा सहभाग देत आहेत.

अशा प्रकारे, जगभरातील सरकारे आणि विविध विकासात्मक संस्था सक्रियपणे महिला उद्योजकांना विविध योजना, प्रोत्साहन आणि प्रोत्साहन उपायांच्या माध्यमातून सक्रिय मदत करत आहेत.

■■■

*लेखिका राष्ट्रीय ग्रामविकास आणि पंचायतराज संस्थेतील एका विभागाच्या प्रमुख आणि सह प्राध्यापिका आहेत.*

*ई मेल: madhurinv5@gmail.com*

कायदा

# महिला सबलीकरण कायद्यातील तरतुदी

- गीता लुथ्रा




**राष्ट्राचा समग्र विकास साधायचा असेल तर कोणत्याही बंधनाशिवाय स्वत:चे निर्णय स्वत: घेऊन पुरूषांच्या बरोबरीने समान वागणूक मिळविण्याच्या दृष्टीने महिला सबलीकरण ही काळाची गरज आहे राज्यघटनेने सर्वांना समानतेचा हक्क दिला आहे त्याचबरोबर स्त्री पुरूष भेदाभेदही असू नये असेही घटनेमध्ये नमूद केलेले आहे असे असूनसुध्दा लिंगाधारित भेदांभेदीची पाळेमुळे अगदी प्राचीन काळापासून दिसून येतात.**

'जन जागृती करायची आहे तर प्रथमत: महिलांमध्ये जनजागृती करा एकदा स्त्री जागृत झाली की कुटुंब जागृत होईल, गाव जागृत होईल आणि संपूर्ण देश जागृत होईल.'- पंडीत जवाहरलाल नेहरू

राष्ट्राचा समग्र विकास साधायचा असेल तर कोणत्याही बंधनाशिवाय स्वत:चे निर्णय स्वत: घेऊन पुरूषांच्या बरोबरीने समान वागणूक मिळविण्याच्या दृष्टीने महिला सबलीकरण ही काळाची गरज आहे राज्यघटनेने सर्वांना समानतेचा हक्क दिला आहे त्याचबरोबर स्त्री पुरूष भेदाभेदही असू नये असेही घटनेमध्ये नमूद केलेले आहे असे असूनसुध्दा लिंगाधारित भेदांभेदीची पाळेमुळे अगदी प्राचीन काळापासून दिसून येतात.

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या अंतर्गत घटनापीठाने अलिकडील काही वर्षांत या संदर्भातील काही कलमांवर विस्तृत विवेचन केले आहे. हे विवेचन विविध कायदे तपासणी मध्ये अत्यंत सकारात्मक आहे. त्याच प्रमाणे उपयुक्तसुध्दा आहे. विशेषत: भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३७६, जे बलात्कारासंबंधी आहे, कलम ३७७ जे पुरूषापुरूषांमधील अनैसर्गिक संबंध त्याचप्रमाणे समलिंगी संबंधांबद्दल आहे. त्याचप्रमाणे कलम ४९७ जे व्यभिचारासंबंधी आहे. सद्यपरिस्थितीतील या कलमांची उपयुक्तता यावर ही चर्चा केलेली आहे.

कलम ४९७ अंतर्गत एखाद्या पुरूषाने एखाद्या माणसाच्या पत्नी बरोबर त्या माणसाच्या परवानगी शिवाय संबंध ठेवले तर संबंध ठेवणाऱ्या व्यक्तीला शिक्षा सुनावणी जाते. लिंगभेदाधारित शिक्षेसाठी ही तरतुद दिसते. परंतु घटनेच्या कलम १४ आणि १५ नुसार हे उल्लंघन आहे. कारण एकतर अशा तरतुदीमध्ये स्त्री ही व्यैयक्तिक संपत्ती समजली जाते, आणि म्हणून जर संमतीने 'संबंध' प्रस्थापित केले असतील तर हा गुन्हा समजला जाणार नाही. आणि दुसरे म्हणजे हा गुन्हा त्या व्यक्तीचा समजला जातो जो पुरूष दुसऱ्याच्या पत्नीशी अनैतिक संबंध ठेवतो. यात ती स्त्री स्वत: बळी असल्याने शिक्षेस पात्र नाही. तिसरा मुद्दा असा की, १८६० मध्ये हा कायदा बनल्यानंतर यामध्ये काहीही बदल अगर सुधारणा केली गेली नाही. १९७१ मधील ४२ व्या कायदा अहवालाच्या आणि २००३ मधला मालिमठ समितीच्या अहवाल लिंगभेद नाहीसा करण्याविषयी सुधारणा सुचवत असता त्यांच्याकडे डोळेझाक झालेली दिसते. कितीतरी न्यायालयीन निर्णयांत यांची संवैधानिक वैधता मानली गेली मात्र जोसेफ शाइन वि. युनियन ऑफ इंडिया यामध्ये या सुधारणा उजेडात आल्या. यादाव्यात सर्वोच्च न्यायालयात या तरतूदींच्या वैधतेला आव्हान दिले गेले. यामध्ये पीठाने असे निरीक्षण केले की, लिंगाधारित समानतेचा अभाव आहे. ४९७ मधील पतीच्या संमतीमुळे स्त्रीच्या स्वपरिचयाला बाधा येते. मात्र आता स्त्रीही पुरूषाइतकीची सबळ आहे हे समाजाने मान्य करण्याची गरज आहे. आणि कायद्यात नमूद केलेली ही तरतुद अप्रचलित वा पुरातन आहे. कलम ४९७ विवाह संस्थेला यामुळे बाधा आणू देत नाही, त्याच बरोबर जर का

त्यातून काही पेच झाला तर आपल्या समाजातील उच्च परंपरा आणि विवाह संस्थांचे पावित्र्य यांना हानी पोहोचेल या दृष्टीने त्यावर पडदा टाकला जाईल. व्यभिचाराचा चमत्कारीपणा असा की १९५५ च्या हिंदू विवाह कायद्यामध्ये विवाह भंग करण्यासाठी पाया तयार करून देतो. कारण तो या कायद्यांतर्गत गुन्हा समजण्यात येतो.

भारताच्या सर्वोच्च न्यायालयासमोर चर्चेत असलेला महत्वपूर्ण मुद्दा असा की तत्काळ पध्दतीने दिला जाणारा तिहेरी तलाक. या पध्दतीतील तरतुदी मुस्लिम कायद्यातील तरतुदीचा भाग आहेत का? हा एक महत्वपूर्ण प्रश्न सर्वोच्च न्यायालयासमोर आहे. तिहेरी तलाक पध्दती, शिया मुस्लिम समाजामध्ये प्राचीन काळापासून चालत आलेली पध्दती आहे. प्रामुख्याने हनाफी स्कूलमध्ये ही प्रथा विशेषत: चालून आलेली आहे. या पध्दतीमध्ये मुसलमान व्यक्ती एकतर्फी तसेच कायमचा तीन वेळा तलाक, तलाक शब्द उच्चारून आपल्या पत्नीला घटस्फोट देतो. वर्षानुवर्षे या पध्दतीच्या तलाकमुळे मुसलमान महिलांना हानी पोहोचली आहे. या संदर्भात मुस्लिम व्यक्ती टेक्स्ट मेसेज करून, किंवा चेष्टा मस्करीने म्हणून घेतलेला तलाक दोन्ही वैध मानले जात असत तो तलाक प्रमाण मानला जात असे. राशिद अहमद वि. अनिसा खातून् ए आय आर १९३२ पीसी २५ या दाव्यामधून एक अट अशी निष्पन्न झाली की, घटस्फोट घेताना ती व्यक्ती प्रौढ असावी. काही वेळा तर पत्नीसमोर शब्दोच्चारण केले नसतानाही आणि ज्याक्षणी पत्नीला या संदर्भात कळेल त्या क्षणापासून तो अंमलात आला असे समजण्यात येईल. उदा. पथाई वि. मोइददीन १९६२ केएलटी ७६३. असे असताना एका महत्वपूर्ण निकालामध्ये हिना आणि इतर वि. उत्तरप्रदेश सरकार २०१७ आर् सी आर् सिव्हिल ३१३ यामध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले आहे की, सबळ कारणाशिवाय तलाक हा शब्दोच्चारण करून त्यापूर्वी कोणतीही तडजोड केलेली नसेल तर हा विधियुक्त 'तलाक' मानला जाणार नाही. अशाच प्रकारचे निरीक्षण भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने शमिम आरा वि. उत्तरप्रदेश सरकार आणि इतर या खटल्यामध्ये असे म्हटले आहे की, तलाकची दखल अशा तऱ्हेने घेण्यात यावी की, त्यातील व्यक्तीवर अन्याय झाल्याची भावना असेल. असे असून सुध्दा, तत्काळ तलाकाची दखल घ्यावीच लागेल. कारण मुस्लिम महिलेची तक्रार नसताना सुध्दा मुस्लिम पुरूषाला न्यायालयीन जाब विचारता येतो. हा कायदा मुसलमान महिलांना त्यांच्या हक्काविषयी प्रोत्साहित करण्याकरिता, मुसलमान पुरूषांच्या हक्कांला आवडी निवडीला बाधा आणून त्यांच्यामध्ये भेदभाव करतो.

संपत्तीवरचा हक्क आणि स्त्रियांचा स्वत:ची संपत्ती असल्याचा हक्क या दोन विषयांवर न्यायालयाची उहापोह चालू आहे. या विषयावर न्यायालयीन घोषणा चालू आहेत. पुरवणी पत्रके येत आहेत, तसेच कायदेशीर कारवाई देखील चालू आहे.

हिंदू वारसाहक्क कायद्याच्या १९५६ च्या अधिसुचनेनुसार स्त्रियांना कुटुंबांच्या संपत्तीमध्ये हक्क असल्याचे स्पष्ट केले. हक्क माहेरी तसेच सासरी दोन्ही ठिकाणी असल्याचे स्पष्ट झाले आहे. यापूर्वी असे हक्क मर्यादित स्वरूपात असत. अनुसूचित जातींच्या कायद्यांनुसार त्याचप्रमाणे इतर विविध धार्मिक कायदद्यानुसार एखाद्या स्त्रीने समाजाबाहेरील व्यक्तीशी विवाह केला तर तिच्या स्वत:च्या संपत्तीतून त्याचप्रमाणे वडिलोपार्जित संपत्तीतून तिच्या संपत्तीविषयक हक्कांना बाधा आणता येत होती. छोटा नागपूर टेनन्सी ॲक्ट १९०८ मध्ये ज्या महिला समाजाबाहेरील व्यक्तिशी विवाह करतील त्यांचे आईवडिलांच्या संपत्तीतील हक्क संपूष्टात आले असे मानले जाई. अशाच त-हेची तरतूद पारसी कायद्यामध्येही आहे. पारसी कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की एखाद्या पारसी महिलेने समाजाबाहेरील व्यक्तिशी विवाह केला तर तिची धार्मिक ओळख पुसली जाई. त्याचप्रमाणे पारसी पुरूषाने समाजाबाहेरील महिलेशी विवाह केला तर त्यांच्या मुलांना पारसी समाजाचे हक्क मिळतात. परंतु पारसी महिलेने समाजाबाहेरील व्यक्तिशी विवाह केला तर तिच्या मुलांना पारसी समाजाचे हक्क मिळत नाहीत. एखाद्या पारसी महिलेने समाजाबाहेरील व्यक्तिशी विवाह केला तर तिला स्मशानभूमीत प्रवेशबंदी असते तसेच आईवडिलांच्या अंतिम कार्यालादेखील उपस्थित राहण्यास मज्जाव असतो. 'गुलरूख गुप्ता' या पारसी महिलेने या प्रथेला गुजरात उच्च न्यायालयामध्ये आव्हान दिले. या संदर्भात समाजाचा निर्णय माननीय न्यायालयाने योग्य ठरविला. न्यायालयाने इतर सर्व समाजाच्या बाबतीतील प्रथा, परंपरांचा निरीक्षण करत उदा. ख्रिश्चन समुदाय, पारसी समुदाय वगैरे असे मत नोंदवले की महिलेच्या विवाहानंतर तिच्या लग्न झालेल्या नव-याच्या धार्मिक प्रथा परंपराबरोबर तिचे वर्तन असावे. याला पुढे सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले जेव्हा एक पारसी ट्रस्ट या वर्षानुवर्षे चालत आलेल्या रूढींविरोधात न्यायालयात गेली आणि 'टॉवर ऑफ साइलेन्स' अर्थात मातापित्यांचे अंतिम विधी मध्ये उपस्थित राहण्यास समाजाबाहेर लग्न करून गेलेल्या मुलीस परवानगी मागण्यात आली.या दाव्यामध्ये त्या मुलीची धार्मिक ओळख पूर्णत: पुसून जाते का या प्रश्नावर खल करण्यात आला. यावर न्यायालयाने असे निरीक्षण जाहीर केले की, जर समाजाबाहेर विवाह करणारा कुणी पुरूष त्याची धार्मिक ओळख अबाधित ठेवू शकत असेल तर स्त्री का नाही? कदाचित या बाबत असे म्हणता येईल की स्त्री विवाहबंधनात अडकताना आपली ओळख गहाण टाकते, ज्यामध्ये

धार्मिक ओळखीचाही अंतर्भाव आहे.

भारतात बलात्काराच्या घटना वारंवार समोर यायला लागल्यानंतर माननीय न्यायालयाने कायद्यांमध्ये ब-याच सुधारणा करावयास सुरूवात केली. सन २०१३ च्या अगोदर बलात्काराची व्याख्या कलम ३७५ भारतीय दंड विधानानुसार अत्यंत त्रोटक होती. ज्यामध्ये केवळ लैंगिक संभोगाविषयी मत अंतर्भूत होते. मात्र अत्यंत प्रसिध्द अशी निर्भया बलात्काराचा दावा समोर आला आणि गुन्हे कायदा सुधारणा २०१३ बलात्कारविरोधी विधेयक उदयास आले ज्यामध्ये उपरोक्त संकल्पनेची व्याप्ती वाढवण्यात आली. ज्यामध्ये बळजबरीने बाह्य वस्तूंचा वापर अथवा शरीरात शिरकाव इत्यादींचा समावेश करविला आहे. सन २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने या दाव्यातील ६ पैकी ४ जणांना फाशी सुनावली असून एक गुन्हेगार अल्पवयीन होता त्यामुळे क्रूरतेच्या सा-या मर्यादा पार करूनही त्याची सुटका तीन वर्षांनंतर झाली. अठरा वर्षे पूर्ण होण्याकरिता अवघे तीन महिने बाकी असल्यामुळे त्याची गणती बालगुन्हेगारांमध्ये करण्यात आली होती. या नंतरच्या प्रकरणात, अल्पवयीन मुलांच्या कामकाजासाठी बालसुरक्षा आणि संरक्षण कायदा २०१५ पारित करण्यात आला. या कायद्यानुसार १६ वर्षे किंवा त्यावरील व्यक्तिंनी घृणास्पद गुन्हा केल्यास - असा गुन्हा जो सात वर्षे वा अधिक शिक्षेसाठी पात्र असतो, अशा व्यक्तीला प्रौढ समजण्यात येऊन शिक्षेस पात्र ठरवण्यात यावे अशी तरतूद केली गेली. कठुआ येथे घडलेल्या सामूहिक बलात्कार प्रकरणानंतर गुन्हेगारी दुरूस्ती कायदा २०१८ हा राष्ट्रपती महोदयांच्या मान्यतेनंतर अध्यादेश काढण्यात आला. ज्यायोगे बलात्कारासारख्या प्रकरणांमध्ये अधिक शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे, त्यातही १६ वर्षांखालील मुलींसाठी याची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यात येईल.

यामध्ये नोंद घेण्याजोगा भाग म्हणजे बलात्काराची व्याख्या. कायद्यामध्ये बदल करूनसुध्दा विवाहानंतरच्या बलात्कार हा बलात्कार समजण्यात येत नाही. मात्र मुलगी १५ वर्षांखालील असेल तर या विधानास अपवाद ठरतो. याबाबतची भूमिका लक्षात घेता या विरूध्द घेतलेली भूमिका आपाल्या समाजामध्ये विवाहसंस्थेला बाधा आणणारी आहे.

'भारतीय घटनेच्या प्रस्तावनेची सुरूवात अशी आहे की, आम्ही भारतीय जनता एकमुखाने ठराव करत आहोत की, आम्ही भारतीय सार्वभौम , सामाजिक धर्मनिरपेक्ष लोकशाही जनता आणि .......'

धर्मनिरपेक्षता म्हणजे देशातील सर्व धर्मांना समान वागणूक असा होय. समान नागरी कायदा धर्मनिरपेक्षतेच्या आसाच्या केंद्रस्थानी बसविलेला खिळा आहे. अशाच तऱ्हेच्या आचारसंहितेची गरज वैयक्तिक कायद्यामध्ये प्रकर्षाने जाणवते कारण भारतामध्ये महिलांच्या बाबतीत केला जाणारा दुजाभाव. आणि म्हणून लिंगभेदाविरहित प्रवास गाठण्यासाठी आपल्याला बरीच मजल गाठावी लागेल. घटनेच्या कलम १४ मध्ये सर्व नागरिकांना समान कायद्याविषयी बोलते. मग गुन्हेगारी असो वा दिवाणी, सर्वांना सर्व समान कायदे आहेत. मात्र वैयक्तिक कायदे यास अपवाद ठरतात. महिला त्यांच्या मूलभूत हक्कांसाठी न्यायालयाकडे वारंवार धाव घेतात. हे पाहून कायदेमंडळाला समान नागरी कायद्याबद्दलच्या अंमलबजावणीविषयी विचारणा होते जेणे करून स्त्रीपुरूष वैयक्तिक कायद्यांमध्ये समान पारडयात असतील. घटनेचे ४४ वे कलम अर्थात राज्य धोरण निर्देशक तत्वे, समान नागरी कायद्याचा उल्लेख करतात. 'नागरिकांच्या सुरक्षेसाठी राज्यांनी समान नागरी कायद्याचा संपूर्ण भारतवर्षात पुरस्कार व्हावा याकरिता पराकाष्ठा करावी'. मो. अहमद खान वि. शाहबानो आणि इतर या दाव्यात सर्वोच्च न्यायालय म्हणते की घटनेचे कलम १४ हे मृतपत्रच आहे. या मुद्द्यावर कोणताही समाज मांजराच्या गळयात घंटा बांधू इच्छित नाही त्याचप्रमाणे अहेतुक सवलत घेण्यासही तयार नाही. समान नागरी कायदा आणण्याची राज्यांची जबाबदारी असून वैधानिक उत्तरदायित्व त्यांच्याजवळ आहे.मात्र कितीही अडचणी आल्यातरी राज्यघटनेस काही अर्थ असेल तर कुठूनतरी सुरूवात ही व्हावयास हवी. सरला मुद्गल वि. युनियन ऑफ इंडिया १९९५ मध्ये या समान नागरी कायद्याच्या गरजेबद्दल चर्चा घडली. याचे अंमलबजावणी फार अडचणीची आहे. खासकरून भारतासारख्या धर्म, जाती यांसारख्या सांस्कृतिक वैविध्याने नटलेल्या देशात हे कठीण भासते. धर्मस्वातंत्र्याला यामुळे बाधा येईल. शिवाय कितीही प्रगतशील असला तरी जनतेच्या रूकाराशिवाय कोणताच निर्णय बळजबरीने लादता येत नाही.

अशा तऱ्हेने भारतामध्ये गेल्या अनेक वर्षापासून बदल घडविण्याची गरज भासत आहे आणि यामध्ये भारताचे सर्वोच्च न्यायालय आपली विधायक भूमिका बजावत आहे. जुनाट कायद्यांना नवा आकार देत आहे. असे असून सुध्दा आपल्याला बरीच मोठी मजल मारावी लागणार आहे आणि ज्यामुळे महिलांना समाजामध्ये समान भूमिका मिळू शकेल.


■■■

*लेखिकेने सर्वोच्च न्यायालयात भारत सरकारच्या विशेष वकिल म्हणून काम केलेले असून मागील ३५ वर्षांपासून त्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात ज्येष्ठ वकील म्हणून कार्यरत आहेत.*

*ई मेल: geetaluthra@gmail.com*

# स्त्री शिक्षण: धोरणात्मक तरतुदी व सामाजिक वास्तव

-डॉ. विजय गायकवाड



**भारतीय शिक्षणाचा इतिहास अभ्यासता, शिक्षणाचे सुसंबध्द स्वरूप वैदिक काळापासून आरंभ झाले असले तरी अनेक बदल स्थित्यंतरातून भारतातील शिक्षणव्यवस्था पुढे आली आहे. लॉर्ड मॅकेलेप्रणीत 'झिरपण्याचा सिध्दांत' मांडणाऱ्या शिक्षण व्यवस्थेची दारे जातिव्यवस्थेतील सर्व जात समूह तसेच स्त्रियांसाठी खुली होण्यासाठी संघर्ष करावा लागला.**

स्वातंत्र्योतर कालखंडात भारताने कल्याणकारी राज्य ही धोरण रणनीती ठरविली, त्यानुसार सामाजिक, आर्थिक राजकीय प्रगतीची ध्येय धोरणे आखण्यात आली. प्रस्तुत लेखात महिला सक्षमीकरणाच्या संदर्भात शिक्षणाची सर्वव्यापी भूमिका अभ्यासताना शिक्षणविशयक धोरणांच्या तरतुदी व त्यातील स्थित्यंतरे मांडली आहेत. भारतीय शिक्षणाचा इतिहास अभ्यासता, शिक्षणाचे सुसंबध्द स्वरूप वैदिक काळापासून आरंभ झाले असले तरी अनेक बदल स्थित्यंतरातून भारतातील शिक्षणव्यवस्था पुढे आली आहे. लॉर्ड मॅकेलेप्रणीत 'झिरपण्याचा सिध्दांत' मांडणाऱ्या शिक्षण व्यवस्थेची दारे जातिव्यवस्थेतील सर्व जात समूह तसेच स्त्रियांसाठी खुली होण्यासाठी संघर्ष करावा लागला हे सर्वज्ञात आहे. प्रत्येक क्षेत्रातील महिलांचा वाढणारा सहभाग समर्थनीय असला, तरी महिलांच्या सक्षमीकरणासंदर्भात वैयक्तिक, कौटुंबिक तथा सामाजिक पातळीवर सकारात्मक दृष्टीकोनाची गरज आहे. घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये लिंगभाव समानतेचा पुरस्कार करताना कलम १४, १५ व १६ नुसार मूलभूत हक्क प्रदान करण्यात आले आहेत. याषिवाय स्त्रियांचा समाजातील दर्जा, प्रतिष्ठा सुधारण्याकरिता मूलभूत अधिकार यासाठी राज्यघटनेच्या कलम ३८, ३९ व ३९-ब, ४२-ब मध्ये तरतूद करण्यात आली आहे.

महिलांच्या प्रश्नांचा मानवी हक्कांच्या दृष्टीने ऊहापोह झाला पाहिजे याकडे संयुक्त राष्ट्र संघाने लक्ष वेधताना १९७५ हे वर्ष प्रथमत: आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर केले. यानुसार विशिष्ट गतीने महिलांची प्रगती घडवून आणावी यासाठी १९७९ मध्ये आंतरराष्ट्रीय संकेत तयार करण्यात आले. यामधील सीडॉ (Convention of the Elimination of all Forms of Discrimination Against Women) हा दस्तऐवज महत्त्वाचा मानला जातो. याची दखल घेऊन लिंगभाव विषमता, कौटुंबिक हिंसाचार या केंद्रस्थ बाबी तसेच नवव्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टपूर्ती म्हणून २००१ मध्ये महिला सक्षमीकरणाचे राष्ट्रीय धोरण ठरविण्यात आले. प्रस्तुत धोरण ठरविताना, १९७४ च्या राष्ट्रीय आराखड्यानुसार 'समानतेच्या दिशेने' हे तत्व व १९८८-२००० मधील श्रमशक्ती अहवाल यांच्या आधारे महिलांना समान संधी, निर्णय प्रक्रियेत सहभाग, सर्व पातळ्यांवर दर्जेदार शिक्षण, रोजगारविशयक सुरक्षितता, आरोग्य व सामाजिक सुरक्षितता यांचा अंतर्भाव करण्यात आला. केंद्र शासनाने नुकतेच २०१६ मध्ये महिला सक्षमीकरणाचे दुसरे धोरण जाहीर केले. महिलांच्या संदर्भात ध्येय धोरण ठरविताना महाराष्ट्र राज्याने १९९४, २००१ यानंतर २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण जाहिर केले. वरील धोरणांच्या उद्धिष्टपूर्तीसाठी स्त्रियांच्या क्षमता विकसित करणाऱ्या 'शिक्षण' या सामाजिक घटकात स्त्रिया अग्रभागी असल्यास धोरणकर्ते, प्रशासक

यांना जागतिक पटलावर स्त्रियांचे सक्षमीकरणाचे इप्सित साधणे शक्य होईल.

देशाचे भविष्य हे शाळेतील वर्गांमध्ये आहे हे शिक्षणाविषयक नेमलेल्या कोठारी आयोगाचे प्रतिपादन महत्त्वाचे ठरते. या दृष्टीने महिलांच्या सक्षमीकरणाकडे पाहणे आवश्यक आहे. २००९ च्या शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदीनुसार सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाची सोय उपलब्ध करण्यात आली आहे. याशिवाय, शालेय स्तरावर मुलांची उपस्थिती वाढण्यासाठी पोषण आहार, पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके यासारख्या धोरणात्मक तरतुदी स्वागतार्ह ठरल्या आहेत. शिक्षणाच्या संदर्भात पुढील पाऊल टाकताना सहस्त्रक विकास धोरण ठरविताना सर्वांना समान व दर्जेदार शिक्षणाचे ध्येय ठरविण्यात आले आहे. याशिवाय महिलांचा विविध क्षेत्रातील सहभाग वाढविण्यासाठी दहाव्या पंचवार्षिक योजनेपासून अंदाजपत्रकीय खर्चामध्ये लिंगभाव समानता दर्शविण्याच्या दृष्टीने तरतुद करण्यात येत आहे. लिंगभाव आधारित संवेदनाबाबत राज्यसंस्थेची धोरणे व तरतुदी सकारात्मक आहेत. मात्र याची जागरूकता महिलांमध्ये निर्माण होण्यासाठी शिक्षणविषयक सकारात्मकता आवश्यक आहे. प्रस्तुत लेखाच्या माध्यमातून महिलांच्या संदर्भात असलेल्या धोरणात्मक तरतुदींचा ऊहापोह केला आहे.

### महिलांच्या सर्वांगीण विकासाकरिता असलेल्या महत्त्वपूर्ण योजना

महिलांचे सक्षमीकरण, सुरक्षितता आणि आरोग्य संवर्धनासाठी केंद्रशासनामार्फत 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या योजनेची सुरूवात हरियाणाच्या पानिपत येथून २२ जानेवारी २०१५ पासून झाली. या योजनेच्या माध्यमातून मुलींच्या जन्माबरोबर तिच्या शिक्षणाची जबाबदारी शासन उचलते. महिलांच्या आरोग्याच्या दर्जात सुधारणा होण्यासाठी राष्ट्रीय आहार मिशन योजनेबरोबरच गरीब, असंघटित क्षेत्रातील गर्भवती महिलांसाठी 'मातृत्व लाभ योजना' सुरू करण्यात आली आहे. स्वयंपाकासाठी पारंपरिक इंधन साधनांच्या वापरामुळे महिलांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी 'पंतप्रधान उज्जवला योजना' सुरू करण्यात आली आहे. शिक्षण, आरोग्य याबरोबर

---

**२००९ च्या शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदीनुसार सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाची सोय उपलब्ध करण्यात आली आहे. याशिवाय, शालेय स्तरावर मुलांची उपस्थिती वाढण्यासाठी पोषण आहार, पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके यासारख्या धोरणात्मक तरतुदी स्वागतार्ह ठरल्या आहेत.**

---

महिलांची सुरक्षितता हा ऐरणीवरील मुद्दा असून यासंदर्भात, देशातील ११५ जिल्ह्यांकरिता 'पंतप्रधान महिला शक्ती केंद्रे' सुरू करून महिलांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात कटिबध्दतता दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. याबरोबरच अडचणीत असलेल्या महिलांसाठी देशातील २८ राज्यांत आणि केंद्रशासित प्रदेशात २४ तास कार्यरत असलेली १८१ क्रमांकाची हेल्पलाईन कार्यरत आहे. महिलांप्रती सामाजिक जाणीव जपण्याला प्राधान्य देत असताना परितक्त्या महिलांसाठी स्वाधार केंद्र चालवली जात आहेत. महाराष्ट्र राज्यदेखील महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी योजना राबवित आहे. यामध्ये प्रामुख्याने कुपोषणावर मात करण्यासाठी यूनिसेफच्या अर्थसहाय्यातून कुपोषण मुक्तिसाठी राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन हे अभियान राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले आहे. याशिवाय स्त्री-पुरूषांचे लिंग गुणोतरामध्ये समानता राखण्यासाठी व स्त्री जन्माचे स्वागत करण्यासाठी 'माझी कन्या भाग्यश्री योजना' तसेच 'सुकन्या समृध्दी योजना' राबविल्या जात आहेत. 'मेक इन महाराष्ट्र ते स्टार्टअप' या योजनांच्या माध्यमातून महिलांना उद्योगक्षेत्रात नाविन्यपूर्ण संधी उपलब्ध होण्याचे प्रमाण २० टक्के पर्यंत वाढविणे प्रस्तावित आहे. महिलांचा विविध उद्योगांमधील सहभाग वाढविण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाद्वारे महिलांना स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून रोजगारक्षम केले जात आहे. राज्यातील या गटांना आर्थिक अडचणी येऊ नयेत म्हणून बँकेमार्फत बिनव्याजी कर्ज उपलब्ध होण्यासाठी सुमतीबाई सुकळीकर महिला उद्योगिनी सक्षमीकरण ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू करण्यात आली आहे.

वरील योजना व उपक्रम महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण आहेत. मात्र या योजनेचा लाभ घेण्यासाठी सामाजिक व वैचारिक प्रगल्भता आवश्यक असून या क्षमतांचा विकास होण्यासाठी संबंधित महिला शिक्षित असणे आवश्यक आहे. सामाजिकरणाच्या प्रक्रियेत शिक्षण हा अविभाज्य घटक असून शिक्षणही दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार शिक्षण हे सामाजिक न्याय व समानता साधण्याचा महत्त्वाचा घटक आहे. यासाठी प्रत्येकाचे हक्क व स्वातंत्र्य अबाधित राहील या दृष्टीने सर्वांसाठी शिक्षण म्हणजे प्रत्येकाला

अनुरूप शिक्षण मिळणे आवश्यक आहे. यामध्ये स्त्री-पुरूष भेदभाव, शिक्षण संधीमध्ये असमानता याला स्थान दिले जाऊ नये.

**शैक्षणिक धोरण व स्त्री शिक्षण**

स्त्रीशिक्षणा विषयीचा वसाहतकाळापासूनचा प्रवास विचारात घेता १८८२ मध्ये नेमलेल्या 'हंटर आयोगान' स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करताना शिक्षणातील सहभाग वाढविण्यासाठी वेगळया पाठ्यक्रमाची शिफारस केली होती. पुढे १९ व्या शतकात कलकत्ता व मद्रास येथे मुलींच्या शिक्षणाला मिशनरींमार्फत उत्तेजना मिळाली. मुलींच्या शिक्षणासंदर्भात ही सकारात्क सुरूवात असली, तरी १९२७ मध्ये पुणे येथे भरलेल्या अखिल भारतीय महिला परिषदेमध्ये मुलींचा लवकर होणाऱ्या विवाहामुळे मातृत्वाची जबाबदारी पडते. अशा स्थितीमुळे महिलांच्या शिक्षणाकडे होणारे दुर्लक्ष याकडे सदर परिषदेमध्ये लक्ष वेधण्यात आले. स्वातंत्र्योत्तर काळात आखलेल्या धोरणांमध्ये सुरूवातीपासून स्त्री शिक्षणाकडे लक्ष केंद्रित करताना लिंगभाव संवेदना दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी बहुतांश पाठ्यपुस्तकांमधून स्त्रियांना आदर्श माता, पत्नी, भारत माता अशा उपाधी देऊन गौरवीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. १९८६ च्या शिक्षण धोरणान्वये अभ्यासक्रम लिंगभाव संवेदनशीलतेकडे लक्ष वेधून लिंगभाव समानतेचा पुरस्कार करण्याला प्राधान्य दिले आहे. १९९० नंतरच्या दशकात आलेल्या संदर्भ ग्रंथात पुरूशत्ताक व्यवस्थेत स्त्रियांच्या भूमिका बदलत आहेत; त्यामध्ये वेतन, कुटुंबातील स्थान याबरोबर राष्ट्रउभारणील स्त्रियांचे योगदान सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी यासारख्या महिलांना स्थान देण्यात आले. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालखंडापासून शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचा मुद्दा चर्चिला जात आहे. यानुसार शिक्षणातील नोंदणी वाढविण्याला प्राधान्य देण्यात आले. मात्र १९७३-७४ या कालावधीत देषात शाळेत दाखल झालेल्या १४ ते १७ वयोगटातील एकूण ७ दशलक्ष मुलांच्या तुलनेत मुलींची नोंदणी फक्त २.६९ इतकी होती. हे प्रमाण ग्रामीण व मागास भागात अधिक होते. यावर मात करण्यासाठी मागास भागांमध्ये मुलींच्या शिक्षणासाठी सुविधा पुरविण्यावर भर दिला गेला. चौथ्या पंचवार्षिक योजनेत सामाजिक बदल व आर्थिक प्रगतीचे साधन म्हणून शिक्षणाकडे

**१९८६ च्या शिक्षण धोरणान्वये अभ्यासक्रम लिंगभाव संवेदनशीलतेकडे लक्ष वेधून लिंगभाव समानतेचा पुरस्कार करण्याला प्राधान्य दिले आहे. १९९० नंतरच्या दशकात आलेल्या संदर्भ ग्रंथात पुरूशत्ताक व्यवस्थेत स्त्रियांच्या भूमिका बदलत आहेत.**

पाहण्यात आले. यानुसार समाजातील सर्व घटकांपर्यंत शिक्षणाचे महत्त्व पोहचविण्याला प्राधान्य देण्यात आले. मात्र प्रस्तुत योजनेच्या कालावधीत अनुसूचित जाती, जमातींच्या मुलींची शालेय स्तरावरील अल्प नोंदणीकडे विशेष लक्ष वेधण्यात आले. याकरिता धोरणात्मक तरतूद म्हणून पुढे सातव्या पंचवार्षिक योजनेच्या कालखंडात १९८४-८५ मध्ये प्राथमिक पातळीवर ९२ टक्के तर माध्यमिक पातळीवरील ५३ टक्के मुलांच्या तुलनेने मुलींची टक्केवारी अनुक्रमे ६९ व ३८ पर्यंत नेण्याचे प्रयत्न झाले.

१९९२ मधील शिक्षण धोरणामध्ये स्त्रियांच्या सबलीकरणावर विशेष भर देताना सामाजिक आणि प्रादेशिक पातळीवरील असमानता दूर करण्याबाबतचा प्राधान्यक्रम ठरविण्यात आला. नवव्या पंचवार्षिक योजनेत १९९३ मध्ये झालेल्या सहाव्या All India Survey चा आधार घेण्यात आला. यानुसार १ कि.मी. च्या परिसरात प्राथमिक शाळा व ३ कि.मी. च्या परिसरात उच्च प्राथमिक शाळा सुरू करण्याला प्राधान्य देऊन मुलींच्या शिक्षणाचा सकारात्मक विचार करण्यात आला. मुलींची शालेय स्तरावर नोंदणी वाढविण्यासाठी सकारात्मक उपाययोजना केल्या जात आहे. मात्र प्रत्येक आदिवासी बहुल प्रांतांच्या सामाजिक, आर्थिक व भौगोलिक परिस्थिती यामध्ये भिन्नता असल्याने धोरणांच्या अंमलबजावणी प्रक्रियेत परिस्थितीनुरूप गरजा आधारित कृती कार्यक्रमाची आवष्यकता आहे. २००१-०२ मध्ये 'सर्व शिक्षा अभियान' याद्वारे शालेय स्तरावर ग्रंथालयांसाठी विपुल ग्रंथसंपदा याबरोबर मुलींच्या शिक्षणासाठी शाळा व शालेय साहित्यासाठी अधिक सहाय्य करण्याला प्राधान्य देण्यात आले. याशिवाय मध्यान्ह भोजन योजना, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, एस.सी, एस.टी, ओबीसी तसेच अल्पसंख्यांक मुलींसाठी निवासी शाळा सुरू करण्याची शिफारस करण्यात आली. या शिफारषींना बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत अधिक बळकटी देण्याचा प्रयत्न करताना मागास घटकांतील विशेषत: आदिवासी मुलींच्या क्षमता वृध्दीसाठी स्पर्धा परीक्षांची तयारी होण्याच्या दृष्टीने मोफत मार्गदर्शनाचा पर्याय पुढे आला. कालानुपरत्वे निर्धारित केलेल्या धोरणांमध्ये महिलांचा शिक्षणातील सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने धोरणकर्त्यांनी उचललेल्या सकारात्मक पावलांमुळे वेगवेगळ्या आघाड्यांवर महिलांनी ठसा उमटलेला आहे.

## समारोप

२०११ च्या जनगणनेनुसार महिलांचे प्रमाण ४८.५ टक्के असून, ६५.४६ टक्के महिला साक्षरतेचे प्रमाण आहे. साक्षरतेची आकडेवारी समाधानकारक असली, तरी महिलांचा आरोग्याचा दर्जा, पारंपरिक कुटुंबव्यवस्थेत असलेले दुय्यम स्थान, असंघटित व कृषी क्षेत्रांमध्ये वाढते अवलंबित्व यामुळे स्त्रियांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असून ४६ टक्के महिलांमध्ये अल्परक्तता (ॲनिमिक) आढळते हे बंडोपाध्याय व सुब्रमण्यम (२०११) या अभ्यासकांनी दाखवून दिले आहे. आरोग्याचा निम्न दर्जा व कुपोषण यामुळे पुरेसा बौध्दिक विकास होत नाही. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत झपाट्याने विकसित होणारे सेवाक्षेत्र यामुळे 'मुक्त स्पर्धेशिवाय विकास नाही' हे एकविसाव्या शतकातील ब्रीदवाक्य आहे. या प्रक्रियेत उच्चतम शैक्षणिक कामगिरीच्या जोरावर श्रम बाजारात कौशल्याधारित रोजगार मिळविण्याचे स्त्रियांपुढे आव्हान आहे. राज्यसंस्थेमार्फत ठरविलेल्या वर मांडलेल्या धोरणात्मक शिफारशी महिला शिक्षणाला पूरक आहेत, मात्र समाजातील पुरूषसत्ताक सत्तासंबंध व स्त्रियांना परंपरागत मिळालेले दुय्यमत्व यामुळे महिलांना शिक्षणाच्या पटलावर सिध्द होण्यासाठी पुरेशा अवकाशाची गरज आहे. २०१५-१६ मधील NFHS च्या चौथ्या सर्वेक्षणानुसार ९२.८ टक्के पुरूषांच्या तुलनेत महिला साक्षरतेचे प्रमाण ८०.३ टक्के होते. मात्र दहावीपेक्षा अधिक शिक्षण घेतलेल्या महिलांचे प्रमाण केवळ ४२ टक्के असल्याचे या सर्वेक्षणातून दिसून येते. यावर मात करण्यासाठी स्त्रियांकडे पाहण्याच्या पारंपरिक दृष्टीकोनात बदल करण्याची आवश्यकता आहे. सहस्त्रक विकास धोरणांमधील तिसरे ध्येय 'लिंगभाव समानता व महिला सबलीकरण' ठरविण्यात आले आहे. यासंदर्भात कबीर (२००५) या विदुषी प्रतिपादन करतात की, समाजात अस्तित्वात असलेल्या लिंगभावाधारित विषमतेमुळे शिक्षणाच्या क्षेत्रात प्रस्तुत ध्येय साध्य करण्यासाठी २०३० पर्यंतचा कालावधी पुरेसा नाही. यासाठी अकृषक क्षेत्रातील स्त्रियांच्या मजुरीत वाढ त्याचबरोबर भारतीय संसदेत स्त्रियांच्या सदस्यत्वात वाढ अपेक्षित आहे. शिक्षण या सामाजिक घटकाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण साधण्याचा यशस्वी प्रयत्न होत आहे. मात्र स्त्री शिक्षणाचा प्रचार प्रसार केवळ शैक्षणिक संस्थापुरता मर्यादित न राहता एक सामाजिक बांधिलकी म्हणून विचार होणे आवश्यक आहे.

■■■

*लेखक सामाजिक विषयाचे अभ्यासक आहेत.*

*ई मेल: vijay.gaikwad09@gmail.com*



# आदिवासी महिलांचे सक्षमीकरण-प्रश्न व पुढील वाटचाल

-दीपक खांडेकर



**सामाजिक रचनेत आदिवासी महिलांना वेगळे स्थान आहे त्यांचे लिंग गुणोत्तर म्हणजे दर हजारी पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण ही काळजीची बाब आहे. २००१ मध्ये हे प्रमाण दर हजार पुरूषांमागे ९७८ होते ते २०११ मध्ये ९९० झाले आहे. भारतातील अनुसूचित जमातींमध्ये साक्षरता दर राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी होता. राष्ट्रीय सरासरी ७३ टक्के आहे महिलांमध्ये साक्षरता दर ४९ टक्के तर पुरूषांमध्ये ६९ टक्के आहे.**

भारतात अधिसूचित अशा ७०५ अनुसूचित जमाती आहेत, याशिवाय ७५ धोक्यातील आदिवासी गट सध्या अस्तित्वात आहेत. अनुसूचित जमातीमध्ये २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या ८.६ टक्के लोक समाविष्ट आहेत. आकडेवारीच्या भाषेत सांगायचे तर १९६१ मध्ये या लोकांचे प्रमाण ३ कोटी होते ते २०११ मध्ये १०.४ कोटी झाले आहे. आदिवासी महिलांची संख्या ही एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ४९.७ टक्के म्हणजे ५.१९ कोटी आहे.

सामाजिक रचनेत आदिवासी महिलांना वेगळे स्थान आहे त्यांचे लिंग गुणोत्तर म्हणजे दर हजारी पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण ही काळजीची बाब आहे. २००१ मध्ये हे प्रमाण दर हजार पुरूषांमागे ९७८ होते ते २०११ मध्ये ९९० झाले आहे. भारतातील अनुसूचित जमातींमध्ये साक्षरता दर राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी होता. राष्ट्रीय सरासरी ७३ टक्के आहे महिलांमध्ये साक्षरता दर ४९ टक्के तर पुरूषांमध्ये ६९ टक्के आहे. आदिवासी कामकाज मंत्रालय हे सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयापासून १९९९ मध्ये वेगळे काढण्यात आले त्याचा हेतू भारतातील आदिवासी लोकांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारणे हा होता. आदिवासींचा सन्मान व संस्कृती कायम राखतानाच मानवी विकासात त्यांना इतरांच्या बरोबरीने आणणे याचा प्रयत्न सुरू आहे. काही प्रक्रियांची फेर बांधणी व उपलब्ध साधने यांचा विचार यात करण्यात आला. विशिष्ट शैक्षणिक, पायाभूत व इतर सुविधातून आदिवासींचा विकास साधणे यासाठी मंत्रालय प्रयत्नशील आहे.

भारतीय राज्यघटनेत यासाठी अनेक तरतुदी आहेत त्यात महिलांना समानता मिळवून देतानाच सक्षम करण्यासाठी अनेक उपाय केलेले आहेत. राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार राज्यघटना ८९ वी सुधारणा कायदा २००३ अनुसार कलम ३३८ समाविष्ट केले आहे. त्यानुसार आदिवासी महिलांसाठी सकारात्मक सापत्नभाव करण्याचे अधिकार सरकारला मिळाले आहेत. आदिवासी कामकाज मंत्रालयाने अनुसूचित जमातीच्या महिला व पुरूषांसाठी अनेक महत्वाची धोरणे आखली आहेत. एकलव्य आदर्श निवासी शाळा ही एक योजना त्यात महत्वाची असून त्यात आदिवासींच्या शिक्षणाचा दर्जा उंचावणे हा एक हेतू आहे.या शाळांमध्ये पन्नास टक्के मुली आहेत. शैक्षणिक, क्रीडा व इतर क्षेत्रात या मुलामुलींची कामगिरी चांगली आहे. अनुसूचित जमातींच्या मुलींवर आश्रमशाळांचा भर आहे. मुलींना चांगले वातावरण अनुसूचित जमातींसाठी नसलेल्या शाळांमध्येही उपलब्ध केले जात आहे. अनुसूचित जमातीच्या मुलींसाठी विशेष शाळा वसतीगृहे सुरू करण्यात आली आहेत. या मुलींना शिक्षणासाठी अर्थसहाय्यही देण्यात येते. दहावी पूर्वी व नंतर त्यांना

शिष्यवृत्ती दिल्या जातात. महाविद्यालय व विद्यापीठ पातळीवर राष्ट्रीय विद्यावृत्ती व शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी एमफील व पीएचडीसाठी एकूण ३० टक्के विद्यावृत्ती आदिवासी मुलींकरता आहेत. नॅशनल ओव्हरसीज स्कॉलरशीप योजनेत या मुलींना ३० टक्के जागा राखीव आहेत. त्या पीएचडी व त्यानंतरचे शिक्षण घेता येते. स्वयंसेवी संस्थांना कमी साक्षरता असलेल्या जिल्ह्यांमध्ये अशा शाळा चालवण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. यातून आदिवासी मुलींची साक्षरता कमी असलेल्या जिल्ह्यात शिक्षण सुधारण्यासाठी या उपाययोजना आहेत. राष्ट्रीय अनुसूचित जमाती अर्थ व विकास महामंडळ ही अनुसूचित जमातींच्या आर्थिक प्रगतीसाठी सर्वोच्च संस्था मानली जाते. महामंडळ हे अनुसूचित जमातींसाठी आदिवासी महिला सशक्तीकरण योजना राबवीत आहे. या योजनेत महामंडळ १ लाखांचे अर्थसहाय्य किमान ९० टक्के प्रकल्पांना देत आहे. त्यासाठी केवळ चार टक्के व्याज दर आकारला जातो. महिला लाभार्थींना यातून उत्पन्न मिळतेच शिवाय रोजगारही निर्माण होतात. याशिवाय अनुसूचित जमातीच्या महिलांना किमान आधारभूत किंमत व किमान किफायतशीर किंमत वन संपत्तीसाठी दिली जाते. भारतीय आदिवासी विपणन विकास महासंघ हा अनुसूचित जमातीच्या महिलांना व कलाकारांना मदत करीत आहे.

अनूसूचित जमाती व इतर आदिवासी कायदा (वनहक्क मान्यता) कायदा २००६ अनुसार महिलांना सर्व पातळ्यांवर सामावून घेतले जात आहे. स्त्री व पुरूष या दोघांच्या नावाने वनहक्क देण्यात येत आहेत. वन हक्क समितीत दोन तृतीयांश सदस्य हे अनुसूचित जमातीचे असावे लागतात



व त्यात एक तृतीयांश महिला असणे बंधनकारक आहे. आदिवासींसाठी विशेष अर्थसहाय्य योजना आहेत त्यात कलम २७५ (१) अन्वये कौशल्य विकास व क्षमता निर्माण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात

**स्वयंसेवी संस्थांचे दूरस्थ भागात मोठे काम आहे. त्यात या संस्था आरोग्य व शिक्षण क्षेत्रात आदिवासी भागात मदत करीत आहेत. आदिवासींमधील अनुसूचित जाती व जमातीच्या महिलांची प्रगती व सक्षमीकरण या उद्दिष्टांना मंत्रालय वचनबद्ध असून अनेक आव्हाने असूनही त्यातून मार्ग काढला जात आहे.**

अनुसूचित जमातींच्या महिलांना राज्यांमध्ये प्रशिक्षण देण्यात येते. त्याला आदिवासी कामकाज मंत्रालयाचा पूर्ण पाठिंबा आहे. आदिवासी संशोधन संस्था या जनजागृतीसाठी कार्यशाळा व जागरूकता कार्यक्रम राबवतात. पंचायत राज व्यवस्थेत काम करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या महिलांना नेतृत्व विकास, महिला सक्षमीकरण, वन हक्क कायदा, याची माहिती दिली जाते. आदिवासी भागात रस्ते, बाजारपेठा उपलब्ध केल्या जात आहेत. प्रक्रिया व साठवण सुविधाही दिल्या जात असून राष्ट्रीय व राज्य पातळीवर आदिवासी कामकाज मंत्रालयाने आदिवासी महोत्सवांना प्राधान्य दिले आहे त्यात महिलांचा समावेश असून त्यांच्या कलागुणांना वाव तसेच अर्थार्जन असे दोन्ही उद्देश त्यांना साध्य होतात. इतर मंत्रालयांच्या पूरक कार्यक्रमातही ते जर आदिवासी विकासाशी संबंधित असतील तर आदिवासी मंत्रालय मदत करते. या मंत्रालयाची पन्नास टक्के तरतूद ही शिक्षण, आरोग्य, पोषण व रोजीरोटी यावर खर्च केली जाते. स्वयंसेवी संस्थांचे दूरस्थ भागात मोठे काम आहे. त्यात या संस्था आरोग्य व शिक्षण क्षेत्रात आदिवासी भागात मदत करीत आहेत. आदिवासींमधील अनुसूचित जाती व जमातीच्या महिलांची प्रगती व सक्षमीकरण या उद्दिष्टांना मंत्रालय वचनबद्ध असून अनेक आव्हाने असूनही त्यातून मार्ग काढला जात आहे. साधारण लोक व अनुसूचित जमातीचे लोक यांच्यातील विकासात्मक दरी कमी केली जात आहे. यात मंत्रालयाला यश येत असून यापुढेही त्यासाठीचे प्रयत्न दुपटीने वाढवले जातील. आदिवासींची संस्कृती व परंपरा कायम ठेवून त्यांचा विकास साधला जाईल.

■■■

*लेखक केंद्रीय आदिवासी कल्याण मंत्रालयाचे सचिव आहेत.*

*ई मेल: secy-tribal@nic.in*

विशेष लेख

# मुस्लिम स्त्रिया आणि सक्षमीकरण

-सईदा हमीद



**समाजातील वाईट प्रथांना वाचा फोडण्याचे, समाजाचे प्रबोधन करण्याचे क्रांतीकारी कार्य प्रेषित मोहम्मद पैगंबरांनी हाती घेतले होते. त्या काळात स्त्रियांना जनावरांपेक्षाही वाईट वागणूक दिली जायची. अशा परिस्थितीत पैगंबरच्या शिकवणींनी मुस्लिम समाजात क्रांती निर्माण केली. अन्याय्य निराशेच्या अंध:कारातून बाहेर काढून स्त्रियांना विकासाच्या संधींची, समान हक्कांची तेजस्वी प्रभा पैगंबरांनी इस्लामच्या शिकवणुकीतून दाखवली. मालमत्तेवर समान अधिकार मिळवून दिला. अशा प्रकारे कुराणने महिला सशक्तीकरणाचा मार्ग दाखवला.**

मुस्लिम स्त्री स्वत:ची स्वतंत्र सामाजिक अस्मिता न स्वीकारता आपली ओळख एकाच वर्गाच्या पण इतर समाजातल्या स्त्रियांबरोबर वाटून घेण्याच्या संकुचित मानसिकतेला आजतायत पाळत आली आहे. तिच्या धर्माने तिला सर्वश्रेष्ठता देऊन गौरव केला असला तरीही मुस्लीम समाजाने तिला योग्य तो मान दिलेला नाही. सुरत अल अहझाब यांनी पवित्र कुराणमध्ये उद्धृत केलेल्या ओळींवरून इस्लाममधील स्त्रीपुरूष आपपरभाव व भेदाभेद यासंदर्भाबाबत प्रास्ताविक करूया.

**मुस्लिम पुरुष आणि महिलांसाठी**

पुरुष आणि महिलांवर विश्वास ठेवण्यासाठी

आज्ञाधारक पुरुष आणि महिलांसाठी

सच्च्या पुरुष आणि स्त्रियांसाठी

संयम असलेल्या पुरूष आणि स्त्रियांसाठी

नम्र पुरुष आणि महिलांसाठी

धर्मादाय पुरुष आणि महिलांसाठी

शुद्ध आणि चारित्र्यवान पुरुष आणि स्त्रियांसाठी

अल्लाहच्या नामस्मणात व्यस्त असलेल्या पुरुष आणि स्त्रियांसाठी

अशा सर्वांना अल्लाह नेहमी क्षमा करतो आणि वरदान देतो.

उपरोक्त ओळीं या मुस्लिम महिलांसाठी सार्वभौमिक कुराणिक आदेश आहे जो त्यांना समाजात पुरुषांप्रमाणेच समान पातळीवर ठेवतो. पण जर धर्माने कोणताही भेद मानलेला नाही तर मग प्रश्न पडतो की कुराण आणि प्रेषित यांना स्त्रियांसाठी अपेक्षित असलेली समानता, प्रतिष्ठा आणि दर्जा समाजात कोठे आहे? का आजही जगभरातील मुस्लिम महिला त्यांचे स्वतंत्र अस्तित्व नाकारणाऱ्या प्रस्तापित अन्याय व अत्याचाराविरूध्द संघर्ष करीत आहेत? आधीच कमकुवत म्हणून हिणवल्या गेलेल्या समस्त मुस्लिम स्त्री वर्गाची खालावलेल्या सामाजिक स्थितीला नावं ठेवण्यापुरते समाजमन पुढे येते पण परिस्थिती सुधारण्यासाठी काहीच पुढाकार घेतला जात नाही. थोडक्यात, मुस्लिम स्त्रिया अजूनही विकासाच्या मार्गापासून इतक्या दूर का आहेत?

इस्लाम धर्माची निर्मिती विशेष संदर्भातून झालेली आहे. इस्लामच्या माध्यमातून तत्कालीन समाजातील वाईट प्रथांना वाचा फोडण्याचे, समाजाचे प्रबोधन करण्याचे क्रांतीकारी कार्य प्रेषित मोहम्मद पैगंबरांनी हाती घेतले होते. त्या काळात स्त्रियांना जनावरांपेक्षाही वाईट वागणूक दिली जायची. अशा परिस्थितीत पैगंबरच्या शिकवणींनी मुस्लिम समाजात क्रांती निर्माण केली. अन्याय्य निराशेच्या अंध:कारातून बाहेर काढून स्त्रियांना विकासाच्या संधींची, समान हक्कांची तेजस्वी प्रभा पैगंबरांनी इस्लामच्या शिकवणुकीतून दाखवली. मालमत्तेवर समान अधिकार मिळवून दिला. अशा प्रकारे कुराणने



**बेगम शरीफा हमीद अली**

**बेगम शरीफा हमीद अली** यांचा जन्म गुजरात मधील वडोदरा येथील राष्ट्रवादी दृष्टिकोन बाळगणाऱ्या व राष्ट्रीय एकात्मतेचा पुरस्कार करणाऱ्या एका पुरोगामी कुटुंबात झाला. १९०७ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या सत्रात सहभाग घेतल्यानंतर त्यांनी स्वदेशी चळवळीचा प्रसार व हरिजनांच्या सामाजिक न्याय मिळवून देण्याच्या कार्यात स्वत:ला झोकून दिले.

तत्कालीन आघाडीच्या महिला विचारवंत सरोजिनी नायडू राणी राजवाडे आणि कमला देवी चट्टोपाध्याय यांच्यासह अखिल भारतीय महिला काँग्रेस स्थापन करण्याच्या कामी शरीफा बेगम यांनी मोलाचे योगदान दिले. पुढे भारतीय महिला काँग्रेसचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले. महिलांच्या सामाजिक परिस्थितीवर अभ्यास करण्यासाठी संयुक्त राष्ट्राच्या आयोगावर भारतीय प्रतिनिधी म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. मुस्लिम महिलांना न्यायिक हक्क मिळावेत यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. यामध्ये मुस्लिम महिलांच्या विवाहाच्या वयामध्ये वाढ, वैवाहिक कराराच्या नियमांमध्ये सुधारणेसह महिलांना विवाहाच्या बाबतीत अधिक स्वातंत्र्य देणारे हक्क इत्यादींचा समावेश होता.

त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नियोजन परिषद, हिंदुस्तान पाठ्यपुस्तक समिती व अखिल भारतीय महिला शिक्षण सहयोग इ. संस्थांत सदस्य म्हणून मोलाचे योगदान दिले.

महिला सशक्तीकरणाचा मार्ग दाखवला. परंतु संकुचित पितृसत्ताक मानसिकता असलेला मुस्लिम समाज आजही आपल्या समाजाच्या सर्वांगिण उत्थानाचा मार्ग न स्विकारता जुन्याच अन्याय्य रूढी पाळत आहे.

इज्तिहाद म्हणजे नवकल्पना, नवीन समजूती. पण पुरूषप्रधान मुस्लिम समाजाने आजवर नवकल्पनांना अनुकूल न बनता केवळ आपल्या हितसंबंधांचा सामाजिक व कौटुंबिक स्तरावर आपले अधिकारिक नियंत्रण राखून ठेवण्यावरच भर दिला आहे. मुस्लिम समाज बदलेला नाही, तसेच मुस्लिमांनी प्रगती केली नाही. मुस्लिम समाजात जी सुधारणा झाली ती पैगंबरांच्या काळात त्यानंतर आजवर मुस्लिम समाज जखडलेल्या अवस्थेतच आहे.

मुस्लिमांनी प्रेषितांचे हादित (थोर वचनं) वाचणे बंद केले तसेच त्यांचे सुन्नाह (पायंडे) मानणेदेखील सोडून दिले. त्यांच्या शिकवणुकींचा नेमका

**मुस्लिम समाजात विवाह दरम्यान सर्रास हुंडा घेतला जातो. प्रत्यक्षात इस्लाममध्ये हुंडा घेण्याची अनिष्ट प्रथा प्रतिबंधित आहे. तसेच जातीची संकल्पना इस्लाममध्ये नाही .जातीनिहाय सामाजिक उच्चनीच भेद देखील इस्लाममध्ये निषिद्ध आहे. तरीही आकडेवारीनुसार २००४-०५ मध्ये ४१% मुस्लिमांनी स्वत:ला ओबीसी म्हणून घोषित केले आहे.**

भावार्थ समजून न घेता त्यांच्या शिकवणुकींचा आपल्या सोईप्रमाणे अर्थ लावला. बाकी धर्मांच्या संस्कृतींतून चांगल्या रितीभाती घेण्याऐवजी त्यांची पितृसत्ताक मूल्य स्वीकारली. उदाहरणार्थ गेल्या अनेक वर्षांपासून मुस्लिम समाजात विवाह दरम्यान सर्रास हुंडा घेतला जातो. प्रत्यक्षात इस्लाममध्ये हुंडा घेण्याची अनिष्ट प्रथा प्रतिबंधित आहे. तसेच जातीची संकल्पना इस्लाममध्ये नाही. जातीनिहाय सामाजिक उच्चनीच भेद देखील इस्लाममध्ये निषिद्ध आहे. तरीही आकडेवारीनुसार २००४-०५ मध्ये ४१% मुस्लिमांनी स्वत:ला ओबीसी म्हणून घोषित केले आहे. मुस्लिम समाजात जातिव्यवस्थेतूनच महिलांविरोधातील हेतूपुरस्पर हत्या (ऑनर किलिंग सारख्या) गुन्ह्यांमध्ये भर टाकणाऱ्या काही घटना घडल्या. १९९७ मध्ये अशी एका भयंकर घटना मी स्वत: फार जवळून पाहिली होती. त्यावेळी राष्ट्रीय महिला आयोगाची सदस्य म्हणून काम पाहताना हरियाना राज्याच्या मेवत जिल्ह्यातील १९ वर्षीय माईमून या मुलीच्या हेतूपुरस्पर हत्या रोखण्याचा आमचा प्रयत्न पूर्णत: असफल ठरला. १९९७ ते २००० या कालावधीत राष्ट्रीय महिला आयोगाची सदस्य म्हणून काम करताना संपूर्ण देशातील मुस्लिम महिलांच्या सामाजिक स्थितीबाबत सर्वेक्षण करण्याचे ठरवले. यामध्ये मुस्लिम महिलांना त्यांच्या सामाजिक व्यथा मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा आगळावेगळा



त्याबा खेदिवे जंग

ब्रिटिश पूर्व भारतीय मुस्लिम समाजात आपल्या कार्यातून वैचारिक क्रांती घडवून समाज प्रबोधनातून स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत सकारात्मक बदल घडवण्यासाठी शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या पुरोगामी शिक्षणतज्ज्ञ लेखिका 'त्याबा खेदिव जंग' यांचा जन्म हैदराबाद येथे झाला.

त्यांनी 1894 मध्ये मद्रास विश्वविद्यालयातून बीए ही पदवी मिळवून त्या काळात पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण करणारी पहिली मुस्लिम महिला होण्याचा मान मिळवला. विवाहानंतर औपचारिक शिक्षण थांबवले तरी ऊर्दू भाषेत विविध्यपूर्ण लेखन करण्याबरोबरच त्यांनी अरेबिक व पर्शियन या भाषा शिकल्या. त्यांचा भारतीय लोक कथांवर आधारित कथासंग्रह त्यावेळी लंडनमधील एका भारतीय मासिकातून प्रकाशित झाला होता.

शिक्षण व इस्लाम धर्मातील सामाजिक संदर्भावर त्यांनी बरेच लेखन केले. तत्कालीन हैदराबाद संस्थानात वसलेल्या मुस्लिम समाजावर नव्याने प्रस्थापित झालेल्या ब्रिटिश वसाहतीच्या व पाश्चिमात्य विचारशैलीच्या अंमलावर भाष्य करणारी 'अन्वारी बेगम' ही कादंबरी लिहिली. ही कादंबरी विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात उर्दू भाषेमध्ये लिहिली गेलेली अतिउत्तम दर्जाच्या साहित्य कृतींपैकी एक म्हणून नावाजली गेली.

ब्राह्मण समाजाने आयोजित केलेल्या महिलांच्या वार्षिक परिषदेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले. यांच्या अथक प्रयत्नांतूनच शैक्षणिक क्षेत्रात नावाजली गेलेली 'अंजुमन ख्वातीन इ-इस्लाम' ही संस्था स्थापन झाली.

प्रयत्न करण्यात आला. उत्तर-दक्षिण पूर्वपश्चिम सर्व विभागातील प्रमुख शहरे जसे, अहमदाबाद, इंदूर, जबलपूर, मुंबई, कोल्हापूर, हैदराबाद, बंगलोर, चेन्नई, कलकत्ता, तिरूअनंतपुरम, कालीकत व तेजपूर येथे सार्वजनिक सभा आयोजित करून महिलांना मोकळेपणे त्यांना भेडसावणाऱ्या सामाजिक समस्या मांडण्याचे आवाहन केले. प्रत्येक सभेत शेकडो मुस्लिम महिलांनी आपल्या व्यथांना मुक्तपणे वाचा फोडली. यामध्ये गरीबी या प्रमुख मुद्यासह मुस्लिम वैयक्तिक कायदा मंडळाच्या (मुस्लिम पर्सनल लॉ) जाचक नियमांचा समावेश होता. याशिवाय मुस्लिम समाजामध्ये अनेक काळापासून चालत आलेली बहुपत्नीत्व विवाह पद्धती, तडकाफडकी घटस्फोटाची तीन वेळा तलाक बोलून पत्नीला घटस्फोट देण्याची तिहेरी तलाक पध्दती, कोणत्याही शुल्लक कारणासाठी तडकाफडकी

**एकाच वेळी तीनदा तलाक बोलण्याची प्रथा पैगंबर मोहम्मद यांच्यानंतर सुरु झाली. अनेक इस्लामी देशात याला मान्यता नाही. पण भारतात आजही ही प्रथा कायम आहे. देशातील एकूण मुस्लिम लोकसंख्येपैकी ७० टक्के सुन्नी पंथातील उलेमा याला मान्यता देतात. १९३७ मध्ये मुस्लिम पर्सनल लॉ अप्लिकेशन ॲक्टच्या सेक्शन २ मध्ये याविषयी तरतूद आहे.**

सोडून दिल्यानंतर उदरनिर्वाहासाठी नवऱ्याकडून कोणतीही पोटगी मिळत नसल्यामुळे निराधार झालेल्या अनेक मुस्लिम महिला विशेषत: झर्दोसी चे काम करणाऱ्या कारागिर महिला, बिड्या वळणाऱ्या स्त्रिया, घरोघरी काम करणाऱ्या स्त्रिया, शेतमजूर स्त्रिया यांनी मुस्लिम समाजातील अन्याय्य रूढीं विरुद्ध त्यांना आलेले वाईट अनुभव सांगितले. या सर्वेक्षणातून मुस्लिम महिलांच्या परिस्थितीचा वास्तवदर्शी पुरावा प्राप्त झाला. कैक वर्षे निमूटपणे अन्याय सहन करणाऱ्या या महिलांनी निर्भीडपणे आपली जीवनव्यथा देशासमोर मांडली.

समाजातील या वास्तवाचा लेखाजोखा व त्यावरील शिफारसी सरकारी यंत्रणा, धोरणकर्ते व धार्मिक संस्थांना सादर करण्यात आल्या. यामागील उद्देश असा होता की कालपरत्वे चालत आलेल्या अनिष्ट रूढी बंद करून योग्य सर्वसमान न्याय व सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा हक्क सर्व स्तरातील महिलांना प्राप्त होऊ शकेल अशी नवी धोरणे तयार केली जावीत. न्यायामूर्ती राजेंद्र सचार यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने देशातील विविध समूदायांतील महिलांच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली. २००७ या वर्षी या समितीने आपला

अहवाल सादर केला. यातील नोंदीनुसार देशात मुस्लिम स्त्रियांची अवस्था दलित व मागासवर्गीय महिलांपेक्षाही वाईट आहे. यानंतर २०११ साली करण्यात आलेल्या राष्ट्रीय जनगणनेतूनही हीच बाब अधोरेखित झाली.

सन २००० पासून मुस्लिम महिलांच्या अनेक सामाजिक संस्थांकडून इस्लाम धर्माच्या पवित्र धर्मग्रंथ कुराण मधील संदर्भांचा दाखला देऊन मुस्लिम वैयक्तिक कायद्यामध्ये महत्वपूर्ण सुधारणा करण्याची, स्त्री व पुरुषांना मानवी हक्क देण्याची मागणी वाढत आहे. जगभरातील मुस्लिम समाजातच प्रबोधनाची, स्त्री-पुरुष समानतेची वैचारिक स्थित्यंतरे घडत असून यामध्ये मुस्लिम विद्वान महिला अत्यंत गांभीर्याने इस्लामच्या धर्मग्रंथातून मांडलेला स्त्री स्वातंत्र्याच्या स्त्री-पुरुष समानतेचा दृष्टीकोन संदर्भासह अभ्यासत आहेत.

भारताच्या संदर्भात मुस्लिम महिला फोरम च्या स्थापनेनंतर महिलांच्या विविध प्रश्नांवर काम करणाऱ्या इतरही काही संघटना अस्तित्वात आल्या. यापैकी एक २००६ यावर्षी स्थापन करण्यात आलेली 'भारतीय मुस्लिम महिला आंदोलन' ही संघटना मुस्लिम महिलांच्या न्याय्य हक्कासाठी आवाज उठवणारी एक महत्वपूर्ण संघटना आहे. तसेच मुस्लिम वैयक्तिक कायद्याच्या कार्यक्षेत्रात मुस्लिम महिलांच्या संदर्भातील सर्व विषयांचे नियम बनवताना मार्गदर्शन करण्यासाठी

अखिल भारतीय मुस्लिम महिला पर्सनल लॉ बोर्ड या संस्थेने पुढाकार घेण्यास सुरुवात केली आहे. याच दरम्यान भारतीय सर्वोच्च न्यायालयाने मुस्लिम महिलांच्या संदर्भात क्रांतिकारक निर्णय देऊन मुस्लिम समाजातील स्त्री-पुरुष समानतेच्या न्यायिक लढाईत स्त्रियांची बाजू अधिक मजबूत केली. २००९ या वर्षात ग्वाल्हेरच्या शबाना बानो आणि इमरान खान यांच्या घटस्फोटाच्या याचिकेवर निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने असे नमूद केले की, भारतीय गुन्हेगारी कायद्याच्या कलम एकशे पंचवीस अंतर्गत विवाहित महिलेला घटस्फोट दिल्यानंतर पतीने पत्नीला ती जोपर्यंत पुनर्विवाह करत नाही तोपर्यंत पोटगी द्यावी लागेल व तशी मागणी करण्याचा त्या महिलेला कायदेशीर हक्क आहे. या निकालामुळे समस्त मुस्लिम महिलांना न्यायिक आधार सुनिश्चित झाला.

भारतीय मुस्लिम महिलांच्या सामाजिक परिस्थितीत बदल घडवून आणण्यासह मुस्लिम महिलांना न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यां म्हणून कार्य करणाऱ्या मुस्लिम महिलांचा प्रत्यक्ष सहभाग महत्त्वपूर्ण ठरतो. स्पष्टपणे बोलायचे झाले तर शतकानुशतके पुरुषधार्जिन्या मुस्लिम धार्मिक संघटनांनी मुस्लिम महिलांना इस्लाम धर्मात प्रेषितांनी स्त्रियांना दिलेले स्वतंत्र अस्तित्व व सर्व प्रकारचा मान सन्मानापासून वंचित ठेवले. ही परिस्थिती बदलण्याची वेळ येऊन ठेपली आहे. त्यासाठी मुस्लिम महिलांनी आपल्या न्याय्य हक्कांसाठी व समाजात बदल घडून येण्यासाठी एकत्र येऊन निरंतर प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

**समान नागरी कायदा हा समुदायांअंतर्गत समानतेचा तसेच स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करते. तसेच भारतातील विविधांगी धर्म व संस्कृती जपताना इतर कोणत्याही समुदायाला बाधा पोहोचू नये. तसेच महिलांच्या स्वातंत्र्यावरही गदा येऊ नये. महिलांना त्यांच्या समानतेच्या हक्काबाबत कोणतीही तडजोड करावी लागू नये. तसेच महिलांना धर्म निवडीचे संपूर्ण स्वातंत्र्य मिळेल याची काळजी घेतली जावी.**

सर्वोच्च न्यायालयाने यंदा २२ ऑगस्ट रोजी तिहेरी तलाकबाबत ऐतिहासिक निर्णय दिला. सन १९३७ च्या मुस्लिम व्यक्तिगत कायद्याचा (शरिया) आधार घेऊन आणि कुराण व अन्य धार्मिक परंपरांच्या नावाखाली केवळ तीनदा तलाकचा उच्चार करुन पत्नीस घटस्फोट देण्याची मुभा मुस्लिम पुरुषास गेली कित्येक वर्षांपासून मिळत होती. मात्र, याचा गैरवापर वाढल्याने हजारो मुस्लिम महिलांची ससेहोलपट होत होती. मुस्लिम महिलांना समानतेचा हक्क नाकारणारी, मुस्लिम समुदायात विवाहसंबंध संपुष्टात आणणारी तिहेरी तलाक ही सर्वात वाईट प्रथा आहे'. ही प्रथा विशिष्ट विचारसरणीच्या गटांच्या मते 'कायदेशीर' असली तरी प्रत्यक्षात 'अत्यंत वाईट' आणि 'अनिष्ट' आहे, असे मत न्यायमूर्ती कुरियन जोसेफ, जस्टिस आर. एफ. नरीमन आणि न्यायमूर्ती उदय उमेश लेलिट यांनी तिहेरी तलाकनिषेधात व्यक्त केले. एकाच वेळी तीनदा तलाक बोलण्याची प्रथा पैगंबर मोहम्मद यांच्यानंतर सुरु झाली. अनेक इस्लामी देशात याला मान्यता नाही. पण भारतात आजही ही प्रथा कायम आहे. देशातील एकूण मुस्लिम लोकसंख्येपैकी ७० टक्के सुन्नी पंथातील उलेमा याला मान्यता देतात. १९३७ मध्ये मुस्लिम पर्सनल लॉ अप्लिकेशन ॲक्टच्या सेक्शन २ मध्ये याविषयी तरतूद आहे.

गेल्या ७० वर्षांपासून समान नागरी कायद्याबाबत सर्व सामाजिक स्तरावर चर्चा घडत आहे. मुस्लिम वैयक्तिक कायदा मंडळातर्फे समाज नागरी कायद्यामुळे धार्मिक बाबतीत हस्तक्षेप होण्याची चिंता व्यक्त केली गेली असून त्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने अजून निर्णय दिलेला नाही. तिहेरी

तलाकबाबत निर्णय देताना समान नागरी कायदा हा वेगळा विषय असून त्याचा धार्मिक बाबतीत हस्तक्षेप होणार नाही याची काळजी घेतली जाईल असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. सध्यातरी समान नागरी कायदा हा विषय राज्यसभेत चर्चिला जात आहे. विरोधकांनी हा विषय अत्यंत संवेदनशील असल्यामुळे त्यावर सर्व बाजूंनी प्रदीर्घ चर्चा व्हावी अशी मागणी केली आहे. याबाबतीत गेल्या आठवड्यात कायदा आयोगाने एक अहवाल राज्यसभेत सादर केला आहे. बहुपत्नित्व, निकाह हलाला, व्याभिचार विरोधी कायदा इत्यादी विषय सर्वोच्च न्यायालयात निकालाच्या प्रतीक्षेत असल्यामुळे आयोगाने या विषयांबाबत आवश्यक सुधारणा सांगितल्या आहेत परंतु कोणतीही शिफारस सुचवलेली नाही. जसे की बहुविवाह बद्दल सांगताना कायदा आयोगाने असे नमूद केले आहे की, जरी बहुपत्नीत्व पद्धतीला इस्लाम मध्ये मान्यता असली तरीही भारतीय मुसलमान समाजात बहुपत्नित्वाच्या घटना खूप दुर्मिळ असून बरेचदा इतर धर्मातील व्यक्तींकडून धर्मांतर करताना प्रथेचा वैयक्तिक लाभासाठी गैरवापर केला जातो. कायदे आयोगाने असेही सुचवले आहे की बहुपत्नीत्व हा एक कायदेशीर गुन्हा असून याला कोणताही नैतिक आधार नाही तर केवळ पुरुषांना विशेष लाभ मिळण्याच्या हेतूतून ही अनिष्ट प्रथा पडली आहे.

समान नागरी कायद्याबाबत महत्वपूर्ण स्पष्टीकरण देताना कायदे आयोगाने असे सांगितले आहे की, समान नागरी कायदा हा समुदायांअंतर्गत समानतेचा तसेच स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करते. तसेच भारतातील विविधांगी धर्म व संस्कृती जपताना इतर कोणत्याही समुदायाला बाधा पोहोचू नये. तसेच महिलांच्या स्वातंत्र्यावरही गदा येऊ नये. महिलांना त्यांच्या समानतेच्या हक्काबाबत कोणतीही तडजोड करावी लागू नये. तसेच महिलांना धर्म निवडीचे संपूर्ण स्वातंत्र्य मिळेल याची काळजी घेतली जावी, असेही कायदे आयोगाने स्पष्ट केले आहे.

शिया व सुन्नी मुसलमानांना लागू असणारा मालमत्ता उत्तराधिकाराबाबत सुधारणा सांगताना कायदे आयोगाने नमूद केले आहे की, मालमत्तेचा उत्तराधिकारी म्हणून केवळ पुरुषाला अधिकार दिली जाऊ नयेत तर मृत व्यक्तीच्या जवळच्या व्यक्तीला उत्तराधिकारी म्हणून प्राधान्य दिले जावे.

विसाव्या शतकातील सामाजिक सुधारणावादी मुस्लिम महिलांच्या कार्याची माहिती व्हावी यासाठी नुकतेच मुस्लिम महिला फोरमने 'पाथ ब्रेकर्सः विसाव्या शतकातील समाजसुधारक मुस्लिम महिला' हे प्रदर्शन व चर्चासत्र आयोजित केले होते. राष्ट्रउभारणीच्या कार्यात महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू तसेच मौलाना आझाद यांसारख्या दिग्गज नेत्यांच्या बरोबरीने या महिलांनीही मोलाचे योगदान दिले. यामध्ये शरीफा हमीद अली, मफिदा अहमद, अजीज इमाम, अनिस किडवाई, कीदि्सया अजीज रसूल, कीदि्सया झैदी , सुरैय्या तय्यब्जी इत्यादी महिलांचा विशेषत्वाने उल्लेख करता येईल. गुजरातमध्ये जन्मलेल्या शरीफा हामिद अली राज्य विधानसभेच्या सदस्य होत्या. त्यांनी संयुक्त राष्ट्र संघात महिलांची सामाजिक स्थिती या विषयावरील चर्चासत्रात भारताचे प्रतिनिधित्व केले. मफिदा अहमद या आसाम राज्यातील जोरहात विधानसभाक्षेत्रातून निवडून आलेल्या आमदार म्हणून कार्यरत होत्या. तर अजीज इमाम, अनिस किडवाई, कीदि्सया अजीज रसूल या लोकसभेच्या सदस्य होत्या. कीदि्सया झैदी यांनी स्वातंत्र्योत्तर भारतात व्यवसायिक नाटक कंपनी सुरू केली होती. तर सुरैय्या तैय्बजी यांनी भारतीय राष्ट्रध्वजाची रचना केली.

याशिवाय साहित्य,कला, राजकारण, समाजकारण इ. अनेक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणा-या अनेक महान मुस्लिम महिलांच्या जीवनकार्याची माहिती या प्रदर्शनात करून देण्यात आली होती.

आजच्या घडीला जगभरात इस्लाम हा पितृसत्ताक, महिला विरोधी धर्म अशी चुकीची समजूत पसरली आहे. समाजातील व धर्मातील अनिष्ट प्रथांविरोधात कार्य करणाऱ्या या समाज सुधारक मुस्लिम महिलांच्या जीवनकार्याची ओळख करून देण्याच्या मुस्लिम महिला संघटनांच्या उपक्रमांतून इस्लाम धर्माबाबतची गैरसमजूत दूर होण्यास मदत होत आहे.

■■■

*लेखिका पद्मश्री सन्मानित महिला अधिकार कार्यकर्त्या, नियोजन आयोगाच्या माजी सदस्या आणि मौलाना आझाद राष्ट्रीय उर्दू विद्यपिठाच्या माजी कुलगुरु आहेत.*

*ई मेल: hameed.syeda@gmail.com*

**आगामी अंक**


**नोव्हेंबर २०१८**

**'स्वच्छता : कल्पनेतून प्रत्यक्षात'**

प्रगती

# आर्थिक समावेश: महिलांना सशक्त करण्याचे साधन

-लेखा चक्रवर्ती, पियुष गांधी



**वाजवी दरात मिळणाऱ्या पतपुरवठ्याच्या उपलब्धतेमुळे महिलांचा उद्योजकतेच्या क्षेत्रातील सहभाग वाढत आहे. सूक्ष्म वित्तसंस्थांकडून मदत घेऊन किंवा स्वमदत गटांमध्ये सहभागी होऊन महिला स्वत:चा व्यवसाय सुरु करु शकतात. सावकारांसारख्या अनौपचारिक स्त्रोतांकडून अर्थसहाय्य मिळवणे त्यामानाने सोपे असते, परंतु त्यांच्या अवाजवी व्याज दरांमुळे महिला कर्जाच्या सापळ्यात अडकतात आणि याचा शेवट म्हणजे महिलांना आपल्याजवळील मालमत्ता, बहुतेक वेळा दागिने विकावे लागतात.**

सर्वसाधारणपणे असे मानले जाते की आर्थिक विकास हा व्यक्तीच्या एकूण वाढीमध्ये आणि विकासामध्ये उत्तेजक म्हणून कार्य करतो. आर्थिक समावेश हा आर्थिक हानीच्या बेड्या तोडून टाकत, अर्थव्यवस्थेचा मुख्य आर्थिक प्रवाह आणि समाज यांच्यातील दुवा बनण्याचा प्रयत्न करतो. कमी उत्पन्न गटाला औपचारिक बँकिंग क्षेत्राच्या परिमितीमध्ये आणून तो त्यांच्या आर्थिक संपत्तीचे आणि इतर स्त्रोतांचे अत्यावश्यक परिस्थितीत रक्षण करतो. आर्थिक समावेशामुळे औपचारीक पत मिळण्याचा मार्ग सोपा होऊन, पैशाच्या कर्जामुळे आणि सावकारांच्या भरमसाठ व्याजामुळे होणारे कमजोर घटकांचे शोषण कमी होण्यास मदत होते. (आरबीआय मूल्यांकन अहवाल, २०१३).

### आर्थिक समावेशाची व्याख्या

आर्थिक समावेश ही अशा प्रकारची आर्थिक स्थिती आहे की ज्यामध्ये कार्यक्षमतेच्या निकषांपेक्षा इतर प्रेरणांवर आधारित अशा मूलभूत आर्थिक सेवांमध्ये, व्यक्ती आणि कंपन्यांना प्रवेश नाकारला जात नाही, अशी आर्थिक समावेशाची व्यापक व्याख्या करता येइल. (इंटरनॅशनल मॉनेटरी फंड (आयएमएफ) वर्किंग पेपर, २०१४).

विविध प्रकारच्या आर्थिक सेवांमध्ये, वाजवी खर्चावर सार्वत्रिक प्रवेश मिळणे म्हणजे आर्थिक समावेश अशी व्याख्या डॉ. रघुराम राजन यांच्या अध्यक्षते खालच्या आर्थिक समावेशाबाबतच्या समितीने केली आहे. यामध्ये केवळ बँकिंग उत्पादनेच नव्हे तर विमा आणि इक्विटी उत्पादनांसारख्या इतर आर्थिक सेवांचा देखील यात समावेश आहे.

जागतिक आणि राष्ट्रीय पातळीवरील धोरण निर्माते दीर्घकालीन आर्थिक वाढीचा प्रसार करण्यासाठी साधन म्हणून आर्थिक समावेश स्वीकारत आहेत.

बायका नोकरी करु लागल्यामुळे त्यांच्या कुटुंबाचे राहणीमान, चांगली आर्थिक स्थिती, मुलांसाठी शैक्षणिक उपलब्धता आणि अधिक जागरूक आरोग्य सेवा खर्च यासारख्या बाबतीत सुधारत असल्याचे पुरावे दिवसेंदिवस वाढत आहेत.

वाजवी दरात मिळणाऱ्या पतपुरवठ्याच्या उपलब्धतेमुळे महिलांचा उद्योजकतेच्या क्षेत्रातील सहभाग वाढत आहे. सूक्ष्म वित्तसंस्थांकडून मदत घेऊन किंवा स्वमदत गटांमध्ये सहभागी होऊन महिला स्वत:चा व्यवसाय सुरु करु शकतात. सावकारांसारख्या अनौपचारिक स्त्रोतांकडून अर्थसहाय्य मिळवणे त्यामानाने सोपे असते, परंतु त्यांच्या अवाजवी व्याज दरांमुळे महिला कर्जाच्या सापळ्यात अडकतात आणि याचा शेवट म्हणजे महिलांना आपल्याजवळील मालमत्ता, बहुतेक वेळा दागिने विकावे लागतात.

सरकारला तसेच रिझर्व्ह बँकेला पुरवठा विभागाच्या समस्यांचे महत्व कळले असून त्यांनी, ही दरी

भरण्यासाठी, मुद्रा योजना किंवा प्राधान्य क्षेत्रातील कर्ज देणे यांसारख्या धोरणे सक्रियपणे राबविण्यास सुरुवात केली आहे. देयक बॅंका आणि लघु अर्थबॅंका या दीर्घमुदतीच्या काळात महत्वाची भूमिका बजाविणार आहेत.

त्याचप्रमाणे, आर्थिक समावेश हे महिला सबलीकरणासाठीचे एक साधन आहे; मात्र केवळ पतपुरवठा करणे इतकेच मर्यादित नाही. याचा अजून एक पैलू आहे ज्याकडे लक्ष देण्यासाठी दीर्घ काळ संघर्ष केला गेला आहे तो म्हणजे सुरक्षित, सुलभ आणि बचतीच्या व्यवहार्य संधी हा होय. अनौपचारिक स्त्रोतांमध्ये बऱ्याचदा दागिने खरेदी केले जातात, (ज्यामुळे आणीबाणीच्या काळात संकटात विकल्या गेलेल्या किंमतीचे मूल्य गमावले जाते.) किंवा रोख रक्कम घरीच ठेवली जाते, (ज्यामुळे त्यावर व्याज मिळत नाही आणि चोरी होण्याची भीती असते.). बऱ्याच घरांमध्ये असे आढळून आले आहे की पैसा भ्रमनिर्धारित असतो, विशेषत: महिन्याच्या सुरुवातीला जेव्हा मजुरी वितरीत केली जाते तेव्हा ब-याचदा अवांछित खर्च होतात आणि महिन्याच्या अखेरीस त्यांना पैसे कमी पडतात. अनेक, खासकरून महिलांचे वर्चस्व असलेल्या घरांमध्ये, औपचारीक बचतीचा पर्याय अनेक वेळा कुटुंबाचा महिन्याभराचा खर्च भागविण्यासाठी तसेच बचत योजना आणि साधनसंपत्तीचे फायदे मिळवण्यासाठी, अतिशय महत्वाचा असतो. सर्व लोकांना बॅंकिंग सुविधा प्रदान करण्याचा हेतू असणारे, प्रधानमंत्री जनधन योजना हे अलीकडचे एक धोरण आहे.

विमा प्रवेश हा आर्थिक समावेशाला पारखण्याचा आणखी एक असा घटक आहे की ज्याला आज देशात खूप महत्व प्राप्त झाले आहे. अपंगत्वाच्या आक्रमणाविरुध्द आणि चांगल्या आरोग्यासाठी अतिशय आवश्यक असे संरक्षण देणारी, सुरक्षा विमा योजना आणि स्वास्थ्य विमा योजना यांसारखी धोरणे आहेत. अशा योजनांना पूरक म्हणजे अटल पेंशन योजना यासारख्या अलीकडेच सुरू करण्यात आलेल्या पेंशन योजना. पती किंवा मुलांच्या इच्छेवर अवलंबून न राहता महिला स्वावलंबी बनु शकतात आणि आपल्या उतारवयासाठी बचत करू शकतात. यामुळे लिंगभेद कमी होऊ शकतो. आणि उत्पादनक्षमता जतन करण्यासाठी तसेच कोणत्याही आकस्मिक संकटासाठी महिला स्वत:चा विमा उतरवू शकतात. समाजातल्या तळातल्या महिलांना या धोरणांचा विशेष लाभ मिळू शकेल.



**आर्थिक समावेश हे महिला सबलीकरणासाठीचे एक साधन आहे; मात्र केवळ पतपुरवठा करणे इतकेच मर्यादित नाही. याचा अजून एक पैलू आहे ज्याकडे लक्ष देण्यासाठी दीर्घ काळ संघर्ष केला गेला आहे तो म्हणजे सुरक्षित, सुलभ आणि बचतीच्या व्यवहार्य संधी हा होय.**

खरं तर अशा प्रकारची विविध धोरणे एका मोठ्या चरणावर अग्रगामी आहेत. अलीकडेच नोव्हेंबर २०१६ मध्ये प्रधानमंत्र्यांनी जाहीर केलेल्या नोटबंदी मोहीमेमागे, आर्थिक समावेशा बरोबरच पॉइंट ऑफ सेल्स मशिन्स द्वारा ई बॅंकींग तसेच बॅंकांचे प्रतिनिधी वाढविणे, त्याचप्रमाणे ई वॉलेट आणि ई बॅंकींगला प्रोत्साहन देणे हा हेतू होता.

भारताची त्याच्या समकालीन देशांशी तुलना केली असता भारताने समाधानकारकरित्या कार्य केले नाही, ही सत्यस्थिती अधोरेखित करावी लागेल. ब्रुकिंग्स फायनान्शियल अँड डिजिटल इंक्लुझन प्रोजेक्ट (एफडीआयपी) अहवाल, २०१७ नुसार भारताचे मानांकन केनिया, युगांडा आणि टर्कीच्याही खाली आहे. एकूण लोकसंख्येच्या एक तृतियांश लोक अजुनही त्यांच्या कर्ज घेण्याच्या गरजांसाठी मित्र आणि नातेवाईकांवर अवलंबून असतात. याचा अर्थ अजुनही देशाच्या बहुतांश भागात औपचारीक बॅंकिंग सुविधांचा अभाव आहे.

सन १९५१-५२ या वर्षात शेतकरी मोठ्या प्रमाणात सावकारांवर अवलंबून असल्याचे सन १९५० मध्ये करण्यात आलेल्या अखिल भारतीय ग्रामिण पत सर्वेक्षणामध्ये अधोरेखित करण्यात आल्यानंतर लगेचच आर्थिक प्रवेशाची तपासणी करण्याची संकल्पना महत्वाची झाली. २००० च्या दशकात रिझर्व्ह बॅंकेने वित्तीय समावेशन वाढीच्या नमुन्याची सुरुवात करेपर्यंत ग्रामिण भागापेक्षा

शहरी भागात बँकांच्या शाखा जास्त संख्येने होत्या.

सन १९६९ मध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर आर्थिक सेवा ग्रामिण भागापर्यंत वाढविण्याचे ध्येय सरकारने ठेवले होते. या जलद विस्तारामुळे 'प्राधान्य विभाग' क्षेत्रातील कर्जामध्ये वाढ झाली. याशिवाय सरकारने १९७० मध्ये क्षेत्रीय ग्रामिण बँका (आरआरबी) स्थापन केल्या. या बँकांनी ग्रामिण जनतेसाठी बनविलेल्या विशेष सेवांना सुरुवात केली. याव्यतिरिक्त १९८२ मध्ये कृषी आणि ग्रामिण विकासाशी संबंधित सर्व बाबींचा सामना करण्यासाठी, राष्ट्रीय शेती व ग्रामिण विकास बँक (नाबार्ड) ची स्थापना झाली.

२००५-०६ पासून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) वार्षिक धोरणानुसार बँकिंग पद्धतींवर जोर दिला ज्यामुळे जनतेच्या आर्थिक समावेशनामध्ये अडथळा निर्माण झाला, त्यामुळे भारतात ख-या अर्थाने, आर्थिक समावेश प्रक्रीयेला वेग आला. रिझर्व्ह बॅंकेने सुधारित मालिका सुरू केली आहे आणि कमी उत्पन्न मिळवलेल्या गटांमध्ये आर्थिक सेवांचा प्रचार करण्यासाठी बॅंकाना विनंती केली आहे. बँकांना मूळ नो-फ्रिल्स बँकिंग खाते प्रदान केले आहे ज्यामध्ये अत्यल्प किंवा अजिबात नसलेली शिल्लक किंवा वित्तीय समावेश वाढविण्यासाठी शुल्क आकारले जाईल.

२००६ मध्ये, रिझर्व्ह बँकेने आणखी एक मोठे पाऊल उचलले होते , ते म्हणजे खासकरून ग्रामिण भागातील बँकांना आर्थिक सेवा प्रदान करण्यासाठी, बँकेचे प्रतिनिधी (बी सी) आणि व्यवसाय सुविधा पुरवणाऱ्यांना (बीएफ) मध्यस्त म्हणून काम करण्याची परवानगी देण्यात आली होती. आदर्श व्यापारी प्रतिनिधी नमुन्यामुळे बँका ग्रामिण भागात घरपोच सेवा देउ शकतात.

२००७-०८ या आर्थिक वर्षामध्ये आर्थिक समावेश निधी आणि आर्थिक समावेश तंत्रज्ञान निधी असे दोन निधी सुरू करण्यात आले.

## धोरण शिफारसी

सन २०११ ते २०१७ या कालावधी मध्ये १५ वर्षावरील ७७% महिलांची बँक खाती असल्याचा अहवाल आहे. सन २०११ च्या तुलनेत ही ५१% वाढ आहे. (ग्लोबल फाइंडेक्स २०१७). सध्याच्या सरकारने देशभरात सुरु केलेल्या प्रधानमंत्री जन धन योजनेमुळे ही वाढ झाली आहे. सर्व नागरिकांना सार्वभौमिक बँकिंग सेवा प्रदान करणे हा या योजनेचा उद्देश आहे. यामध्ये प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण आणि विविध सामाजिक सुरक्षा आणि विमा कार्यक्रमाशी जोडल्या जाणाऱ्या सेवांचा समावेश आहे. तथापी, या आकड्यांची मुख्य समस्या अशी आहे की अशा खात्यांची महत्त्वपूर्ण टक्केवारी शून्य-शिल्लक खाते आहे ज्याचा अर्थ सेवांचा अभाव आहे.

आतापर्यंतच्या धोरणांमध्ये अस्तित्वात असलेल्या काही समस्या यामध्ये समाविष्ट केल्या आहेत:

- **बँकेचे प्रतिनिधी (बी सी):** दुरवरच्या भागात रहाणारे लोक आणि बँका यामधील दुवा म्हणून काम करणाऱ्या बँकांच्या प्रतिनिधींची खूप प्रयत्नाने सुरवात करुनही विशेष यश मिळाले नाही, कारण, ग्रामिण अर्थव्यवस्थेमुळे कमी प्रोत्साहन

**भारतातील औपचारीक बँकींगची सद्यस्थिती**

| वर्ष | खाते पुरुष | खाते स्त्रिया | आर्थिक संस्था खाते, उत्पन्न, गरीब ४०% | खाते वापरण्यासाठी मोबाईल फोनचा किंवा इंटरनेटचा वापर करणारे, पुरुष | खाते वापरण्यासाठी मोबाईल फोनचा किंवा इंटरनेटचा वापर करणारे, स्त्रिया | कुटुंब किंवा मित्रांकडून कर्ज घेणारे, पुरुष | कुटुंब किंवा मित्रांकडून कर्ज घेणारे, स्त्रिया |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०११ | ४४% | २६% | २७% | | | २२% | १८% |
| २०१४ | ६३% | ४३% | ४३% | | | ३५% | ३०% |
| २०१७ | ८३% | ७७% | ७७% | ७% | ४% | ३५% | ३०% |

*स्त्रोत - ग्लोबल फाइंडेक्स डेटाबेस*

★ १५ वर्षांवरील वरील उत्तरदायी

आणि भरपाई संरचना असणे, तसेच बँकांच्या प्रतिनिधींमधील जबरदस्त ब्रँडिंगची कमतरता हे आहे.

- **पोस्ट ऑफिस:** जरी पोस्ट ऑफिसने वित्तीय सेवा विस्तारित करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असली तरी पोस्ट ऑफिसच्या विद्यमान पायाभूत सुविधांमधून मिळणारे संभाव्य फायदे अद्यापपर्यंत करुन घेतले गेले नाहीत. यामधील मुख्य अडथळे म्हणजे मनुष्यबळाची तीव्र कमतरता. त्यामुळे पोस्ट ऑफिसकडून पुरविल्या जाणा-या सेवा कमी पडतात. याशिवाय एकूण १ लाख ५४ हजार पोस्ट ऑफिस पैकी १ लाख ३९ हजार पोस्ट ऑफिस जरी ग्रामिण भागात असली तरीही ते कर्ज देण्याची सेवा देत नसल्यामुळे ग्रामिण लोकसंख्या अजुनही कर्जासाठी अनौपचारीक स्रोतांवर अवलंबून असते. सध्यातरी पोस्ट ऑफिस कर्जासह कोअर बॅकींग सेवा देऊ शकतील अशी कोणतीही यंत्रणा नाही.
- **मोबाईल बँकींग:** युगांडा आणि केनियासारख्या देशांइतकाच समान साक्षरतेचा दर आणि मजबूत बँकिंग संरचना असूनही, मोबाइल बँकिंगमध्ये क्रांती घडविण्यात भारत अयशस्वी झाला आहे. केनियासारख्या देशांमध्ये ७०% प्रौढ लोकसंख्येची मोबाइल बँक खाती आहेत.

साक्षरता कार्यक्रम: ३०% महिलांनी (% वय १५+) आपल्या मित्र किंवा नातेवाईकांकडून कर्ज घेतले आहे. (ग्लोबल फाइंडेक्स २०१७). त्यामुळे अद्यापही अनौपचारीक कर्ज घेणे ही एक महत्वपूर्ण समस्या आहे. यामधून लोकांमधील बदल घडवून आणण्याची कमतरता स्पष्ट दिसते, त्याचप्रमाणे ऑडिओ आणि व्हिज्युअल दूरदर्शनद्वारे वित्तीय साक्षरता सारख्या विविध साक्षरता कार्यक्रमांची कमतरता तसेच पत सल्ला केंद्रांचे कामही समाधानकारक नसल्याचे दिसून येते.

महिलांमध्ये आर्थिक समावेशन वाढविण्यासाठी आवश्यक वाटणा-या काही धोरण शिफारसींवर आपण आता चर्चा करूया:-

**१. अंगणवाडी प्रणाली:** भारतामध्ये सुमारे १० लाख ५३ हजार अंगणवाडी केंद्रे आहेत.आर्थिक गरजांच्या आणखी एक पैलू जोडल्याने अत्यंत प्रभाव पडेल. बँकिंग सेवांशी संबंधित आवश्यक प्रशिक्षणामुळे महिला आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होऊन त्यांचे जीवनमान सुधारेल. अंगणवाडी कर्मचा-यांना बॅकेचे मूलभूत प्रशिक्षण दिले जाऊ शकते जे त्यांना बँक प्रतिनिधी (बीसी) म्हणून कार्य करण्याची संधी देईल. अशा प्रकारे विद्यमान पायाभूत सुविधा आणि कर्मचारी बँकांच्या भौतिक अस्तित्वाच्या अभावाच्या अडथळ्यांवर मात करण्यासाठी तसेच बॅक प्रतिनिधींनी

**भारतामध्ये सुमारे १० लाख ५३ हजार अंगणवाडी केंद्रे आहेत. आर्थिक गरजांच्या आणखी एक पैलू जोडल्याने अत्यंत प्रभाव पडेल. बँकिंग सेवांशी संबंधित आवश्यक प्रशिक्षणामुळे महिला आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होऊन त्यांचे जीवनमान सुधारेल.**

वचन दिल्याप्रमाणे सेवांच्या वितरणाची खात्री करण्यासाठी वापरली जाऊ शकतात.

खाती उघडण्यासाठी केंद्र स्थापन केल्याने महिलांना शारीरिक गतिशीलतेच्या वेदनातून मुक्त केले जाईल आणि क्रेडिटचा वापर, सब्सिडीचा लाभ मिळवणे आणि इतर वेळोवेळी सरकार थेट वेळोवेळी चालविल्या जाणा-या इतर विमा पॉलिसीजचा लाभ इत्यादी योग्य निर्णय घेण्यास देखील परवानगी मिळेल.

**२. क्रेडिट स्कोअरिंग मॉडेलमध्ये अभिनव कल्पना:** महिलांच्या आर्थिक प्रवेशाविषयी चर्चा करताना एक गोष्ट जी ब-याचदा दुर्लक्षित केली जाते ती अशी आहे की पत इतिहासावर अवलंबून असलेल्या पारंपरिक क्रेडिट स्कोरिंग मॉडेलने स्त्रियांना वंचित ठेवले आहे. संभाव्य महिला कर्जदारांनी जोखीमेचे मूल्यांकन करण्यासाठी नवीन मार्ग वापरले पाहिजेत. आफ्रिकेमध्ये अशा प्रकारचा प्रयोग केला गेला. ते म्हणजे क्रेडिटयोग्यतेचे मूल्यांकन करण्यासाठी क्षमता, बुद्धीमत्ता आणि पात्रतेचे गुणधर्म विश्लेषित करणारी सायकोमेट्रिक चाचणी. (सी जी ए पी अहवाल).

**३. प्राधान्य क्षेत्रातील प्रगतीची भूमिका:** ग्रामीण लोकांच्या गरजा पूर्ण करण्यामध्ये लक्षणीय मान्यता मिळविण्याच्या दृष्टीने मायक्रो एंटरप्राइज मालक (संभाव्य महिला) यांना अनौपचारिक व्याजदरांच्या वेबवर घसरण्यापासून आणि उद्योजक, स्वयंरोजगार व्यवसाय, किरकोळ व्यापार, निर्यात व्यापार इत्यादीसारख्या नवीन मार्गांमध्ये बदल करण्यास मदत करण्यासाठी बँकांद्वारे अधिक विविधतापूर्ण, गुणात्मक आणि प्रमाणित कर्ज आवश्यक आहे.

**४. स्त्रियांसाठी उपयुक्त असलेली लवचिक उत्पादने:** भारतासारख्या देशात, जिथे मुले सामान्यत: पालकांच्या संपत्तीचा भाग असतात आणि मुली वगळल्या जातात तिथे, मालमत्तांच्या मालकीमध्ये लिंगभेद दिसून येतो. जिथे साधारणत: जमिनीसारख्या मालमत्तेचे मालक पुरुष असतात, आणि स्त्रियांच्या मालकीचे

दागदागिने आणि इतर मौल्यवान वस्तू असतात. या फरकांना समजून घेणे आणि अशा मालकीच्या नमुन्यांसह सुसंगत पत उत्पादनांची एक महत्वाची शिफारस म्हणून  रिझर्व्ह बँकेने नोंद घ्यावी.

**५. आर्थिक साक्षरता आणि जनसांख्यिकीय लाभांश**: भारतासह त्याच्या लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाच्या दृष्टीकोनातून, बहुसंख्य लोक कामगारांच्या वर्गात सामील होतील. जास्तीत जास्त स्त्रिया काम करु लागल्यामुळे, भविष्य निधी, विमा संरक्षण आणि थेट लाभार्थी योजनां यासारख्या आर्थिक स्वातंत्र्य आणि संबंधित सेवांविषयी त्यांना शिक्षित करण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारे, त्यांना नोक-या मिळाल्यानंतर त्या बँक खात्यांचे महत्त्व जाणतील आणि कोणत्याही बाह्य मदतीशिवाय त्याचा वापर करण्यास सक्षम होतील. तांत्रिक ज्ञानाची कमतरता आणि बँकिंग सेवांबद्दलच्या मिथकांमुळे भारतामध्ये बँक खाती उघडण्यामध्ये गंभीर अडथळा आहे.

**६.मोबाइल मनी- नवीन आयाम**:

भारतामध्ये मोठ्या लोकसंख्येद्वारे मोबाइल हँडसेटचा वापर होत आहे; खासगी कर्मचा-यांनीही. मोबाइल ॲप्लिकेशन्सद्वारे व्यवहार करण्यास सुलभता, स्मार्ट फोन नसलेल्या मोबाइल वापरकर्त्यांसाठी एसएमएस बँकिंग सक्षम करणे इ. महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असून मोबाईल फोनच्या, एका क्लीकवर व्यवहार पूर्ण होण्याचा गुण दीर्घकाळात खूप महत्वाचा ठरेल.

हे विशेषत: महत्त्वपूर्ण आहे कारण मोबाइल मालकीमध्ये लिंगभेद नाही आणि म्हणूनच ज्या स्त्रियांना बॅंक किंवा एटीएमएसमध्ये जाण्याचा त्रास होतो, विशेषत: ज्या भागात प्रवास करणे एक दिवसाचे मूल्य किंवा वेतन किंवा वेळ खर्च करू शकते, अशा स्त्रियांना उपयोगाची संधी मिळते.

अशा नवकल्पनांबद्दल ग्रामीण स्त्रियांना जागरूक करण्याची आणि त्यांना त्यांच्या कार्याचे प्राथमिक ज्ञान देण्याची आवश्यकता आहे ज्यामुळे या मोबाइल वॉलेटमध्ये त्यांची विश्वसनीयता वाढविण्यात मदत होईल. पंचायतीमध्ये होणारी माहितीपूर्ण सत्र आणि वाजवी किंमतीची दुकाने ही आवश्यक माहिती पुरविण्यात मदत करू शकतात.

सर्व हँडसेटमध्ये डिजिटल बॅंकिंग अनुप्रयोग पूर्व-स्थापित करणे आणि या अनुप्रयोगांना इंटरनेट डेटाचा वापर न करता चालविता येइल अशा प्रकारे शुल्क सानुकूलित करणे आवश्यक आहे. हे करणा-या मोबाइल कंपन्या आणि यंत्रचालकांची आवश्यकता आहे.

**७. पुढील संशोधन आणि लिंगभेद नसलेल्या डेटाचे महत्व**: कौटुंबिक पातळीवरील माहिती गोळा केल्यावर औपचारीक आर्थिक क्षेत्रामध्ये प्रवेश करायला महिला का कमी पडतात याची कारणे स्पष्ट होतील आणि पुढील धोरण तयार करणे शक्य होइल. कमी आर्थिक समावेशाची कारणे पूर्णपणे समजून घेण्यासाठी एक प्रगत मॉडेल समाविष्ट करणे आवश्यक आहे, ज्यात वर्तनात्मक पैलू आणि संज्ञात्मक मॉडेलसारख्या गुणात्मक चलनांचा समावेश आहे. हे धोरणकर्त्यांना सर्वात प्रभावी पद्धतीने हाताळण्यास प्रवृत्त करेल आणि एकीकृत दीर्घ धोरणाऐवजी विशिष्ट चलनांना लक्ष्य करणाऱ्या योजनांचे निराकरण करेल.

**निष्कर्ष**

जास्त कर्जामुळे आत्महत्या करणाऱ्या शेतकरी, एखादी बँक खाते घेण्यास सक्षम नसलेली गरीब स्त्री, बचत न करु शकणारा एखादा कामगार, या आणि अशा इतर उदाहरणांमधील असमर्थ असणारी व्यक्ती प्रासंगिकतेच्या एका सामान्य विषयाकडे लक्ष वेधते - पैशाची गरज; औपचारिक संस्थांपर्यंत पोहोचण्याची आवश्यकता आहे. आणि म्हणूनच भारतामध्ये आर्थिक समावेशनाची अत्यंत आवश्यकता आहे.अर्थव्यवस्थेतील सर्वात आर्थिकदृष्ट्या कमकुवत भागाला पूरक असलेल्या मूलभूत वैशिष्ट्यांमुळे प्राधान्य क्षेत्रातील कर्जाने आर्थिक व्यापकतेमध्ये सुधारणा करण्यासाठी मोठी भूमिका बजावली आहे. स्त्रियांना लघु उद्योगाची संधी मिळवण्यास आणि कर्जाच्या सापळ्यातून बाहेर पडण्यास मदत होइल अशा प्राधान्य क्षेत्रातील कर्जावर दक्षिणी राज्यांनी आपले लक्ष केंद्रीत केले आहे.

अशा प्रकारे, अंगणवाडी आणि प्राधान्य क्षेत्रातील कर्जाद्वारे महिलांचा आर्थिक समावेश शक्य आहे असा निष्कर्ष निघतो. रोख पैशाशिवाय अर्थात कॅशलेस जीवनशैलीसाठी वर्तनात्मक बदल होण्यास योग्य जागरुकता मोहीम मदत करेल. सुरक्षित ऑनलाइन व्यवहार (विमा निधीद्वारे समर्थित) सुनिश्चित करण्यासाठी मोबाइल बँकिंग आणि संबंधित पायाभूत सुविधांना प्रोत्साहन देणे ही काही प्रभावी धोरण साधने आहेत.

तथापि, आर्थिक समावेश अद्याप एक अंकुरित संकल्पना आहे आणि विश्लेषणामध्ये गुणात्मक चलने आणि संज्ञानात्मक मॉडेल समाविष्ट करून पूर्णपणे समजून घेण्याची आवश्यकता आहे.

■■■


*लेखा चक्रवर्ती नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स ॲन्ड पॉलिसी मध्ये सह प्राध्यापिका आहेत.*

*ई मेल: lekhachakraborty@gmail.com*

*पियुष गांधी ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटीचे स्कॉलर आहेत.*

# महिला सक्षमीकरण आणि भारतातील आरोग्य क्षेत्र

- चंद्रकांत लाहरिया



**महिलांच्या आरोग्याचा अजेंडा आणि सक्षमीकरणाशी घातलेली सांगड हा मुद्दा आता हळूहळू मुख्य विचार राहिला आहे. भारतात महिलांना आरोग्य सेवेच्या उपलब्धतेत सुधारणा त्यांना सक्षम बनवते. भारतात आरोग्य सेवा वितरण आणि विविध सार्वजनिक धोरण आणि वैधानिक उपाय यातुन महिलांना सक्षम बनवण्यासाठी शाश्वत प्रयत्न करण्यात आले आहेत.**

ऐतिहासिक, पारंपरिक आणि सामाजिक समजुती आणि भेदभावामुळे भारतातील बहुतेक राज्ये आणि (जगाच्या अनेक भागांत) मुली आणि महिलांना त्रास भोगावा लागला आहे. मुली आणि महिलांना संपूर्ण आयुष्यभर असलेल्या मर्यादित स्वायत्ततेमुळे सक्षमीकरणाच्या प्रयत्नांना मर्यादित यश मिळाले. स्वायत्ततेच्या अभावी त्यांचं शिक्षण नोंदणी आणि शिक्षणात सातत्य, जेव्हा गरज असेल तेव्हा आरोग्य सेवेची उपलब्धता, सामूहिक माध्यमांत पोहोच, लाभदायी रोजगारात सहभाग, पैशाची उपलब्धता आणि त्यांच्या गतीशीलतेवर मर्यादा येते ज्यामुळे त्याचे स्पर्धात्मकतेचे क्षेत्र आणखी आकुंचित पावते.

महिला सक्षमीकरण आणि दर्जेदार आरोग्य सेवेचा सार्वजनिकरित्या पुरवठा या निर्विवादपणे सरकारच्या जबाबदाऱ्या आहेत. या लेखात भारतातील महिला सक्षमीकरणात आरोग्य क्षेत्राची भूमिका आणि परिणाम यांचा सखोल अभ्यास केला असून मात्र हा लेख केवळ विषयाचा परिचयापुरताच मर्यादित आहे, ज्यावर विस्तृत आणि व्यापक चर्चा पुढील सर्वात जवळची संधी मिळेल तेव्हा होणे आवश्यक आहे. महिला सक्षमीकरण आणि आरोग्य यांच्यातील सांगड घालण्यास - जी दोन्ही दिशांनी दोघांच्याही फायद्याची असू शकते, असा दावा करता येईल- 1995 मध्ये कैरो, इजिप्त येथे झालेल्या लोकसंख्या आणि विकास यावरील आंतरराष्ट्रीय परिषदेनंतर कमालीचे लक्ष देण्यास सुरुवात झाली. या परिषदेत केलेल्या घोषणपत्रात असे म्हटले होते की, महिलांना स्वायत्तता आणि त्यांचे सक्षमीकरण आणि त्यांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य स्थितीमध्ये सुधारणा हे एक अत्यंत महत्वाचे साधन आहे. ...उत्पादक आणि प्रजोत्पादक आयुष्यात पुरुष आणि महिला या दोघांचाही संपूर्ण सहभाग आवश्यक आहे ज्यात मुलांची काळजी आणि संगोपन तसेच कुटुंबाची देखभाल यांचा समावेश आहे.

त्यानंतर महिलांच्या आरोग्याचा अजेंडा आणि सक्षमीकरणाशी घातलेली सांगड हा मुद्दा आता हळूहळू मुख्य विचार राहिला आहे. भारतात महिलांना आरोग्य सेवेच्या उपलब्धतेत सुधारणा त्यांना सक्षम बनवते. भारतात आरोग्य सेवा वितरण आणि विविध सार्वजनिक धोरण आणि वैधानिक उपाय यातुन महिलांना सक्षम बनवण्यासाठी शाश्वत प्रयत्न करण्यात आले आहेत. तरीही लोकसंख्या शास्त्रीय आणि आरोग्य सर्वेक्षण उदाहरणार्थ राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वे आणि जिल्हा स्तरीय कुटुंब सर्वेक्षण यांनी देशाच्या सर्व भागांत सेवेचा विनियोग आणि परिणामांच्या बाबतीत प्रमुख विषमता (पुरुषांच्या तुलनेत) असल्याचे समोर आणले आहे. त्याव्यतिरिक्त, मोठ्या संख्येने महिलांना स्वत:च्या आरोग्य प्रश्नांबाबत आरोग्य सेवा आणि त्यांच्या विनियोगाबाबत निर्णय घेण्याचा अधिकार नसल्याचे अहवालात म्हटले आहे. आरोग्याच्या मुद्याशी संबंधित

एवढा गंभीर नव्हता. आज मात्र, या समस्येने अक्राळ विक्राळ स्वरूप धारण केले आहे. असे काय कारण आहे? याबाबतीत महात्मा गांधींचे विचार फार मार्मिक आहेत.

Earth provides enough to satisfy every man's needs but not every man's greed.

पृथ्वीवरील साधनसंपत्ती माणसासह सर्वांसाठीच आहे. पण, आपण असे धरून चालतो की, ही साधनसंपत्ती केवळ माणसासाठीच आहे. शिवाय, ही साधनसंपत्ती वापरण्याचा व दूषित करण्याचा आपला वेगही अतिप्रचंड आहे.

आणि म्हणूनच, पर्यावरण रक्षणाची जबाबदारी ही फक्त सरकार, स्वयंसेवी संस्थांचीच नसून आपली सर्वांची सुध्दा आहे. त्यामुळे, ही कचराकोंडी सोडवायला ३ 'R' संकल्पनेवर भर दिला जातो आहे. हे ३ 'R' आहेत - Reduce, Reuse आणि Recycle.

Reduce म्हणजे कमी करा. वापर कमी करा म्हणजे कचरा कमी तयार होईल. विकत घेताना विचार करा. पेट्रोल नासाडी करणाऱ्या गाड्यांऐवजी, पेट्रोल कार्यक्षमतेने वापरणाऱ्या गाड्या वापरा. सोय व किंमत हे निकष लावा. वापरच कमी झाला तर पुनर्चक्रीकरणाची वेळ कमी येईल. प्लास्टिकऐवजी कापडी पिशवी वापरा. प्रत्येक महिन्यात नव्याने येणारा मोबाईल लगेच घेण्याची इच्छा सोडून टिकाऊ वस्तू घ्या. उपभोग जास्त - कचरा जास्त - प्रदूषण जास्त. पॅकिंग केलेल्या वस्तू घेण्याऐवजी ताजी फळे, भाज्या विकत घ्या. टेट्रापॅक आणि संत्रे पिळून काढलेला रस, यात पहिली गोष्ट विघटन करायला जास्त अवघड, अशा डोळस वृत्तीने पहा.

Reuse – पुनर्वापर - उदा. बाटलीतून दूध पुरवठा, जुने वापरता येतील असे संगणक अडगळीत न टाकता सुस्थितीत असतील तर ते समाजसेवी संस्थांना, शालेय विद्यार्थ्यांना द्या. ओल्या कचऱ्याला जिरवून खत निर्माण करा.

या जगाचे संतुलन राखण्यासाठी चैनीला गरजेत रूपांतरित करू नका. आपली आजकाल प्रवृत्ती असते नवनवीन गोष्टी विकत घेण्याची. जुनी चांगली वस्तू फेकून देण्याची. मात्र, भारतातील पूर्वीच्या पिढीत वस्तू नीट वापरण्यावर भर असायचा. उधळ

**पर्यावरण रक्षणाची जबाबदारी ही फक्त सरकार, स्वयंसेवी संस्थांचीच नसून आपली सर्वांची सुध्दा आहे. त्यामुळे, ही कचराकोंडी सोडवायला 3 'R' संकल्पनेवर भर दिला जातो आहे. हे 3 'R' आहेत - Reduce, Reuse आणि Recycle.**

माधळ नको, असाच संदेश होता. जुन्या साड्या जोडून छान गोधडी शिवत. तीच गोष्ट दुपट्यांची. काटकसर, कोंड्याचा मांडा करणे इ. हे Reduce / Reuse या वर भर देणारेच होते. आजही आपण हे मंत्र आधुनिक जगात वापरू शकतो. वातानुकूलनाची गरज नसेल तर ते आपण बंद ठेवून ऊर्जा वाचवू शकतो. केवळ संगणकाचा मॉनिटर बंद केल्याने संगणकही सुरू राहतो आणि अनावश्यक खर्च होणारी वीजही वाचते. फ्रीजमधील गार पदार्थ नेहमीच्या तापमानात थोडा वेळ ठेवून मग तापवले तर इंधनाचा कमी खर्च होतो. पर्यावरणाच्या दृष्टीने कागद ही मौल्यवान गोष्ट आहे. त्यामुळे, क्षुल्लक नोंदींसाठी पाठकोरे कागद वापरून आपण कागदाचा अतिवापर टाळू शकतो. थोड्या अंतरासाठी वाहन चालवून ऊर्जा खर्ची घालवण्याऐवजी, आपण चालत वा सार्वजनिक वाहन व्यवस्थेचा वापर करू शकतो. यातून आपण ऊर्जेचा व्यय कमी करतो आणि प्रदूषणही. वाहन वापरताना सुस्थितीत ठेवणे, चाकांमध्ये योग्य त्या प्रमाणात हवा राखणे, यामुळे सुध्दा आपली मोटार कमी इंधनात जास्त धावते व इंधनाची बचत होते.

Reduce (वापर कमी करणे), Reuse (पुनर्वापर) या इतकेच Recycle (पुनर्चक्रीकरण) हा मंत्रसुध्दा महत्त्वाचा आहे. हवेतील कर्बवायू झाडे घेऊन प्राणवायू सोडतात, हे एक नैसर्गिक पुनर्चक्रीकरणच आहे.

तुम्ही कचऱ्यात काय काय फेकता, हे डोळसपणे बघा. त्यातील पुनर्चक्रीकरणासाठी योग्य असेल ते वेगवेगळे ठेवा. उदा. वर्तमानपत्र. एक चार फुट वर्तमानपत्राचा गठ्ठा जर पुनर्चक्रीकरणात वापरला, तर ते एक चाळीस फुटी झाड वाचवण्यासमानच आहे. काचेच्या बाटल्यांचे पुनर्चक्रीकरण हेही खूप ऊर्जा वाचवते.

यासाठी कार्यालयात/इतरत्र सर्वांना सामील करून घ्या. जर कागद वाया घालवायचा नसेल तर त्याची साठवणूक केंद्रे लोकांना सोयीच्या ठिकाणी ठेवा. ३ 'R' मंत्र वापरण्यासाठी बक्षिस जाहीर करा. पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण करा.

एक भारतीय घर रोज एक किलो विघटीत होणारा कचरा निर्माण करते. तर इंग्लंडसारखे विकसित राष्ट्र ८०० टन कचरा वर्षाला टाकते. कचरा दर वर्षाला १.४% ते २% वाढत आहे आणि या अतिप्रचंड प्रमाणाला कमी करण्यासाठी काही शहरे जाणीवपूर्वक पावले उचलत आहेत. उदाहरणार्थ

व्यापक अज्ञान आणि माहितीचा अभाव यामुळे भारतीय महिलांचे आरोग्य आणि कल्याण तसेच त्यांच्या सक्षमीकरणात मोठे अडथळे येतात. या पार्श्वभूमीवर, महिलांकडून आरोग्य सेवा घेणे (आणि त्यांचा उपयोग) नेहमीच घटलेले, विलंबित किंवा नाकारलेले असेच असते.

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटनेच्या ७१ व्या फेरीच्या अहवालात असे दाखवून दिले आहे की, जरी भारतात सार्वजनिक आरोग्य सेवा केंद्रांवरील आरोग्य सेवा मोफत असल्या तरीही लोकांना या सुविधा मिळवताना विविध प्रकारचा खर्च सहन करावा लागतो. विशेषत: महिला आणि मुलांच्या आरोग्य सेवेवरील खर्च झाल्यास सेवा विलंबाने मिळण्याची अथवा उपयोगातून वगळली जाण्याची जोखीम असते. महिला आणि मुलांसह कमकुवत गटांसाठी आरोग्य सुविधांची उपलब्धता आणि पोहोच महिला सक्षम करण्याचे साधन आहे. या युक्तिवादाला पाठबळ देणारा अगदी अलीकडचा पुरावा म्हणजे दिल्लीतील मोहल्ला किंवा सामुदायिक आरोग्य केंद्रांतून आला असून या केंद्रांवर हजेरी लावणाऱ्या अर्ध्या अधिक लाभार्थी या प्रथमच सार्वजनिक आरोग्य सुविधा केंद्रांत येणाऱ्या महिला, मुले आणि वृद्ध होत्या. महिलांच्या खासगीपणाला प्रतिसाद देणाऱ्या आरोग्य सुविधा आणि देऊ केलेल्या सुविधांची व्याप्ती वाढवली तर आरोग्य सेवा अधिक पोहोचयोग्य केल्या जाऊ शकतील. पारंपरिक प्रसूती आणि मुलांचे आरोग्य सेवांवरून अत्यावश्यक आरोग्य सेवांना अधिक विस्तारित करून त्यांचा भर व्यापक लैंगिक आणि प्रजोत्पादक आरोग्याकडे वळवण्याने अधिक लक्ष वेधले गेले आहे. अगदी अलीकडे, लिंगभेद आधारित हिंसाचारासाठी सेवा पुरवण्यात येत आहेत.

## औपचारिक रोजगारातून महिला सक्षमीकरण

महिला सक्षमीकरणात आर्थिक स्वायत्तता अत्यंत महत्वाची भूमिका बजावते; तरीही भारतात औपचारिक कामगार वर्ग आणि लाभप्रद रोजगारात महिलांचा सहभाग पारंपरिकदृष्ट्या कमी राहिला आहे, एकूण कामगार वर्गापैकी २८ टक्केच महिला आहेत. (तक्ता १ पहा) या परिघात, इतर सर्व क्षेत्रापेक्षा आरोग्य क्षेत्र तुलनेत चांगले काम करत आहे, असे दिसते आणि अंदाजित १२.०५ लाख (किंवा १० लाख वीस हजार) औपचारिक आरोग्य

**महिलांच्या खासगीपणाला प्रतिसाद देणाऱ्या आरोग्य सुविधा आणि देऊ केलेल्या सुविधांची व्याप्ती वाढवली तर आरोग्य सेवा अधिक पोहोचयोग्य केल्या जाऊ शकतील. पारंपरिक प्रसूती आणि मुलांचे आरोग्य सेवांवरून अत्यावश्यक आरोग्य सेवांना अधिक विस्तारित करून त्यांचा भर व्यापक लैंगिक आणि प्रजोत्पादक आरोग्याकडे वळवण्याने अधिक लक्ष वेधले गेले आहे.**

कर्मचाऱ्यांपैकी ५८१,००० (४८.२ टक्के) महिला होत्या तर ६.२४ लाख पुरुष कामगार होते. (स्रोत : कामगार मंत्रालय आणि रोजगार यांचा २०१६ मधील भारतातील रोजगार स्थितीवरील पहिला तिमाही अहवाल) औपचारिक कामगार वर्गातील महिलांचा सहभाग आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात इतर क्षेत्रापेक्षा लक्षणीय रित्या उच्च आहे. (तक्ता १)

हा कल शाश्वत आहे आणि भारतातील रोजगार स्थितीवरील सातव्या तिमाही अहवालात जुलै ते सप्टेंबर २०१७ या काळात (मार्च २०१८ मध्ये प्रसिद्ध) असे म्हटले आहे की, पुरुष कामगारांपैकी अधिक महिला कामगारांची भर पहिला अहवाल सप्टेंबर २०१६ मध्ये प्रसिद्ध झाल्यापासून पुढच्या प्रत्येक तिमाहीत पडली आहे. एक उदाहरण आहे की, जुलै ते सप्टेंबर २०१७ या तिमाहीत एकूण ११,००० रोजगारांची आरोग्य क्षेत्रात भर पडली, जे सर्व महिला आरोग्य कर्मचाऱ्यांची भर पडल्याचे गुणविशेष होते. अहवालात सांगितल्यानुसार, ७ इतर औपचारिक क्षेत्रातील रोजगारांशी तुलना केली असता आणि क्षेत्राच्या आकाराह्या तुलनेत आरोग्य क्षेत्राने अधिक रोजगारांची निर्मिती केली आहे. स्पष्टपणे, आरोग्य क्षेत्र महिलाना औपचारिक आणि संघटित कामगार वर्गात उच्च दराने आणून महिला सक्षमीकरणात योगदान देत आहे.

## कामाच्या संधीतून महिला सक्षमीकरण

जवळपास १८७,००० सरकारी प्राथमिक आरोग्य केंद्रांतील औपचारिक आणि स्वयंसेवी महिला कर्मचारी या भारताच्या विशाल ग्रामिण आरोग्य सेवा व्यवस्थेचा आधार आहेत. आरोग्य सुविधा केंद्रांच्या जाळ्याचा उद्देश्य ६५०,००० हून अधिक गावांना सेवा वितरण करणे हा आहे. सेवा वितरण व्यवस्थेच्या केंद्रस्थानी महिला आहेत. ग्राम स्तरावर ए ए ए म्हणजे ऑक्सिलरी नर्स मिडवाईफ (ए एन एम), अंगणवाडी सेविका (ए डब्ल्यू डब्ल्यू) आणि अधिस्वीकृत सामाजिक आरोग्य कार्यकर्ती (आशा) आरोग्य आणि पोषण आहार सेवांचे वितरण आणि उपलब्धता यांची खात्री करण्यासाठी समन्वयाने काम करतात (आरोग्य शिक्षण ते प्रसूतीपूर्व तपासणी, कुटुंब कल्याण सेवा अशा बऱ्याच)

मार्च २०१८ च्या अखेरीस, २१०,००० ऑक्सिलरी नर्स मिडवाइफ ग्रामीण भारतातील आरोग्य सुविधा

केंद्रांत आहेत. त्याचप्रमाणे, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन अंतर्गत (एन आर एच एम), सुमारे १,०००,००० स्वयंसेवी महिला कार्यकर्त्या ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांत होत्या, ज्यांना अधिस्वीकृत सामाजिक आरोग्य कार्यकर्ती (आशा) म्हटले जाते, देशभरात कार्यरत होत्या. या शिवाय, सुमारे ५३०,००० ग्राम आरोग्य, स्वच्छता आणि पोषण आहार समित्या (व्ही एच एस एन सी) ज्यात आशा आणि ए एन एम यांचा समावेश होता, निर्णय प्रक्रियेत महिलांची भूमिका असेल, याची काळजी घेण्यासाठी काम करत आहेत. त्या व्यतिरीक्त, ७३०,००० महिला आरोग्य समित्या (एम ए एस) आणि रोगी कल्याण समित्या (आर के एस) यांच्या माध्यमातून आरोग्य सेवांचा पुरवठ्यावर प्रभाव टाकण्यासाठी आणि महिलांच्या स्वत:च्या आरोग्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी त्यांना सक्षम करण्यात आले आहे.

### जागतिक आणि राष्ट्रीय कटीबद्धता

महिला सक्षमीकरण आणि आरोग्यासाठी जागतिक ७ राष्ट्रीय धोरणात्मक चौकट तयार झाल्याचे दिसते. जागतिक स्तरावर मान्य करण्यात आलेल्या शाश्वत विकास गोल (एस डी जी) अजेंडा २०१३ अनुसार, आरोग्य (गोल ३) आणि लिंग समानता (गोल ५) याना समर्पित उद्दिष्टे ठरवली आहेत. एस डी जी ५ मध्ये लिंग समानता आणि सर्व महिला आणि मुलींना सक्षम करणे हे उद्दिष्ट साध्य करण्याबाबत नि:संदिग्धपणे उल्लेख आहे. आरोग्यावरील एस डी जी ३ सार्वत्रिक आरोग्य कवच (यु एच सी) साध्य करण्याचे लक्ष्य असून त्याचा उद्देश्य दर्जेदार आणि स्वस्त आरोग्य सेवेची उपलब्धता सर्वांसाठी वाढवणे हा आहे. यु एच सी साध्य केल्यास आरोग्य सेवांची उपलब्धता महिलांसाठी वाढून तसेच सेवांचा विनियोग आणि आरोग्य परिणाम यातील विषमता दूर होऊन महिलांना सक्षम करण्यात योगदान दिले जाणार आहे. भारताच्या राष्ट्रीय आरोग्य धोरणात देशातात यु एच सी साध्य करण्याचा उद्देश्य असल्याचे म्हटले आहे.

### आयुष्यमान भारत कार्यक्रमाच्या माध्यमातून संधी आणि क्षमता

भारतात अगोदरच प्राथमिक आरोग्य केंद्रांचे (पी एच सी) व्यवस्थेचे विस्तृत जाळे आहे, जे मजबूत करण्याची गरज आहे. अनेक ग्रामिण आणि आदिवासी महिलांसाठी, पी एच सी व्यवस्था बाह्य पर्यावरणात जाण्याची संधी पुरवते आणि आपल्या आरोग्याबाबत जाणून घेण्याची पहिली संधी देते. प्राथमिक आरोग्य काळजी व्यवस्था खबरदारी आणि प्रोत्साहन, कुटुंब कल्याण, आरोग्यसंपन्न जीवनशैली, हायजीन, स्वच्छता आणि संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य रोगाना प्रतिबंध यावर शिक्षण देते तसेच सांस्कृतिक उपक्रम, स्वयं सहाय्यता कार्यक्रम आणि आरोग्य शिक्षण याना प्रोत्साहन देऊन महिला सक्षम करण्यासाठी एक साधन सिद्ध ठरू शकेल. आयुष्यमान भारत कार्यक्रम, २०१८-१९ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आला असून, देशभरात १५०,००० आरोग्य आणि स्वस्थ केंद्रे (एच डब्ल्यू सी) स्थापन करून प्राथमिक आरोग्य काळजी सेवा लोकांच्या अधिक जवळ नेणे आणि उपलब्धता वाढवणे प्रस्तावित आहे. यामुळे महिलांना आरोग्य सेवांची उपलब्धता वाढून स्वत:च्या आरोग्याची काळजी देण्यास त्या सक्षम होतील.

**प्राथमिक आरोग्य काळजी व्यवस्था खबरदारी आणि प्रोत्साहन, कुटुंब कल्याण, आरोग्यसंपन्न जीवनशैली, हायजीन, स्वच्छता आणि संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य रोगाना प्रतिबंध यावर शिक्षण देते**

आयुष्यमान भारत कार्यक्रमाचा दुसरा घटक म्हणजे प्रधानमंत्री जन आरोय योजना (पी एम जे ए वाय) असून सुमारे १०.७४ कोटी भारतीय कुटुंबाना ५००,००० रुपायांपर्यंत विमा कवच पुरवण्याचा तिचा उद्देश्य आहे. सर्वांसाठी आरोग्य सेवांची उपलब्धता वाढवून वैद्यकीय सेवा स्वस्त करण्यात योगदान देणारी ही योजना असून महिला तिच्या प्रमुख लाभार्थी असण्याची अपेक्षा आहे. पूर्वीच्या अनुभवानुसार, वैद्यकीय सेवांची उपलब्धता वाढल्यास महिलांना जास्त लाभ होतो आणि त्या सक्षम होतात. ए बी पी चे दोन घटक आणि सध्याच्या सुरू असलेल्या आरोग्य उपाय योजना यांच्यात क्षमता आहे आणि महिलांच्या गरजांप्रती संवेदनशील अशी सार्वजनिक आरोग्य व्यवस्था तयार करून यु एच सी साध्य करण्याच्या दिशेने भारताला वाटचाल करण्यासाठी आणखी एक संधी पुरवतात.

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, २५ सप्टेंबर २०१८ रोजी सुरू करण्यात येणार असून या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक लिखित आरोग्य सुविधा केंद्रासाठी एक असे एक लाख आरोग्य मित्रांची भरती करण्यात येणार आहे. या पदांसाठी भरती करताना महिलांना प्राधान्य देण्यात येणार असून त्यामुळे त्यांच्यासाठी रोजगार निर्मिती होणार आहे.

### निष्कर्ष

नव्याने जारी करण्यात आलेले भारताचे राष्ट्रीय आरोग्य धोरण (२०१७), नुकतेच जाहीर करण्यात आलेले ए बी पी (२०१८) आणि

| क्षेत्र | एकूण रोजगार | एकूण कामगार वर्गातील योगदान टक्केवारी | महिला कामगार | एकूण कामगार वर्गापैकी महिला कामगार टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| उत्पादन | १०१.२ | ४९.३ | १८.५७ | १८.४ |
| बांधकाम | ३.६७ | ०१.८ | ०.५६ | १५.३ |
| व्यापार | १४.४५ | ०७.० | २.६३ | १८.२ |
| वाहतूक | ५.८० | ०२.८ | ०.६६ | ११.३८ |
| निवास आणि उपहारगृह | ७.७४ | ०३.८ | १.२१ | १५.६ |
| आयटी/बीपीओ | १०.३६ | ०५.१ | ३.२४ | ३१.३ |
| शिक्षण | ४९.९८ | २४.४ | २४.४७ | ४८.९ |
| आरोग्य | १२.०५ | ०५.९ | ५.८१ | ४८.२ |
| एकूण | २०५.२२ | १०० | ५७.१५ | २७.८ |

शाश्वत विकास उद्दिष्टे (एस डी जी) याकडे वेधण्यात आलेले राष्ट्रीय स्तरावरून लक्ष आणि सार्वत्रिक आरोग्य कवच (यु एच सी) यात महिलांचे आरोग्य सुधारण्याची आणि त्यांना सक्षम करण्याची क्षमता आहे. हे दोन पैलू एकमेकांशी गहनपणे जोडले आहेत, यास अधिकाधिक मान्यता मिळत आहे. मात्र, भारतात महिला सक्षमीकरण आणि चांगले आरोग्य यात झपाट्याने आणि सहनुभूतीशील यश मिळवायचे असेल तर उच्च स्तरीय आणि शाश्वत राजकीय इच्छाशक्ती, बहुविध घटक, शाश्वत भागधारक यांच्याकडून समन्वयाने कृती आणि सक्षम पर्यावरण यांची आवश्यकता आहे.

**अधिक वाचन**


- भारत सरकार . भारतातील रोजगार स्थितीवर पहिला तिमाही अहवाल (२०१६). (कामगार आणि रोजगार मंत्रालय, २०१६, लेबर ब्युरो,चंदीगड, सप्टेंबर २०१६)
- नियोजन, सांख्यिकी आणि अमलबजावणी मंत्रालय. आरोग्यविषयक राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटनेच्या ७१ व्या फेरीचा अहवाल, जून २०१४


**लेखातील मते त्यांची वैयक्तिक आहेत.**

- अंगणवाडी सेविका या महिला आणि बाल मंत्रालयांतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्पाशी संलग्न आहेत.
- आशा या आरोग्य यंत्रणेच्या अधिकृत कर्मचारी नाहीत आणि स्वयंसेवी असून उपक्रम/कामगिरीशी निगडित वेतन त्यांना दिले जाते.

■■■


*लेखक जागतिक आरोग्य संघटनेच्या नवी दिल्ली स्थित कार्यालयात वरिष्ठ पदावर कार्यरत असून सार्वजानिक आरोग्य आणि धोरणे क्षेत्रात त्यांचे उल्लेखनीय योगदान राहिले आहे.*

*ई मेल: c.lahriya@gmail.com*


## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठविताना लेखकांनी UNICODE (Mangal) किंवा KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत, ही विनंती.

उपाय

# प्रदूषण नियंत्रण - सुरूवात स्वत:पासून

-रेश्मा घाणेकर




**एकट्या मुंबईमध्ये चारशे ते चारशे पन्नास मेट्रिक टन दररोज कचरा निर्माण होतो. २६ जुलै, २००५ रोजी झालेल्या महापर्जन्यवृष्टीमुळे व त्यानंतर उद्भवलेल्या इतर पूरसदृश स्थितीस प्लास्टिक पिशवी हे एक प्रमुख कारण असल्याचे स्पष्ट झाले. संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमांतर्गत जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार, दर वर्षी ऐंशी लाख टनांपेक्षाही जास्त प्लास्टिक समुद्रात जाऊन पडते. किनारपट्टयांना कचरापट्ट्या बनवण्याचे काम आपण करतो.**

मी बसमधून उतरते आणि तिकीट रस्त्यावर भिरकावते. मी रेल्वेमध्ये बिस्किट खातो आणि वेष्टन तिथल्याच बाकाखाली टाकतो. असे अनेक 'मी' सारखेच दिसतात. ते म्हणतात, 'माझ्या एवढयाशा कचऱ्याने असे काय बिघडते! मी कधी तरी असं करतो. त्यात काय एवढे! हे या पर्यावरणवाद्यांचे काही तरी नवीन खूळ आहे.'

मी घर साफ करून कचरा रस्त्यावर लोटते. माझे घर स्वच्छ झाल्याच्या आनंदात मी माझ्या सर्वात मोठ्या घराबद्दल म्हणजे पृथ्वी या ग्रहाबद्दल विसरून जाते. पृथ्वी हे घर खूप मोठे आहे. परंतु, या घरातून कचरा फेकता येईल अशी कचराकुंडी अवकाशात वा अंतरिक्षात कोठेच नाही, हे आपल्या लक्षातच येत नाही. मग आपल्याला रेल्वेमार्गावर /आसपास सर्वत्र अनेक प्रकारचा कचरा दिसतो. रस्त्यांची ही स्थिती, तर समुद्रकिनारे व नद्यांचीही अवस्था काही वेगळी नाही. आपल्या या सवयीबद्दल हेन्री डेव्हिड थोरो यांचे एक मार्मिक वचन आहे. ते म्हणतात, 'Thank God men cannot fly, and lay waste the sky as well as the earth'.

अगदी एवढ्यातच, महाराष्ट्र शासनाने अधिसूचनेद्वारे प्लास्टिक वापरावर नियंत्रण आणले आहे. एकेकाळी अत्यंत उपयोगी शोध म्हणून प्लास्टिककककडे पाहिले जायचे. मात्र, त्याच्या अनिर्बंध वापरामुळे आणि नदी, नाले, समुद्रात फेकून देण्यामुळे पशुपक्षी आणि जलचर यांचे जीवन धोक्यात आले आहे. प्लास्टिकच्या संपूर्ण विघटनास शंभराहून अधिक वर्षे लागतात. एकट्या मुंबईमध्ये चारशे ते चारशे पन्नास मेट्रिक टन दररोज कचरा निर्माण होतो. २६ जुलै, २००५ रोजी झालेल्या महापर्जन्यवृष्टीमुळे व त्यानंतर उद्भवलेल्या इतर पूरसदृश स्थितीस प्लास्टिक पिशवी हे एक प्रमुख कारण असल्याचे स्पष्ट झाले. संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमांतर्गत जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार, दर वर्षी ऐंशी लाख टनांपेक्षाही जास्त प्लास्टिक समुद्रात जाऊन पडते. किनारपट्टयांना कचरापट्ट्या बनवण्याचे काम आपण करतो.

मात्र, पूर्वीच्या काळी असे निसर्गात होत नव्हते. कचरा एवढा साठत नव्हता. कचऱ्याचे विघटन होत होते. पाणी आणि हवा हे दोन घटकही त्यामुळे शुद्ध होते; विघटनाच्या निरंतर प्रक्रियेने जमिनीचा दर्जाही चांगला होता. आज मात्र असे नाही. माणसे जशी नगरे वसवू लागली, लोकसंख्या अमर्याद वाढवू लागली, तस तसा हा कचऱ्याचा प्रश्न वाढू लागला. प्राचीन काळी जमिनीच्या खाली कचरा गाडत असत. अथेन्स या प्राचीन शहरात ही पध्दत अस्तित्वात होती. चीनमध्ये कंपोस्ट करण्याची पध्दत दोन हजार वर्षांपूर्वी प्रचलित होती. ब्रिटनमध्ये घराच्या पुढची बाजू कचरा मुक्त ठेवा, असा कायदा होता. परंतु, त्यावेळेस कचऱ्यांचा प्रश्न

'स्वच्छ अहमदाबाद अभियान'. यामध्ये रस्त्यावर कचरा शून्य व्हावा, यासाठी पध्दतशीर प्रयत्न केले गेले. कचऱ्याच्या पिशव्यांचे तीन कप्पे करून त्यात कचऱ्याचे वर्गीकरण झाले. तर स्वयंपाक घरातील कचऱ्यापासून कंपोस्ट व इतर इंधनाची निर्मिती केली जाऊ लागली. स्वच्छतेविषयी माध्यमांनी जाणीव निर्माण केली. कचरा वेचकांचे संघटन केले गेले. त्यांना कचरा वर्गीकरणातून पध्दतशीर रोजगाराचे प्रयत्न केले गेले. या अभियानाला सर्वांनी आपण होऊन वर्गणी देऊन ही मोहिम यशस्वी केली.

यासारखेच दुसरे यशस्वी अभियान राबवले गेले - सुर्यापेट, आंध्र प्रदेश येथे. यापूर्वी, या छोट्या गावात वाहत्या कचराकुंड्या, दुर्गंधी असे सर्व होते. परंतु, पथनाट्य व घरोघरी भेटींद्वारे जनजागृती केली गेली. पत्रके वाटून कचरा विभागणीचे महत्त्व बिंबवले गेले. प्रत्येक घराला दोन वेगवेगळ्या रंगाच्या पेट्या दिल्या. ९ ट्रक्टर, ३ तिचाकी, ३ सायकलरिक्षा यातून कचरा गोळा केला जाई. या अभियानाचे महत्त्व लोकांवर इतके चांगले बिंबले होते की, शिट्टी फुंकल्यावर घरोघरचे लोक कचरा देण्यासाठी धावायचे. कचऱ्याचे खतात रूपांतर होऊन त्यातून उत्पन्न मिळाले. घनकचरा विकूनही उत्पन्न मिळाले. केवळ सव्वा कोटी खर्चातून पूर्ण नगर स्वच्छ झाले.

याशिवाय, तिरूचिरापल्ली येथील भरत ॲग्रो प्रॉडक्ट्स, चेन्नई पेट्रोलियम कॉर्पोरेशन्स यासारखे उद्योग याच ३ 'R' चा वापर करून कचऱ्यापासून ऊर्जा आणि खत निर्माण करतात. पावसाळी पाण्याला साठवतात आणि पाणी टंचाईला थोडा उपाय शोधतात.

नेकचंद यांनी वसवलेले चंडीगडचे Rockgarden हे तर कचऱ्यातून कलेचे अनोखे प्रदर्शन आहे. ट्यूब, तेलाचे डबे, चिनी माती, परश्या, काचेच्या बांगड्या, विटा, फुटके दिवे इ. पासून ५००० कलाकृती केल्या आहेत.

आपण एका दिवसात सर्व ग्रह स्वच्छ करू शकत नाही पण, छोटी छोटी पावले जाणीवपूर्वक उचलली, तर पर्यावरण प्रदूषण आणि कचरा या Reduce, Reuse Recycle मंत्राने नक्की कमी करू शकू.

■■■

*लेखिका या राज्यकर सहआयुक्त असून पर्यावरणाच्या अभ्यासक आहेत.*

*ई मेल: rbgonline@gmail.com*



# भगीरथ परिवारातील यशवंत



## निरंजन दिवाकर
**UPSC 2018 (IFS)**
**All India Rank 3**



## भुवनेश्वर पाटील
**UPSC 2018**
**All India Rank 59**



## किरण सावंदकर
**UPSC 2018**
**All India Rank 459**

**UPSC** Foundation Batch 2018-19 | Batch Starts 3 July 2018

Bhagirath IAS Academy
UPSC • MPSC

ऑफिस १ : मंत्री हाईटस्, २ रा. मजला, शनिवार पेठ, पुणे-३०
Ph.: 020-65233450 | 7378406920
ऑफिस २ : २ रा मजला केसरीवाडा, नारायणपेठ, पुणे -३०
Ph.: 020-64013450 | 9970298197
Web:www.bhagirathacademy.co.in
E-mail: bhagirathacademypune@gmail.com
Facebook: Bhagirath IAS Academy

**Yojana Marathi** (Monthly) **October, 2018**

**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No. NMB/137/2016-18

Published Date: 12th October, 2018
Date of Posting : 16th October, 2018




Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout**, Director General, on behalf of Published Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office, GPO, Mumbai - 400 001.